# शब्द रुची

मार्च २०१६
मूल्य १० रु.
पृष्ठे ५२





**तू इस तरहा से मेरी जिंदगी में शामील है**

इब्राहिम अफगाण

**निदा फाजलीची कविता**

स्वैर अनुवाद : चंद्रशेखर सानेकर

**प्रेमाचा सुवास**

अरुण जाखडे

**शर्वरी : स्त्रीसुखाची कविता**

द.भि. कुलकर्णी




**द्रोह सार्वभौम आणि संविधानिक राष्ट्राशीच आहे!**

केशव उपाध्ये

**TV has lost its vision**

Ravish Kumar

**दो राहे पे... चौथा खम्भा**

विश्वदीपक

**देशद्रोह कशाला म्हणतात?**

राजेंद्र साठे

'ग्रंथाली' वाचकदिन क्षणचित्रे

## 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम', 'ग्रंथाली', 'ज्योती स्टोअर्स' आणि 'शंकराचार्य न्यास' यांच्या संयुक्त विद्यमाने



'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'चे संपादक दिनकर गांगल



वसंत खैरनार, ज्योती स्टोअर्स



प्रभाकर जोशी (लेखक)



प्रशांत कन्हाडे, 'ॲप'ली ग्रंथाली



मुक्ता चैतन्य डॉ. उमेश मुंडल्ये यांची मुलाखत घेताना



मुक्ता चैतन्य सुजाता रायकर यांची मुलाखत घेताना



'ग्रंथाली'चे प्रभाकर जोशी लिखित 'माझे स्वप्न : डॉ. मार्टिन ल्यूथर किंग, ज्युनिअर' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्यासमयी प्रशांत कन्हाडे, राजा मोगल, लेखक प्रभाकर जोशी, सुजाता रायकर, डॉ. उमेश मुंडल्ये आणि मुक्ता चैतन्य

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

मार्च, वर्ष तिसरे
अंक अकरावा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
अतिथी संपादक : आल्हाद गोडबोले

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रम

**अविवेकाच्या अंधारात / ४**
– आल्हाद गोडबोले
**द्रोह सार्वभौम आणि संविधानिक राष्ट्राशीच आहे! / ६**
– केशव उपाध्ये
**TV has lost its vision / 8**
- Ravish Kumar
**दो राहे पे... चौथा खम्भा / ११**
– विश्वदीपक
**देशद्रोह कशाला म्हणतात? / १४**
– राजेंद्र साठे
**तू इस तरहा से मेरी जिंदगी में शामील है / १६**
– इब्राहिम अफगाण
**निदा फाजलीची कविता / २४**
– स्वैर अनुवाद : चंद्रशेखर सानेकर
**प्रेमाचा सुवास / २८**
– अरुण जाखडे
**शर्वरी : स्त्रीसुखाची कविता / ३१**
– द.भि. कुलकर्णी
**नास्तिकांचे अध्यात्म / ३२**
– दिलीप करंबेळकर
**आजारी सिलिकॉन व्हॅली / ३६**
– डॉ. अनंत पां. लाभसेटवार
**नाशिक वृत्तांत / ४०**

**ग्रंथपाने / ४३**
मैत्रेय प्रकाशन, लोकवाङ्मय प्रकाशन, रोहन प्रकाशन, मौज प्रकाशन

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / ४७**
चांगदेव काळे



# अविवेकाच्या अंधारात

***कोणतीही बातमी तपासून घेण्याची नैतिकता विसरत चाललेल्या आणि भडक पत्रकारितेच्या चढाओढीत विवेकाचे भान सुटलेल्या दूरचित्रवाहिन्यांनी आणि माध्यमांनी जेएनयुतील नाजूक विषय हाताळताना साऱ्या देशाची – देशभक्त आणि राष्ट्रद्रोही अशा दोन वर्गांत – जणू विभागणीच करून टाकली. राजकारण्यांच्या ते पथ्यावरच पडले. पण अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार ही अन्यायाच्या भावनेने भरलेल्या प्रेशर कुकरची शिट्टी असते. ती कुकरच्या म्हणजेच भारतासारख्या लोकशाही राष्ट्राच्या हिताची असते. ती काढून टाकणे धोकादायक ठरू शकते. जगात आणि आसपास याची उदाहरणे दिसत असताना देशप्रेमाच्या हत्याराचा वापर करून आपण काय करून ठेवत आहोत, याचा विचार विवेकबुद्धी शाबूत असणाऱ्या प्रत्येक माणसानेही करायला हवा.***

भल्या सकाळी अमेरिकेतून फोन आला.

'तू देशप्रेमी की, राष्ट्रद्रोही?'

प्रश्न विचारणारा परदेशात राहून आपल्या देशावर प्रेम करणारा भारतीय आहे, हे लक्षात घेऊन 'या मातृभूमीचा (चुकून इंडियाचा नागरिक म्हटले जाऊ नये, म्हणून!) देशभक्त नागरिक' असे काही शब्द जुळवू लागलो.

'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत' वगैरे प्रतिज्ञाही आठवायला लागलो.

पण मला एकदम चार्ल्स डिकन्सची कॉलेजात शिकताना वाचलेली 'ए टेल ऑफ टू सिटीज' कादंबरी आठवली. त्यात स्वेटर विणण्याच्या बहाण्याने राजनिष्ठ – पण क्रांतिकारकांच्या लेखी राजद्रोही असणाऱ्यांची यादी बनवणारी महिला (बहुधा मादाम दफार्ज) आठवली. आपल्या देशातही अशी यादी तयार होऊ लागली असल्याचे मी अनुभवत होतो.

मागील खेपेस जातीनिहाय खानेसुमारी झाली, तशी आता देशप्रेमी आणि राष्ट्रद्रोही अशा दोनच वर्गांतील जनगणनाही सुरु झाली असावी, असे अनिवासी भारतीयाला का वाटले असावे? कारण उघड होते.

राजधानी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात ९-१० फेब्रुवारी दरम्यान आणि पाठोपाठ जे काही घडले, त्यानंतर कन्हैय्या कुमार, खालिद उमर आणि अनिर्बन भट्टाचार्य यांच्यावरील देशद्रोहाचा आरोप मान्य असणारेच फक्त देशभक्त ठरवले जाऊ लागले. या तिघांचा गुन्हा होता, संसदेवरील हल्ल्याच्या कटाचा सूत्रधार अफझल गुरु याच्या 'न्यायालयीन हत्ये'बद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांची सभा बोलावणे. त्यावेळी 'पाकिस्तान झिंदाबाद' अशा घोषणा दिल्या गेल्या, असे दूरचित्रवाहिन्यांवरून व्हिडीओ टेप्सचा हवाला देऊन सांगितले गेले होते. आपण अशा देशविरोधी घोषणा दिलेल्या नाहीत, असे कन्हैय्या सांगत असूनही त्याच्यावर तसा आरोप ठेवून त्याला पकडले गेले आणि आता प्रत्यक्षात या टेप्स बनावट असल्याचे चौकशीतून पुढे येत आहे. विशेष म्हणजे, कन्हैय्याविरुद्धच्या फिर्यादीत या देशद्रोही घोषणेचा उल्लेख केलेला नाही.




मग देशद्रोह कोणता?

अफझलची फाशी 'न्याय्य' नसल्याचे मत व्यक्त करणे, हा?

तो तर हजारो भारतीय करतात.

केंद्रीय गृहमंत्रीपदावर पी. चिदम्बरम यांच्या जागी सुशीलकुमार शिंदे आल्यावर त्यांनी अफझलच्या फाशीचा मार्ग मोकळा केला आणि अफझलला ९ फेब्रुवारी २०१३ रोजी फासावर चढविण्यात आले. याच अफझलचा संसदेवरील हल्ल्याच्या कटातील सहभागाचा आरोप शंकास्पद असल्याचे खुद्द चिदम्बरम यांनी इकॉनॉमिक टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. 'जेएनयु'चा विद्यार्थी नेता कन्हैय्या कुमार याचेही असे मत आहे. त्याच्याशी सहमत होणाऱ्या चिदम्बरम यांच्यापासून शेकडो पत्रकार, विद्यार्थी, सामान्य माणसांपर्यंत हजारो देशवासियांना याच न्यायाने उद्या देशद्रोहाचे कलम लावले जाऊ शकते.

बाकी राहू दे, खुद्द जेएनयुतील – कन्हैय्याच्या विरोधातील – अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या तीन पदाधिकाऱ्यांनी आपल्याला देशद्रोही ठरविले जाण्याच्या भीतीने अभाविपचा

राजीनामा दिला आहे. हेच 'लॉजिक' वापरायचे, तर एनडीटीव्हीच्या रवीश कुमारपासून विश्वदीपक आणि राजेंद्र साठेपर्यंत अनेक, आणि त्यांच्या म्हणण्यात तथ्य आहे असे वाटणारा मीही, देशद्रोही ठरू शकतात.

म्हणून मी अमेरिकेतील मित्राला उत्तर दिले, 'हो, मी देशद्रोही आहे.'

जेएनयुतील बंडखोरांना पाकिस्तानातील दहशतवादी हाफिज सईद याची फूस असल्याचे केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंह यांनी जाहीरपणे सांगितले होते. आता तेही 'ऐकीव' असल्याचे सांगितले जाते. पण वाहिन्यांवरील लढाऊ 'अँकर्स'नी मात्र हे 'सत्य' घसा खरवडून आपल्यापुढे आणले होते.

म्हणजे आपण देशद्रोही नसल्याच्या कन्हैय्याच्या दाव्यात तथ्य होते. तरीही पोलिसांनी त्याला हाडे तुटेपर्यंत आणि भर न्यायालयाच्या आवारात काळा कोट घातलेल्या 'वकिलां'नी तो चड्डीत मुतेपर्यंत मारले.

जेएनयुत जे राष्ट्रहितविरोधी घडल्याचे सांगितले गेले, त्याची शहनिशा केल्याशिवाय बातमी देण्याच्या चढाओढीत जे 'अँकर्स' आघाडीवर होते, ते अजूनही देशभक्त मानले जात आहेत. बाकी सारे राष्ट्रद्रोही. कारण, ते तारतम्य आणि सारासारविवेकबुद्धी शाबूत ठेवण्याचा गुन्हा करीत आहेत.

या गुन्हेगारांना आणि त्यांच्या म्हणण्यात तथ्य आहे, असे वाटणाऱ्यांना वाचकांच्या न्यायालयापुढे आणण्याच्या हेतूने रवीश कुमार यांचा इंग्लिश, विश्वदीपक यांचा हिंदी आणि राजेंद्र साठे यांचा मराठी असे तीन भाषांमधील तीन तसेच सरकार आणि पोलिस म्हणजे प्रशासन आणि देशप्रेमी यांची बाजू मांडणारा, केशव उपाध्ये यांचा असे चार प्रातिनिधिक लेख रुचीच्या या अंकात प्रसिद्ध करीत आहोत.

वास्तविक राजद्रोहाचा कायदा हा आपल्यावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांनी त्यांच्या सोयीसाठी केलेला होता. त्यामुळे टिळकांपासून सावरकरांपर्यंत अनेकांना त्यांनी देशद्रोही ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली तरी आपल्यासाठी ते महान लोकमान्य आणि स्वातंत्र्यवीर ठरले. आपल्या लोकशाहीत तर जनतेचे लाडके असलेले सत्ताधाऱ्यांच्या लेखी देशद्रोही ठरविले गेल्याची आणि देशद्रोही हे सत्ताधाऱ्यांचे लाडके ठरल्याची कितीतरी उदाहरणे दाखविता येतात.

डॉ. विनायक सेन नक्षलवाद्यांच्या दृष्टीने गोरगरिबांचे त्राते असू शकतात. पटेल समाजाचे पुढारी हार्दिक पटेल, व्यंगचित्रकार असीम त्रिवेदी, आमदार अकबरुद्दिन ओवैसी, लेखिका अरुंधती रॉय किंवा विश्व हिंदू परिषदेचे नेते प्रवीण तोगडिया आदींना कायद्याने देशद्रोही ठरविले जात असल्याचे काही वाटत नाही. सत्ताधारी केंद्रीय मंत्री असूनही रामविलास पासवान कन्हैय्याबद्दलची सहानुभूती जाहीर सभेत व्यक्त करू शकतात.

घटनेने स्वीकारलेल्या उदारमतवादामुळे या देशात हिंसक मिझो चळवळीचा नेता लाल डेंगा मिझोरामचा मुख्य मंत्री होऊ



शकतो. खलिस्तान चळवळीचा सूत्रधार जगजितसिंग चौहान याचे भारतात परत आणून पुनर्वसन केले जाते. इंदिरा गांधी यांच्या मारेकऱ्यांना हुतात्मा म्हणून गौरविले जाते आणि त्याहून गंभीर गुन्हे नावावर असणारे शंभराहून अधिक खासदार असलेला पक्ष केंद्रात सत्तेवर येऊ शकतो.

मुद्दा हा की, घटनेने अभिव्यक्तिस्वातंत्र्य स्वीकारलेल्या लोकशाही राष्ट्रात देशद्रोहाचा कायदाच निरर्थक आणि भंपकपणाचा ठरतो. म्हणजे प्रत्येकाला स्वतःला योग्य वाटेल ते मत व्यक्त करण्याचा अधिकार आपण देणार, पण त्याचबरोबर ते व्यक्त केल्यास देशद्रोहीही ठरविणार!

शेवटी पुन्हा एकदा चार्ल्स डिकन्स. 'टेल ऑफ टू सिटीज'ची सुरुवात तो या विधानाने करतो -

It was the best of times, it was the worst of times, it was the age of wisdom, it was the age of foolishness, it was the epoch of belief, it was the epoch of incredulity, it was the season of Light, it was the season of Darkness, it was the spring of hope, it was the winter of despair, we had everything before us, we had nothing before us, we were all going direct to Heaven, we were all going direct the other way - in short, the period was so far like the present period, that some of its noisiest authorities insisted on its being received, for good or for evil, in the superlative degree of comparison only.

फ्रेंच राज्यक्रांतीला सव्वादोनशे, रशियन क्रांतीला शंभर, तर पश्चिम आशियातील अरब स्प्रिंग किंवा क्रांतीला जेमतेम दोन वर्षे होत असताना आपल्या देशावासियांनाही क्रांतीची स्वप्ने पडू लागली आहेत. ही त्याचीच तर पहाट नसेल ? की, देशप्रेमाच्या मशाली घेऊन आणखी अंधाऱ्या गुहेकडची वाटचाल?

– आल्हाद गोडबोले
alhadgodbolegmail.com
भ्रमणध्वनी : ९५९४५४४८८८



# द्रोह सार्वभौम आणि संविधानिक राष्ट्राशीच!

**केशव उपाध्ये** (प्रवक्ता, राज्य भाजपा)

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील घटनेवरून देशात सध्या जो गदारोळ सुरू आहे तो केवळ दुर्दैवीच नाही तर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण करणारा आहे. जेएनयुमध्ये अफजल गुरूच्या फाशीदिनाच्या निमित्ताने एक कार्यक्र म झाला आणि त्यात भारतविरोधी घोषणा देण्यात आल्या. त्यांचे समर्थन होऊच शकत नाही. अशा प्रवृत्तींच्या विरोधात कठोर भूमिका घ्यायलाच हवी. मात्र समाजातील बेगडी धर्मनिरपेक्षतावादी आणि ढोंगी बुध्दिजिवी मात्र ही चर्चा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली भलतीकडे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. घडलेली घटना दुर्दैवी आहे पण कारवाई नको, अभिव्यक्ती स्वातंत्र्य असले पाहिजे असे लंगडे समर्थन सुरू झाले. त्यात कॉंग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी यांनी तर कारवाई विरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पाठिंबा देत कळसच केला.

घटनात्मक लोकशाहीशी आम्ही प्रामाणिक आहोत मात्र जर असेलच द्रोह तर तो हिंदु राष्ट्राशी आहे, असा नवा अजब पवित्रा घेत काही जण जेएनयुतील घटनांचं केवळ उदात्तीकरणच नव्हे तर बुध्दिभेद करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्या अफझल गुरूला संसदेवर हल्ला केला म्हणून फाशी देण्यात आले, ती फाशी काय हिंदू संसदेवर हल्ला करण्यासाठी झाली होती? त्याला फाशी तर सार्वभौम भारताच्या संसदेवर हल्ला केला म्हणून न्यायालयात रीतसर खटला भरून व त्याला बचावाची संधी देऊन झाली होती.

राष्ट्रभक्तीचे सर्टिफिकेट आम्हाला भाजपा- संघवाल्याकडून नको असेही एक विधान करण्यात येत आहे. राष्ट्रभक्तीचं प्रमाणपत्र कुणी कुणाकडून घेण्याची गरज नाही, पण देशाच्या बर्बादीच्या घोषणा देणारे लोक कोणाच्या राष्ट्रभक्तीच्या निकषात बसतात याचेही स्पष्टीकरण मिळण्याची गरज आहे. खरं तर काही विषय राजकारणाच्या आणि निवडणुकांच्या पलीकडचे असतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची जपमाळ ओढणारे लोक हे विसरतात की देश अस्तित्वात राहिला तरच अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि लोकशाही टिकेल.

देशातील विविध विचारांचा सन्मान झालाच पाहिजे. विविधतेत एकता हे तर आपल्या देशाचं वैशिष्ट्यच आहे. विचारांबद्दलची सहिष्णुता इथल्या मातीतच आहे. त्यामुळे वैचारीक स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीला इथे प्राधान्य आहेच. पण याचा अर्थ देशाच्या अस्तित्वाला कुणी आव्हान द्यावे, असे होत नाही. स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीपण येते.

फाशीची शिक्षा असावी की नसावी यावर जरूर चर्चा होऊ शकते. पण भारतीय घटनेने फाशीची शिक्षा स्वीकारलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेतील तरतुदीनुसार सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, अफझल गुरू वा याकूब मेमन याना बचावाची पूर्ण संधी दिल्यानंतर झालेल्या फाशीला ही मंडळी न्यायालयीन खून कसं म्हणू शकतात?

केवळ चार गरीब बिचारी पोरं, त्यांनी देशविरोधी घोषणा दिल्या म्हणून काही होत नाही, हा युक्तिवादसुध्दा फोल आहे. कारण अशा घटना काही पहिल्यांदाच घडत नाही. मुळात ही गरीब बिचारी पोरं हा युक्तिवादच चुकीचा आहे. गरीब असणे म्हणजे देशविरोधी घोषणा देण्याचा परवाना नव्हे. २०११ मध्ये याच डेमॉक्रॅटिक स्टुडन्ट युनियनने अरूधंती रॉय यांचं भाषण आयोजित केलं होत आणि त्याच कार्यक्रमात त्यांनी काश्मीरमध्ये सैनिक मारले जाण्याचं समर्थन करणार वक्तव्य केलं होतं. लोकशाही आणि एकांगी अभिव्यक्ती स्वातंत्र्य फक्त एकाच गटाला म्हणजे या ढोंगी धर्मनिरपेक्षतावादी आणि बुध्दिजिवींनाच आहे काय? ज्या स्वायत्त चिंतनाचा दाखला देऊन जेएनयुचे वेगळेपण सांगण्याचा प्रयत्न होतो त्याच जेएनयुमध्ये बाबा रामदेव यांना कार्यक्र म करायला विरोध झाला, ही घटना फार जुनी नाही. त्यावेळी अभिव्यत्ती स्वातंत्र्याचे पाठीराखे कुठे लपले होते ?

जेएनयुतील एका अटकेवरून लगेच दमनशाही आणि आणीबाणी काही जणाना आठवली. पण खऱ्या आणीबाणीपासून अनेक घटना या देशात घडत असताना किती जणांनी त्या दमनशाहीविरोधात आवाज उठविला होता? किती जणांनी पुरस्कार परत केले होते? देशविरोधी घोषणा देणाऱ्याला नुसती अटक झाली तर धाय मोकलून गळा काढणाऱ्या मंडळीना केरळमध्ये एका संघ स्वयंसेवकाची त्याच्या आईवडिलांसमोर हत्या झाली तेव्हां मात्र साधा निषेधही नोंदवावासा वाटला नाही.

**– केशव उपाध्ये**

# पद्मगंधा.कॉम

## ‘पद्मगंधा.कॉम’ वर पुस्तके खरेदी करा आणि मिळवा सर्व पुस्तकांवर २०% सूट



**अन्नपूर्णा**

मूळ किंमत ₹ १७० । सवलतीत ₹ १३५



**श्रीपर्वताच्या छायेत**

मूळ किंमत ₹ ३१० । सवलतीत ₹ २४८



**त्रिविधा**

मूळ किंमत ₹ २०० । सवलतीत ₹ १६०



**मर्गोत्रा. मिथिकांचा**

मूळ किंमत ₹ १८० । सवलतीत ₹ १४४



**भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र**

मूळ किंमत ₹ १२०० । सवलतीत ₹ ९६०



**जंगलातले मूड्स**

मूळ किंमत ₹ ३२० । सवलतीत ₹ २५६



**घर सैनिकाचे**

मूळ किंमत ₹ ३०० । सवलतीत ₹ २४०



**गालिबचे उर्दू काव्यविश्व**
अर्थ आणि भाष्य

मूळ किंमत ₹ ५३० । सवलतीत ₹ ४२५



**कलर्स ऑफ द प्रिझन**

मूळ किंमत ₹ १६० । सवलतीत ₹ १३०



**तात्पर्य**

मूळ किंमत ₹ २०० । सवलतीत ₹ १६०



**आणखी, एक गाठूड**

मूळ किंमत ₹ २६० । सवलतीत ₹ २०८



**ध्वनिमुद्रिकांच्या दुनियेत**

मूळ किंमत ₹ १६० । सवलतीत ₹ १३०

**पद्मगंधा प्रकाशन**
१९६६, तारा-भुवन माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९९७६
**Website:** www.padmagandha.com **Email-id:** p.padmagandha@gmail.com | info@padmagandha.com
**Facebook:** www.facebook.com/pages/Padmagandha-Prakashan

 

# TV has lost its vision

## Ravish Kumar

I don't remember what time it was when I returned from the march by journalists on Tuesday and fell asleep.

Crossing several time zones and nations, I had a lot of sleep to catch up on. I woke up with a start to the sound of shouting from below.

For a moment, the sounds made me feel as if I was still in a different country, in a different time zone. Despite an evening drizzle, the heat radiating from the cries outside seemed to scorch the earth dry. They were shouting about coming into homes and killing people. The violence in their words weighed me down. I couldn't find a place of refuge between those cries of murder and the calls of shooting people being heard on TV. It was as if I could see a target drawn on the backs of everyone I knew.

As streets rang out with slogans against JNU, TV anchors kept people tied up in debates. Delhi's Dwarka and Rajendra Nagar were witness to such rallies. It seemed the media couldn't care less that with these shrieks, an air of dangerous and violent animosity towards the JNU was being fanned. I cannot give a count, but I can say for sure that such violent marches have walked through many a neighbourhood, markets and malls.

In the WhatsApp group of a Residents' Welfare Association or RWA as they are known in Delhi, a screenshot has been shared. It says "This girl is a supporter of Afzal Guru - the Parliament attack convict". In one such message, I saw that she has been circled in black in a photograph. Alongside her name, it says "This girl is a Bengali and her photo should be shared so widely that the whole world finds out that she is a supporter of Afzal". The girl in the photograph is part of a protest by JNU students.

We journalists have often been profiled like this and we have had countless rumours spread about us - like how we are enemies of the State; there has even been a tweet that claims Ravish Kumar is hundred per cent born of a prostitute. Though I consider my mother a real Mother India, I have no qualms in calling a prostitute my mother either.

But I had not thought that a next-door girl could one day be profiled and targeted like that.

The fact that members of a Residents' Welfare Association will target a young woman makes it even more dangerous. Maybe she doesn't live in that area, but if this habit has invaded us, can you imagine what is waiting to happen? Isn't this against the

fundamentals of our independence? First, they measured the length of their skirts and now they are gauging the angle of their political leaning. Watching over gates of the neighbourhood, they will soon become watchdogs breathing down our necks.

People of such ideologies - are they recent additions to our societies or have they only recently started working for such ideologies? This is something that people, especially the youth, have to think about. Tomorrow, one of them will click a picture or lift a comment from Facebook and make it go viral saying that a girl called Antara skips college to hang out with a boy called Rajiv from Sector 6. Circulate this picture so much that her parents find out about her misadventures. This was the language of that WhatsApp message. If a young man or woman doesn't understand the perils of such a thing, then it really is a worrying day for our country.

Will we in the name of nationalism let our independence be hijacked by thugs like these? What if one day these people lynch those kids in the name of saving our culture? Or what if those kids kill themselves out of that embarrassment?

Social media is increasingly becoming a tool to stifle the freedom of citizens. The possibilities it once showed have been eclipsed today. These incidents are not being reported in the media today because people are fixated in front of debate shows on TV watching "patriots" and "traitors" take shots at each other while with the powers of organisation, a conspiracy to rob the independence of people spreads unabated. As if the entire plan was already laid out.

En masse, television started making traitors out of people. Anchors kept on yelling and perceptions kept on perpetuating. And I kept drowning in the din of such savage voices. It felt like we were losing the balance, like something was being overdone. The question



wasn't of right or wrong. When we start feeling that our word is the final one, that is the time to stop and reflect. We must give space to doubt. And question once more.

We have often heard such tales of control within an organisation, but the spread of such control within our society is new. Streets seething with slogans against JNU and homes of its supporters marked out, targeted - this is not benign. A social order emanating from a political order, and a political order from a social one. If you think this is right, then please pass around sweets in your neighbourhood and bid goodbye to your home because you have welcomed in a new guardian for your children, congratulations.

This is that noise that I wanted to talk to you about. That's why we turned off the lights so that in the darkness we can have a word and yet not be marked out. So that you can hear what we say.

To stroke their ideologies, TV anchors have turned debates into firestorms - burning down all semblance of reason and basking in the drama. Some on such shows cower in fear while others blare on about anything and everything. We have made mistakes before and questions have been raised but we haven't mended our ways.

I did not host this episode of Prime Time to "fix" television, but merely in the hope that when we find ourselves in such darkness, we also find it within to ask questions or stop and reflect. We did it today, somebody did it yesterday, and someone else will do it tomorrow. But for now, television has lost its vision. Debate TV is butchering spaces for logic and reason. It is being used to slaughter public opinion. But let no one remain under the illusion that TV is dying; it is those watching it who are.

I am grateful that you liked Prime Time. But I have to ask a question. The way you spoke out made it seem like you were living in fear and then something gave you the courage to step out. As you were making that episode go viral, I don't know why but I felt as if you were reaching out to someone else to hold their hand - searching for a semblance of courage. But honestly, if in your reaction, there is an element of coming out of fear, then I am not happy about how popular the show has been. I am worried. Do tell me, why are you afraid? Who are you afraid of? Don't give in to the crowd. Get out a little. Out of your home and out of your fear. You should not fear the fearful.

**(Ravish Kumar is Senior Executive Editor, NDTV India)**

# दो राहे पे... चौथा खम्भा

विश्वदीपक

*घटना कोणतीही असो; दूरचित्रवाहिन्यांनी ती कशी सादर करावी, हे पत्रकारितेचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये शिकवले जाते. पण प्रत्यक्ष पत्रकारितेत– विशेषत: दूरचित्रवाहिन्यांमध्ये काम करणाऱ्यांना – अनुभवावे लागते, ते वेगळेच. विश्वदीपक हा एका राष्ट्रीय वाहिनीचा पत्रकार गेले वर्षभर, तिथे काम करताना घुसमटत होता. अखेर 'जेएनयू'च्या वार्तांकनाचा उबग येऊन त्याने राजीनामा दिला. त्याचे हे पत्र... पुरेसे बोलके आहे!*

हम पत्रकार अक्सर दूसरों पर सवाल उठाते हैं लेकिन कभी खुद पर नहीं। हम दूसरों की जिम्मेदारी तय करते हैं लेकिन अपनी नहीं। हमें लोकतंत्र का चौथा खंभा कहा जाता है लेकिन क्या हम, हमारी संस्थाएं, हमारी सोच और हमारी कार्यप्रणाली लोकतांत्रिक है? ये सवाल सिर्फ मेरे नहीं है। हम सबके हैं।

'जेएनयू स्टुडंटस् युनियन'के अध्यक्ष कन्हैया कुमार को 'राष्ट्रवाद' के नाम पर जिस तरह से फ्रेम किया गया और मीडिया ट्रायल करके 'देशद्रोही' साबित किया गया, वो बेहद खतरनाक प्रवृत्ति है। हम पत्रकारों की जिम्मेदारी सत्ता से सवाल करना है ना की सत्ता के साथ संतुलन बनाकर काम करना। पत्रकारिता के इतिहास में हमने जो कुछ भी बेहतर और सुंदर हासिल किया है, वो इन्ही सवालों का परिणाम है।

'जेएनयू स्टुडंटस् युनियन'के अध्यक्ष कन्हैया कुमार को 'राष्ट्रवाद' के नाम पर जिस तरह से फ्रेम किया गया और मीडिया ट्रायल करके 'देशद्रोही' साबित किया गया, वो बेहद खतरनाक प्रवृत्ति है। हम पत्रकारों की जिम्मेदारी सत्ता से सवाल करना है ना की सत्ता के साथ संतुलन बनाकर काम करना। पत्रकारिता के इतिहास में हमने जो कुछ भी बेहतर और सुंदर हासिल किया है, वो इन्ही सवालों का परिणाम है।

सवाल करना या न करना हर किसी का निजी मामला है लेकिन मेरा मानना है कि जो पर्सनल है वो पॉलिटिकल भी है। एक ऐसा वक्त आता है जब आपको अपनी पेशेवर जिम्मेदारियों और अपनी राजनीतिक–समाजिक पक्षधरता में से किसी एक पाले में खड़ा होना होता है। मैंने दूसरे को चुना है और अपने संस्थान 'ज़ी न्यूज़' से इन्ही मतभेदों के चलते १९ फरवरी को इस्तीफा दे दिया है।

मेरा इस्तीफा इस देश के लाखों–करोड़ों कन्हैयाओं और जेएनयू के उन दोस्तों को समर्पित है जो अपनी आंखों में सुंदर सपने लिए संघर्ष करते रहे हैं, कुर्बानियां देते रहे हैं।

(ज़ी न्यूज़ के नाम मेरा पत्र जो मेरे इस्तीफ़े में संलग्न है)

प्रिय ज़ी न्यूज़,

एक साल ४ महीने और ४ दिन बाद अब वक्त आ गया है कि मैं अब आपसे अलग हो जाऊं। हालांकि ऐसा पहले करना चाहिए था लेकिन अब भी नहीं किया तो खुद को कभी माफ़ नहीं कर सकूंगा।

आगे जो मैं कहने जा रहा हूं वो किसी भावावेश, गुस्से या खीझ का नतीज़ा नहीं है, बल्कि एक सुचिंतित बयान है। मैं पत्रकार होने से साथ–साथ उसी देश का एक नागरिक भी हूं जिसके नाम अंध 'राष्ट्रवाद' का ज़हर फैलाया जा रहा है और इस देश को गृहयुद्ध की तरफ धकेला जा रहा है। मेरा नागरिक दायित्व और पेशेवर जिम्मेदारी कहती है कि मैं इस ज़हर को फैलने से रोकूं। मैं जानता हूं कि मेरी कोशिश नाव के सहारे समुद्र पार करने जैसी है लेकिन फिर भी मैं शुरुआत करना चाहता हूं. इसी सोच के तहत 'जेएनयू स्टुडंटस् युनियन' अध्यक्ष कन्हैया



कुमार के बहाने शुरू किए गए अंध राष्ट्रवादी अभियान और उसे बढ़ाने में हमारी भूमिका के विरोध में मैं अपने पद से इस्तीफा देता हूं। मैं चाहता हूं इसे बिना किसी वैयक्तिक द्वेष के स्वीकार किया जाए।

असल में बात व्यक्तिगत है भी नहीं। बात पेशेवर जिम्मेदारी की है। सामाजिक दायित्वबोध की है और आखिर में देशप्रेम की भी है। मुझे अफसोस के साथ कहना पड़ रहा है कि इन तीनों पैमानों पर एक संस्थान के तौर पर तुम तुमसे जुड़े होने के नाते एक पत्रकार के तौर पर मैं पिछले एक साल में कई बार फेल हुए।

मई २०१४ के बाद से जब से श्री नरेन्द्र मोदी भारत के प्रधानमंत्री बने हैं, तब से कमोबेश देश के हर न्यूज़ रूम का सांप्रदायीकरण (Communalization) हुआ है लेकिन हमारे यहां स्थितियां और भी भयावह हैं। माफी चाहता हूँ इस भारी भरकम शब्द के इस्तेमाल के लिए लेकिन इसके अलावा कोई और दूसरा शब्द नहीं है. आखिर ऐसा क्यों होता है कि ख़बरों को मोदी एंगल से जोड़कर लिखवाया जाता है ? ये सोचकर खबरें लिखवाई जाती हैं कि इससे मोदी सरकार के एजेंडे को कितना गति मिलेगी?

**हो सकता है कि हम इनकी राजनीति से असहमत हों या इनके विचार उग्र हो, लेकिन ये देशद्रोही कैसे हो गए? कोर्ट का काम हम कैसे कर सकते हैं? क्या ये महज इत्तफाक है कि दिल्ली पुलिस ने अपनी फरियादमें ज़ी न्यूज का संदर्भ दिया है? ऐसा कहा जाता है कि दिल्ली पुलिस से हमारी सांठगांठ है ? बताइए कि हम क्या जवाब दे लोगों को?**

हमें गहराई से संदेह होने लगा है कि हम पत्रकार हैं। ऐसा लगता है जैसे हम सरकार के प्रवक्ता हैं या सुपारी किलर हैं? मोदी हमारे देश के प्रधानमंत्री हैं, मेरे भी है; लेकिन एक पत्रकार के तौर इतनी मोदी भक्ति अब हजम नहीं हो रही है? मेरा ज़मीर मेरे खिलाफ बग़ावत करने लगा है। ऐसा लगता है जैसे मैं बीमार पड़ गया हूं।

हर खबर के पीछे एजेंडा, हर न्यूज़ शो के पीछे मोदी सरकार को महान बताने की कोशिश, हर बहस के पीछे मोदी विरोधियों को शूट करने की प्रयास? अटैक, युद्ध से कमतर कोई शब्द हमें मंजूर नहीं. क्या है ये सब? कभी ठहरकर सोचता हूँ तो लगता है कि पागल हो गया हूँ।

आखिर हमें इतना दीन हीन, अनैतिक और गिरा हुआ क्यों बना दिया गया? देश के सर्वोच्च मीडिया संस्थान से पढ़ाई करने और आजतक से लेकर बीबीसी और डॉयचे वेले, जर्मनी जैसे प्रतिष्ठित संस्थानों में काम करने के बाद मेरी पत्रकारीय जमापूंजी यही है कि लोग मुझे छी 'न्यूज़ पत्रकार' कहने लगे हैं। हमारे ईमान (Integrity) की धज्जियां उड़ चुकी हैं। इसकी जिम्मेदारी कौन लेगा?

**किसी शख्स की जिंदगी में जो सबसे बड़ा कलंक लग सकता है वो है - देशद्रोह। लेकिन सवाल ये है कि एक पत्रकार के तौर पर हमें क्या हक है कि किसी को देशद्रोही की डिग्री बांटने का? ये काम तो न्यायालय का है न?**

तकलीफ हुई थी तब भी, लेकिन बर्दाश्त कर गया था।

लेकिन कब तक करूँ और क्यों??



मुझे ठीक से नींद नहीं आ रही है। बेचैन हूं मैं। शायद ये अपराध बोध का नतीजा है। किसी शख्स की जिंदगी में जो सबसे बड़ा कलंक लग सकता है वो है - देशद्रोह। लेकिन सवाल ये है कि एक पत्रकार के तौर पर हमें क्या हक है कि किसी को देशद्रोही की डिग्री बांटने का? ये काम तो न्यायालय का है न?

कन्हैया समेत जेएनयू के कई छात्रों को हमने लोगों की नजर में 'देशद्रोही' बना दिया. अगर कल को इनमें से किसी की हत्या हो जाती है तो इसकी जिम्मेदारी कौन लेगा? हमने सिर्फ किसी की हत्या और कुछ परिवारों को बरबाद करने की स्थिति पैदा नहीं की है बल्कि दंगा फैलाने और गृहयुद्ध की नौबत तैयार कर दी है। कौन सा देशप्रेम है ये? आखिर कौन सी पत्रकारिता है ये?

क्या हम बीजेपी या आरएसएस के मुखपत्र हैं कि वो जो बोलेंगे वहीं कहेंगे? जिस वीडियो में 'पाकिस्तान जिंदाबाद' का नारा था ही नहीं उसे हमने बार-बार हमने उन्माद फैलाने के लिए चलाया। अंधेरे में आ रही कुछ आवाज़ों को हमने कैसे मान लिया की ये कन्हैया या उसके साथियों की ही है? 'भारतीय कोर्ट ज़िंदाबाद' को पूर्वाग्रहों के चलते 'पाकिस्तान जिंदाबाद' सुन लिया और सरकार की लाइन पर काम करते हुए कुछ लोगों का करियर, उनकी उम्मीदें और परिवार को तबाही की कगार तक पहुंचा दिया। अच्छा होता कि हम एजेंसीज को जांच करने देते और उनके नतीजों का इंतज़ार करते।

लोग उमर खालिद की बहन को रेप करने और उस पर एसिड अटैक की धमकी दे रहे हैं। उसे गद्दार की बहन कह रहे हैं। सोचिए ज़रा अगर ऐसा हुआ तो क्या इसकी जिम्मेदारी हमारी नहीं होगी ? कन्हैया ने एक बार नहीं हज़ार बार कहा कि वो देश विरोधी नारों का समर्थन नहीं

करता लेकिन उसकी एक नहीं सुनी गई, क्योंकि हमने जो उम्माद फैलाया था वो 'एनडीए' सरकार की लाइन पर था। क्या हमने कन्हैया के घर को ध्यान से देखा है? कन्हैया का घर, 'घर' नहीं। इस देश के किसानों और आम आदमी की विवशता का दर्दनाक प्रतीक है। उन उम्मीदों का कब्रिस्तान है जो इस देश में हर पल दफ्न हो रही हैं। लेकिन हम अंधे हो चुके हैं!

**हमें गहराई से संदेह होने लगा है कि हम पत्रकार हैं। ऐसा लगता है जैसे हम सरकार के प्रवक्ता हैं या सुपारी किलर हैं? मोदी हमारे देश के प्रधानमंत्री हैं, मेरे भी है; लेकिन एक पत्रकार के तौर इतनी मोदी भक्ति अब हजम नहीं हो रही है?**

मुझे तकलीफ हो रही है इस बारे में बात करते हुए लेकिन मैं बताना चाहता हूं कि मेरे इलाके में भी बहुत से घर ऐसे हैं। भारत का ग्रामीण जीवन इतना ही बदरंग है। उन टूटी हुई दीवारों और पहले से ही कमजोर हो चुकी जिंदगियों में हमने राष्ट्रवादी ज़हर का इंजेक्शन लगाया है, बिना ये सोचे हुए कि इसका अंजाम क्या हो सकता है! अगर कन्हैया के लकवाग्रस्त पिता की मौत सदमें से हो जाए तो क्या हम जिम्मेदार नहीं होंगे? 'द इंडियन एक्सप्रेस' ने अगर स्टोरी नहीं की होती तो इस देश को पता नहीं चलता कि वंचितों के हक में कन्हैया को बोलने की प्रेरणा कहां से मिलती है!

रामा नागा और दूसरों का हाल भी ऐसा ही है। बहुत मामूली पृष्ठभूमि और गरीबी से संघर्ष करते हुए ये लड़के जेएनयू में मिल रही सब्सिडी की वजह से पढ़ लिख पाते हैं। आगे बढ़ने का हौसला देख पाते हैं। लेकिन टीआरपी की बाज़ारू अभीप्सा और हमारे बिके हुए विवेक ने इनके करियर को लगभग तबाह ही कर दिया है।

हो सकता है कि हम इनकी राजनीति से असहमत हों या इनके विचार उग्र हो, लेकिन ये देशद्रोही कैसे हो गए? कोर्ट का काम हम कैसे कर सकते हैं? क्या ये महज इत्तफाक है कि दिल्ली पुलिस ने अपनी फरियादमें ज़ी न्यूज का संदर्भ दिया है? ऐसा कहा जाता है कि दिल्ली पुलिस से हमारी सांठगांठ है ? बताइए कि हम क्या जवाब दे लोगों को?

आखिर जेएनयू से या जेएनयू के छात्रों से क्या दुश्मनी है हमारी? मेरा मानना है कि आधुनिक जीवन मूल्यों, लोकतंत्र, विविधता और विरोधी विचारों के सह अस्तित्व का अगर कोई सबसे खूबसूरत बगीचा है देश में तो वो जेएनयू है लेकिन इसे गैरकानूनी और देशद्रोह का अड्डा बताया जा रहा है।

मैं ये जानना चाहता हूँ कि जेएनयू गैर कानूनी है या बीजेपी का वो विधायक जो कोर्ट में घुसकर लेफ्ट कार्यकर्ता को पीट रहा था? विधायक और उसके समर्थक सड़क पर गिरे हुए 'सीपीआय' के कार्यकर्ता अमीक जमेई को बूटों तले रौंद रहे थे लेकिन पास में खड़ी पुलिस तमाशा देख रही थी। स्क्रीन पर पिटाई की तस्वीरें चल रही थीं और हम लिख रहे थे – ओपी शर्मा पर पिटाई का आरोप। मैंने पूछा कि आरोप क्यों? कहा गया 'ऊपर' से कहा गया है? हमारा 'ऊपर' इतना नीचे कैसे हो सकता है? मोदी तक तो फिर भी समझ में आता है लेकिन अब ओपी शर्मा जैसे बीजेपी के नेताओं और –एबीव्हीपी के कार्यकर्ताओं को भी स्टोरी लिखते समय अब हम बचाने लगे हैं.

**स्क्रीन पर पिटाई की तस्वीरें चल रही थीं और हम लिख रहे थे – ओपी शर्मा पर पिटाई का आरोप। मैंने पूछा कि आरोप क्यों? कहा गया 'ऊपर' से कहा गया है? हमारा 'ऊपर' इतना नीचे कैसे हो सकता है?**

घिन आने लगी है मुझे अपने अस्तित्व से। अपनी पत्रकरिता से और अपनी विवशता से। क्या मैंने इसलिए दूसरे सब कामों को छोड़कर पत्रकार बनने का फैसला बनने का फैसला किया था? शायद नहीं।

अब मेरे सामने दो ही रास्ते हैं। या तो मैं पत्रकारिता छोड़ूं या फिर इन परिस्थितियों से खुद को अलग करूं। मैं दूसरा रास्ता चुन रहा हूँ। मैंने कोई फैसला नहीं सुनाया है। बस कुछ सवाल किए हैं जो मेरे पेशे से और मेरी पहचान से जुड़े हैं। छोटी ही सही लेकिन मेरी भी जवाबदेही है। दूसरों के लिए कम, खुद के लिए ज्यादा। मुझे पक्के तौर पर अहसास है कि अब दूसरी जगहों में भी नौकरी नहीं मिलेगी। मैं ये भी समझता हूं कि अगर मैं लगा रहूंगा तो दो साल के अंदर लाख के दायरे में पहुंच जाऊंगा. मेरी सैलरी अच्छी है लेकिन ये सुविधा बहुत सी दूसरी कुर्बानियां ले रही है, जो मैं नहीं देना चाहता। साधारण मध्यवर्गीय परिवार से आने की वजह से ये जानता हूं कि बिना तनख्वाह के दिक्कतें भी बहुत होंगी लेकिन फिर भी मैं अपनी आत्मा की आवाज (consciousness) को दबाना नहीं चाहता।

मैं एक बार फिर से कह रहा हूँ कि मुझे किसी से कोई व्यक्तिगत शिकायत नहीं है। ये सांस्थानिक और संपादकीय नीति से जुडे हुए मामलों की बात है। उम्मीद है इसे इसी तरह समझा जाएगा.

यह कहना भी जरूरी समझता हूँ कि अगर एक मीडिया हाउस को अपने दक्षिणपंथी रुझान और रुचि को जाहिर करने का, बखान करने का हक है तो एक व्यक्ति के तौर पर हम जैसे लोगों को भी अपनी पॉलिटिकल लाइन के बारे में बात करने का पूरा अधिकार है। पत्रकार के तौर पर तटस्थता का पालन करना मेरी पेशेवर जिम्मेदारी है लेकिन एक व्यक्ति के तौर पर और एक जागरूक नागरिक के तौर पर मेरा रास्ता उस लेफ्ट का है जो पार्टी दफ्तर से ज्यादा हमारी ज़िंदगी में पाया जाता है. यही मेरी पहचान है।

और अंत में एक साल तक चलने वाली खींचतान के लिए शुक्रिया। इस खींचतान की वजह से ज़ी न्यूज़ मेरे कुछ अच्छे दोस्त बन सके।

सादर-सप्रेम,

**विश्वदीपक**

## समता संघर्ष मार्गदर्शिका
संपादन : सुनील दिघे

**समता संघर्ष मार्गदर्शिका पुस्तकाची वैशिष्ट्ये :**
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेले जनतेचे संघर्ष.
- भारतीय संविधानातील निवडक व महत्त्वाची कलमे.
- संविधानाची पहिली प्रत, देखणे स्वरूप (वर्णनात्मक) आणि डॉ. आंबेडकरांची त्यावर असलेली स्वाक्षरी.

पाने : २६२ / किंमत : ₹ ३००



## भक्ती आणि धम्म
रावसाहेब कसबे

**'भक्ती आणि धम्म'** या ग्रंथात भक्तीची शक्तिशाली, संघर्षशील, विद्रोही आणि बंडखोर रूपे प्रसिद्ध विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी दाखवली आहेत. जगभर तयार झालेले विविध भक्तिप्रवाहांचे सम्यक दर्शन हा ग्रंथ घडवतो. भारतातील बाऊल, अलवार यांसारखे दुर्लक्षित प्रवाहही या ग्रंथात अवतरतात.

पाने : ६९६ / किंमत : ₹ ९७५
सवलतीत : ₹ ७००

# लोकवाङ्मय गृह

## नवी पुस्तके

### एकेकाळी गाजलेल्या रशियन कथांच्या मराठी अनुवादांचे पुनःप्रकाशन



**५ पुस्तकांचा संच**
**किंमत रुपये ५००/-**
**सवलतीत रुपये ४००/-**
**१० संचापेक्षा अधिक संच खरेदी केल्यास सवलतीत रुपये ३५०/-**

पिपल्स बुक हाऊस :
१५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
✆ २२८७ ३७६८
लोकवाङ्मय गृह :
भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
✆ २४३६ २४७४ / फॅक्स : २४३१ ३२२०.
E-mail : lokvangmayagriha@gmail.com

आमची निवडक पुस्तके
**BookGanga.com/newshunt.com**
वर उपलब्ध आहेत.

## लोकशाही मार्गाने येणारा फॅसिझम
उद्धव कांबळे

स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, मानवी हक्क तसेच लोकशाही मूल्ये रुजत आहेत, असे जगभर मानले जाते पण हा एक भ्रम आहे. सर्वसामान्य जनमत बेसावध असताना जगभर फॅसिस्ट आणि प्रतिगामी प्रवृत्ती कशा फोफावत आहेत त्याचा फॅसिस्ट इतिहास व प्रवृत्तींच्या आधारे घेतलेला आढावा.

पाने : ३२ / किंमत : ₹ २५



## भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात कम्युनिस्ट पक्षाचे योगदान
आनंद मेणसे

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १९२५ साली झाली. ९० वर्षांच्या या काळात या पक्षावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप नाही. सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत हक्कांसाठी लढणारा हा एकमेव पक्ष. अशा या पक्षाच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील देदीप्यमान कामगिरीवर टाकलेला प्रकाशझोत.

पाने : ४८ / किंमत : ₹ ३०

# देशद्रोह कशाला म्हणतात?

**राजेंद्र साठे**



विरोधकांवर देशद्रोहाचा आरोप करणे, ही हुकूमशहांची पद्धत असते. 'कुत्र्याला वेडा ठरवा आणि गोळ्या मारा' अशी एक इंग्रजी म्हण आहे. हुकूमशहांना ती आवडते. मोदींची राजवट लोकशाही आहे, पण त्यांच्या राज्यात एकाएकी देशद्रोही लोकांची संख्या वाढू लागली आहे. आधी रोहित वेमुला आणि त्याचे मित्र हे देशद्रोही ठरले. आता जेएनयूतील सर्व बिगरभाजप संघटना किंवा विद्यार्थी यांच्यावर नेम धरण्यात आला आहे...

> **दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात हेच घडले आहे आणि तेथे दोषींवर कारवाई होणे, हे सध्याच्या कायद्यानुसार अपरिहार्य होते. पण मुळात घडलेला प्रकार अत्यंत अघटित आणि अभूतपूर्वरीत्या अभद्र असल्याचे संघवाले जे सांगू पाहात आहेत, ते खोटे आहे.**

अब्दुल गनी लोन हे काश्मिरातील फुटिरतावादी नेते होते. १९९०च्या दशकात सर्व फुटिरतावाद्यांची मिळून हुरियत कॉन्फरन्स स्थापन झाली. ती स्थापन करणाऱ्यांमधील लोन हे एक प्रमुख नेते होते. पुढे २००२मध्ये अतिरेक्यांनी त्यांची हत्या केली. त्यांच्यानंतर सज्जाद लोन यांनी त्यांचा 'पीपल्स कॉन्फरन्स' हा पक्ष पुढे चालवला. काश्मीरला स्वातंत्र्य मिळणे कसे शक्य आहे, याबाबत सज्जाद यांनी एक पुस्तक लिहिले आहे. सज्जादचे लग्न जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंटचा अमानुल्ला खान याच्या मुलीशी झाले आहे. एकूणच काश्मीरच्या स्वातंत्र्याबाबत लोन कुटुंबीयांची भूमिका पुरेशी स्पष्ट व्हावी, असा हा सर्व तपशील आहे.

गेल्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकीत सज्जाद लोन आमदार म्हणून निवडून आले. मुफ्ती यांचा पीडीपी आणि भाजप यांनी संयुक्तरीत्या स्थापलेल्या काश्मीरच्या सरकारात सज्जाद यांना मंत्रीपद देण्यात आले होते. आता मेहबूबा जेव्हा पुन्हा सत्ता स्थापन करतील, तेव्हाही ते मंत्री होतीलच, अशी अपेक्षा आहे. अटलबिहारी वाजपेयी यांच्याबद्दल आपल्याला आदर आहे, कारण त्यांनी आपल्या सुरक्षेची खूपच काळजी घेतली, असे सज्जाद सांगतात. मोदींविषयीही ते प्रेमाने बोलतात.

काश्मीरमध्ये निवडणुकांनंतर भाजपचीच सत्ता स्थापता येते का, याची चाचपणी अमित शहा करीत होते. त्या वेळी राम माधव यांनी सज्जाद यांची भेट घेतली होती. जाता जाता आणखी एक नोंदण्यासारखी बाब म्हणजे, राम माधव यांनी अपक्ष आमदार रशीद इंजिनियर यांचीही भेट घेतली होती. तेव्हा या इंजिनियर यांचा पाठिंबा घेण्यात संघवाल्यांना काहीही गैर वाटत नव्हते. पण या वाटाघाटी यशस्वी झाल्या नाहीत. याच इंजिनियर यांनी बीफची पार्टी केली. भाजप आमदारांनी त्यांना भर विधानसभेत मारले. वाटाघाटी यशस्वी झाल्या असत्या, तर हेच इंजिनियर आज भाजपचे मित्र असते. जसे अजून तरी सज्जाद लोन आहेत.

सज्जादच नव्हे तर मेहबूबांसह अनेकांची काश्मीरच्या





अफजल गुरुच्या सुटकेसाठी आणि फाशी दिल्यावर त्याच्या पार्थिवाच्या मागणीसाठीही काश्मीरमधील नागरिकांनी जाहीर आंदोलन केले होते.

स्वायत्ततेबाबतची भूमिका ही संदिग्ध आहे. संसदेवरील हल्ल्यातील आरोपी अफजल गुरू याला काश्मिरात हुतात्मा म्हटले जाते. त्याला फाशी देऊ नये, असा ठराव काश्मीर विधानसभेत झाला होता. सज्जाद आणि मेहबूबा यांची भूमिका तीच होती. तरीही भाजपवाले आज त्यांच्याशी हातमिळवणी करून आहेत. नुसती मैत्री नव्हे, तर सत्तेतही सहभागी आहेत.

आज देशात आणि काश्मिरात भाजपचे सरकार आहे. तरीही श्रीनगरमध्ये या ना त्या निमित्ताने भारतविरोधी मोर्चे निघतात. भारताच्या झेंड्याचा अवमान केला जातो. त्यांना राज्याचे पोलिस वा केंद्राची सुरक्षा दले काबूत ठेवू शकत नाहीत. अर्थात, ते योग्यच आहे. कारण अन्यथा, अशा निदर्शकांना प्रचंड संख्येने तुरुंगात टाकावे लागेल किंवा त्यांच्यावर सतत गोळीबार करावा लागेल. ते परवडणारे नाही.

काश्मिरी स्वातंत्र्यवाद्यांची ऊठबस दिल्लीतील अनेक क्षेत्रांत अनेक वर्षांपासून आहे. जगभरचा इतिहास असे सांगतो की, विद्यापीठे, पत्रकार आणि काही प्रमाणात नोकरशाही यांच्यात असे स्वातंत्र्यवादी नेहमी सहज घुसखोरी करीत असतात. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अनेक धुरंधर सेनापती ब्रिटिश विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असताना चळवळी करीत होते. ऐन लंडनमध्ये त्यांनी संघटना स्थापल्या होत्या. तिथे ते पैसेही गोळा करीत होते. वृत्तपत्रे चालवत होते. उघड भाषणे करीत होते.

काश्मीरमधील फुटिरतावादीदेखील आज हेच करीत आहेत. ते दिल्लीत सहज बावरतात. तिथे त्यांचे प्रभावगट आहेत. अनेक विद्यार्थी, पत्रकार, वकील, विचारवंत, राजकारणी इत्यादींमध्ये त्यांनी सहानुभूती मिळवली आहे. काश्मिरी स्वातंत्र्याची मागणी ही आता लपूनछपून करण्याची गोष्ट उरलेली नाही. ती करणाऱ्यांना आपण अपराध करीत आहोत, अशी भावना बाळगण्याची गरज उरलेली नाही. आपली मागणी तर्काला धरून आहे, असे ते मानतात व त्यासाठी उघडपणे राजकीय चळवळी ते करतात.

१९८० वा ९०च्या दशकात अशी उघड मागणी ही भारतीय जनतेसाठी काहीशी धक्कादायक होती. पण त्यानंतर आता २५ वर्षे लोटली. काश्मीरमध्ये बऱ्याच गोष्टी घडून गेल्या आहेत. आज एखाद्या कार्यक्रमात काश्मिरी स्वातंत्र्याच्या आणि त्या निमित्ताने भारत सरकारच्या मुर्दाबादच्या घोषणा दिल्या गेल्या तर त्याबद्दल भारतीयांना राग येणे समजू शकते. सरकारने त्याबद्दल कायदेशीर कारवाई करणे, हेही समजण्यासारखे आहे.

दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात हेच घडले आहे आणि तेथे दोषींवर कारवाई होणे, हे सध्याच्या कायद्यानुसार अपरिहार्य होते. पण मुळात घडलेला प्रकार अत्यंत अघटित आणि अभूतपूर्वरीत्या अभद्र असल्याचे संघवाले जे सांगू पाहात आहेत, ते खोटे आहे. ही काहीतरी झोप उडवणारी गोष्ट आहे, असे भाजपवाले सांगत आहेत, तेही झूठ आहे. कारण झोपेचे सोंग घेण्याचा हा सर्व प्रकार आहे.

काश्मीरच्या स्वातंत्र्याची मागणी ही आपल्या सद्य राजकीय वास्तवाचा एक भाग आहे आणि भाजपने वेळोवेळी या वास्तवाला मिठ्या मारल्या आहेत. परवेझ मुशर्रफ २००१मध्ये अटलबिहारी वाजपेयींना भेटायला आले, तेव्हा त्यांनी हुरियतच्या नेत्यांशीही चर्चा केली होती. भाजपने वा संघाने त्याला आक्षेप घेतला नव्हता. नंतर २००४मध्ये तर खुद्द लालकृष्ण अडवानींनी हुरियतबरोबर बैठक केली होती. एकेकाळचा अतिरेकी आणि आता गांधीवादी झालेला यासीन मलिक याला पाकिस्तानव्याप्त काश्मिरात जाऊन चर्चा करायला वाजपेयींनीच मदत केली होती. काश्मीर निवडणुकांमध्ये मोदींच्या भाजपने घेतलेली भूमिका हा त्याचाच पुढचा टप्पा होता.

एकीकडे आपण प्रचंड देशभक्त आहोत, असे संघ आणि भाजपवाल्यांना सतत वाटते. काश्मीरविषयी अतिरेकी वागणे-बोलणे, हे त्यांच्यासाठी आवश्यक ठरते. 'लडके लिया है हिंदुस्तान, हँस हँस के लेंगे पाकिस्तान,' अशा घोषणा ते देतात. प्रत्यक्षात हिंदुस्तान घेण्याच्या लढाईत हे कुठेच नव्हते. आणि आता पाकिस्तानला गुंडाळणे तर सोडाच; पण त्यांच्याशी व्यवहार करताना आपलेच धोतर सुटायची वेळ येईल, हे यांच्या लक्षात आले आहे. काश्मिरी जनता ही भारतीय जनतेपेक्षा वेगळा विचार करू शकते, हेही त्यांना हळूहळू उमजत आहे. ही वस्तुस्थिती आपले समर्थक, भक्त आणि भारतीयांना कशी सांगायची, हा त्यांच्यासमोरचा पेच आहे. त्यासाठी दडपादडपी करावी लागते आहे. आपला दोष आहे, हे ठाऊक असले की माणूस समोरच्यावर जोरात ओरडून कांगावा करू लागतो, तसाच प्रकार चालू आहे.

खरे तर काश्मीर आणि पाकिस्तानसंदर्भात आपण काय काय करतो आहोत, हे भाजप आणि संघाने जनतेला सांगायला हवे. तसे ते न करणे देशहिताला घातक आहे आणि देशहिताला घातक असलेली गोष्ट म्हणजेच देशद्रोह. अशी ही साधीसोपी व्याख्या आहे.

**– राजेंद्र साठे**
satherajendra@gmail.com

(दै. दिव्य मराठीच्या सौजन्याने पुनर्प्रकाशित)

**काश्मिरी स्वातंत्र्याची मागणी ही आता लपूनछपून करण्याची गोष्ट उरलेली नाही. ती करणाऱ्यांना आपण अपराध करीत आहोत, अशी भावना बाळगण्याची गरज उरलेली नाही. आपली मागणी तर्काला धरून आहे, असे ते मानतात व त्यासाठी उघडपणे राजकीय चळवळी ते करतात.**



निदा फाजली यांच्यासाठी मशीद, इस्लाम, नमाजी (नित्यनेमाने नमाज पढणारा), धर्म यांच्याबद्दल कोणतीही अस्पष्टता नव्हती. त्यांना माणूस, मुसलमान आणि नमाजी यांच्यामधले अंतर जाणण्यात कधीही अडचण आली नाही आणि ही सुस्पष्टता त्यांच्या काव्य आणि गद्यलेखनात कायम दिसते.




# तू इस तरहा से मेरी जिंदगी में शामील है

**इब्राहिम अफगाण**

*घर से मस्जिद है बहुत दूर चलो यूँ कर लें*
*किसी रोते हुए बच्चे को हँसाया जाये*

निदा फाजली हे नाव उच्चारलं की, बहुतेकांना त्यांचा हा शेर आठवतो. त्यातील रडणाऱ्या मुलाला हसवण्याच्या पवित्र कृतीला लोक वाहवा करतात की मशिदीपासून, प्रार्थनास्थळापासून लांब असलेल्या देवाच्या उल्लेखाने धर्मातील कर्मकांडाच्या पलीकडे पाहायला लावणाऱ्या शायरच्या वृत्तीला दाद देतात, माहीत नाही. कदाचित हसणाऱ्या मुलाची प्रतिमाच इतकी दैवी असते की, त्यात कोणालाही परमेश्वराचे दर्शन घडावे.

मात्र विचार केला तर या दोन्हीमधल्या जागेबद्दल, या तुलनेबद्दल आणि आपण दाद देत असताना घेत असलेल्या बाजूबद्दल काही प्रश्न निर्माण होऊ शकतात. मुलाला हसवल्याने जे तुम्ही नमाज पढून पुण्य प्राप्त करू इच्छित होता, ते मिळेल का. एकाऐवजी ही दुसरी कृती तितकीच सबल आहे का की आणखी काही.

निदा फाजली यांनी पाकिस्तानातील एका मुशायऱ्यात हा शेर वाचला. दादही मिळाली. मुशायरा आटोपल्यावर त्यांना एकाने विचारले, तुम्हाला खरंच वाटतं हे असं असू शकेल? मशीद कुणा मुलापेक्षा मोठी कशी असू शकते?

त्यावर निदानी त्यांना उत्तर दिले की, हो. कारण मशीद माणसाच्या हातून बनते आणि मुलं परमेश्वर घडवतो.

निदा फाजली यांच्यासाठी मशीद, इस्लाम, नमाजी (नित्यनेमाने नमाज पढणारा), धर्म यांच्याबद्दल कोणतीही अस्पष्टता नव्हती. त्यांना माणूस, मुसलमान आणि नमाजी यांच्यामधले अंतर जाणण्यात कधीही अडचण आली नाही आणि ही सुस्पष्टता त्यांच्या काव्य आणि गद्यलेखनात कायम दिसते.

याचे मुख्य कारण म्हणजे कोणत्याही आधुनिक शायराप्रमाणे त्यांच्यावरही गालिब या महान शायराचा प्रभाव होता. गालिबनेही आपल्या काव्यातून, अर्थात अन्य अनेक गोष्टीसोबत हा फरक सतत केला. मानव आणि माणूस यांच्यातले अंतर मिटत नसल्याची त्याची खंत होती. त्यासंदर्भात त्याचा प्रख्यात शेर म्हणजे,

*बसकी दुश्वार है हर काम का आसाँ होना*
*आदमी को भी मयस्सर नही इन्साँ होना*

कोणतीही गोष्ट सोपी होणे किती कठीण बनलेलं आहे, मानवही माणूस होत नाही, म्हणजे काय.

निदांच्या बाबतीत तेवढेच नव्हते. तसे असते तर त्यांचे काव्य उर्दूच्या फारसीयुक्त वैभवात मात्र जनसामान्यांपासून लांब, अन्य भाषकांपासून दूर अकॅडेमिक बनले असते. तसे झाले नाही. त्यांचे शेर वाचताना असे वाटते की, कोणीतरी आपल्याशी आपल्या भाषेत बोलत आहे. त्याचे कारण होते, त्यांच्यावर हिंदवी भाषेतील, खडी बोलीतील, देशी परंपरेतील अमीर खुसरो आणि कबीरदास, मीरासारख्या संत वाङ्मयाचेही प्रभाव लहानपणीच झाले होते. या हिंदुस्तानी भाषेत आधीच सुफी रंग मिसळलेला होता आणि लोकवाङ्मय म्हणावे इतके हे सार जनमानसाच्या वाणीतून उमटले. अमीर खुसरो यांची सातशे वर्षांपूर्वीची ही रचना-

*जो यार देखा नैन भर, दिल की गई चिंता उतर*
*ऐसा नहीं कोई अजब, राखे उसे समझाय कर*

किंवा कबीरदास यांची-

*पोथी पढ़ि पढ़ि जग मुआ, पंडित भया न कोय,*
*ढाई आखर प्रेम का, पढ़े सो पंडित होय*

ही रचना, उर्दूचे फारसी पडदे बाजूला सारत हिंदुस्तानी भाषेतून निदा फाजली यांची रचना बनते. आजच्या परिस्थितीवरही त्यांची प्रतिक्रिया त्यांच्या मूळ दृष्टिकोनासह व्यक्त होते. काहीसा असाच आशय घेऊन पण आधुनिक संदर्भात.

*धूप में निकलो घटाओं में नहा कर देखो*
*ज़िन्दगी क्या है किताबों को हटा कर देखो*

धर्माच्या संदर्भात कबीरदास म्हणतात,

*हिन्दू कहें मोहि राम पियारा, तुर्क कहें रहमाना,*
*आपस में दोउ लड़ी-लड़ी मुए, मरम न कोउ जाना*

आणि निदा फाजली म्हणतात,

*चाहे गीता बाचिये या पढ़िये कुरान*
*मेरा तेरा प्यार ही हर पुस्तक का ज्ञान*

किंवा

*कोई हिंदू कोई मुस्लिम कोई इसाई है*
*सबने इन्सान न बनने की कसम खाई है*

यासंदर्भात ते बुल्लेशाह आणि बाबा फरीद यांच्या तत्वज्ञानाचा अंगीकार करतात.

*बेशक मंदिर मस्जिद तोडो, बुल्लेशाह है कहता,*
*पर प्यार भरा दिल कभी ना तोडो, इस दिलमे दिलबर रहता*

आणि त्यांच्या रचना गझलेसोबत दोह्यांचेही स्वरूप म्हणूनच धारण करतात.

*पूजा घर में मूर्ती मीर के संग श्याम*
*जिसकी जितनी चाकरी उतने उसके दाम*

(या दोह्यातही मंदिरात फक्त मूर्ती आहे आणि परमेश्वर खऱ्या भक्तासोबत आहे, हेही व्यक्त केलेले आहे. आणि तसे का, हेही सांगितलेलं आहे. तो कर्मवाद असेल किंवा नाही, कल्पना नाही. मात्र भक्त आणि परमेश्वराचं नातं गृहीत नसून ते आपल्या कृतीतून साध्य करण्याची बाब आहे, हे ते सांगतात. आणि त्यांना हे मीराच्या भजनांनीच सांगितलंय आणि जो कोणी मीरेसारखी चाकरी करेल, तर त्याच्यासंगे श्याम असेल, अन्यथा इतरांसाठी मंदिरात तो मूर्तीच्या रूपात आहेच. जसा मशिदीत नमाजींना अल्लाह भेटतो, तसा.)

अर्थात, ते या देशी परंपरेच्या मातीच्या गंधातील आविष्काराचा आवाज बनल्याने प्रेमाची पताका सतत उंच राहील अशी रचना ठळकपणाने करत राहिले.

*दिल में ना हो जुर्रत तो मोहब्बत नहीं मिलती*
*ख़ैरात में इतनी बड़ी दौलत नहीं मिलती*

त्यांचे काव्य उर्दू भाषेच्या सीमा ओलांडून सगळ्यांच्या हृदयाला भिडले ते त्यातील एकटेपणाच्या नोंदीने आणि आयुष्यातील अपूर्णतेला कवेत घेऊनही केलेल्या जीवनाच्या गुणगानाने.

*कभी किसी को मुकम्मल जहाँ नहीं मिलता*
*कहीं ज़मीं तो कहीं आसमाँ नहीं मिलता*

*कहाँ चिराग़ जलायें कहाँ गुलाब रखें*
*छतें तो मिलती हैं लेकिन मकाँ नहीं मिलता*

*ये क्या अज़ाब है सब अपने आप में गुम हैं*
*ज़बाँ मिली है मगर हमज़बाँ नहीं मिलता*

*तेरे जहान में ऐसा नहीं कि प्यार न हो*
*जहाँ उम्मीद हो इस की वहाँ नहीं मिलता*

ही गझल त्यांची जवळपास ओळख बनली.

त्यांची माझी भेट हा एक विलक्षण योगायोग होता. आणि माझ्या हातून त्यांचे पुस्तक अनुवादित होणे आणि त्याला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळणे हा त्याहूनही मोठा योगायोग.

माझा जन्म कर्नाटकात झाला तरी सगळं बालपण, शिक्षण आणि काही अंशी पत्रकारिताही गोव्यातील. मी आठवीत असल्यापासून लिहायचो, म्हणजे तिथपासून माझे लेख वर्तमानपत्रात छापून यायचे. या लिहिण्याच्या हौसेखातरच मी पत्रकारितेत आलो आणि दैनिक गोमन्तकमध्ये उपसंपादक म्हणून काम करत असतानाच मला साहित्य अकादमीची प्रवास शिष्यवृत्ती मिळाली.

माझ्या आवडत्या शायरात साहिर लुधियानवी हे एक नाव होते आणि आवडत्या साहित्यिकात अमृता प्रीतम यांचे नाव अग्रस्थानी होते. त्यामुळे मी पंजाबची निवड केली.

दिल्लीहून पतियाळा मार्गे लुधियाना, अमृतसरकडे जाण्याआधी अमृता प्रीतम यांच्याशी भरपूर गप्पा मारता आल्या आणि परतीच्या मार्गावरही गोव्याकडे रवाना होण्याआधी अमृता प्रीतम आणि इमरोज यांच्याशी गप्पा झाल्या. लुधियानात अनेक कवी साहित्यिक भेटले. त्यात एक होते, कृष्ण अदीब.

त्यांच्या जगजीत सिंग यांनी गायलेल्या गझलेतील माझ्या आवडीचा शेर म्हणजे,

*अब इरादोंपे भरोसा है ना तौबा पे यकीं*
*मुझको ले जाए कहाँ तिश्नालबी शाम के बाद*

त्यांनी मला सुचवलं की कधी मुंबईला गेलात तर तेथे निदा फाजली नावाचे शायर आहेत, त्यांना जरूर भेटा.

ही १९९१ सालची गोष्ट.

त्यावेळी मला कल्पना नव्हती, मात्र अशा काही घटना घडल्या की मी पुढच्या वर्षी मुंबईत येऊन धडकलो. बिस्तऱ्यासह.

आणि महिनाभरात तेथे राहण्याची वगैरे व्यवस्था झाल्यानंतर निदा फाजली यांचा पत्ता शोधून काढला आणि त्यांना त्यांच्या तेव्हाच्या खार येथील घरी भेटलो. त्यांना त्यांच्याबद्दल प्रश्न विचारले, काय कुठे वगैरे. उत्तरादाखल त्यांनी 'दिवारोंके बीच' हे आपले पुस्तक मला वाचायला दिले. म्हणाले, यातून कळेल.

हे अवघे सव्वाशे पानांचे छोटे पुस्तक वाचायला घेतले आणि मी त्या पुस्तकाच्या प्रेमातच पडलो. ही कादंबरी आहे की

गद्यकाव्य आहे? आत्मचरित्र आहे की जीवनावरचे निवेदनात्मक भाष्य? त्यात हे सगळे होते.

मी त्यांना पुन्हा भेटलो आणि म्हणालो की, हे पुस्तक अन्य भाषांत आलं पाहिजे. निदान मराठीत तरी.

ते म्हणाले, कोणीतरी करतोय त्याचा अनुवाद, पण काम बराच काळ पूर्ण झालेलं नाही. मी त्यांना म्हणालो की, लवकर येईल असं बघा, विचारून घ्या. नाहीतर मी कोणीतरी नवीन माणूस शोधतो.

त्यांनी विचारलं बहुदा आणि ते पुढच्या भेटीत म्हणाले की, नवीन माणूस बघ.

मग मी काही महिने नवीन माणूस शोधत होतो. या दरम्यान आमच्या चर्चा, भेटी होत होत्या. त्यांच्याकडे जाणे म्हणजे महिनाभराचे इंधन भरून येण्यासारखे होते. मी पत्रकार होतो, पण माझ्याहून ते अधिक सजग होते, आणि आसपासचा माहोल त्यांच्या नजरेतून त्यांच्या टिप्पणीविना सुटायचा नाही.

एक दिवस मला ते म्हणाले, 'तूच का नाही करत याचा अनुवाद? अजून कुठे शोधत बसणार?'

मी म्हणालो, 'अहो नाही, हा अत्यंत जबाबदारीने करावा लागेल, कारण त्याच्यातील गद्य ओळी पद्यात्मक पद्धतीने तिसराच आशय व्यक्त करतात. ते मराठीतही तसेच उतरले पाहिजे.'

ते म्हणाले, 'तूच कर. होईल.'

आणि ते झालं. हे पुस्तक आणि त्याचा पुढचा भाग दोन्हीचा मी अनुवाद केला आणि दोन्ही ग्रंथालीने प्रकाशित केली.

'दिवारोंके बीच'मधल्या एका उताऱ्यातून त्यांच्या सुक्ष्मापासून मानवतेपर्यंतचा पट विलक्षण नाट्याच्या स्वरूपात डोळ्यांपुढे उभा राहतो. त्यातला एक परिच्छेद माझ्या खूप आवडीचा आहे. मला आठवतं, पुस्तक प्रकाशनाच्या वेळी सतीश काळसेकरांनी हा जाहीरपणे वाचून दाखवला होता...

*निदा आपल्या खोलीसमोर बसलाय. एक मुंगळा कुठून तरी येतो आणि निदाच्या हाताला पुलासारखा वापरतोय. निदा त्याला थोडा वेळ बघतो. मग हात झटकल्यानं तो खाली पडतो. खाली पडूनही तो थांबत नाही. त्याचा प्रवास चालूच आहे. असाच चालत तो खूप पुढे जातो. आता तो निदापासून दोन हात अंतरावर आहे. त्याच्या या सतत पुढे जात राहण्यानं निदामध्ये त्याच्याबद्दल उत्सुकता निर्माण झालीय. दोघांत तमासगीर आणि तमाशाप्रेमींचा संबंध निर्माण होतो. मुंगळ्याला कुठेतरी जाण्याची भयंकर घाई आहे. आतापर्यंत तो छताच्या सावलीत होता. आता मात्र मैदानात आलाय. येथे येणाऱ्या जाणाऱ्यांचे पाय आहेत, जमिनीवर आपलं खाद्य शोधणाऱ्या पक्ष्यांच्या टोकदार चोचीं आहेत. झाडावरून उतरणारी आंधळी हवा आहे, आणि पुढे रस्ता आहे. तिथे गाड्या, सायकली, टांगे, हातगाड्या सतत येत जात असतात. मुंगळ्यांच्या आकाराच्या दृष्टीने हा केवढा मोठा संसार असेल. तो चारी बाजूंनी धोक्यांनी घेरलेला आहे. पण गतिमान आहे.*

*एवढ्या मोठ्या संसारात आणि त्याच्या रंगीबेरंगी वातावरणात एका मुंगळ्याचा संघर्ष कुणाच्या लक्षात राहील? इथे तर हिरोशिमा किंवा नागासाकीचा विनाशही काही दिवसांनंतर इतिहासाचा अनावश्यक भाग बनून लायब्ररीत बंद होतो. भारत-चीन सीमेवर बलिदान केलेल्या किती शिपायांची नावे लोकांना आठवतात? दंगलीच्या बातम्यांमध्ये चालती बोलती माणसं संख्येच्या रूपात वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होतात. दहा, पन्नास, साठ, हजार.. या गणतीत लपलेली नावं, नावांत झाकलेला द्वेष, प्रेम, वंश, इच्छा कितीतरी कथा पाहता पाहता मूक होऊन जातात. यांतून लोकगीतं निर्माण होत नाहीत की कुणी त्या सांगण्याचे कष्ट घेत नाही. आणि जग असंच चालत असतं. विनाशाची डायनामाईट शोधणारा माणूस आपल्या नावे शांततेचे नोबेल पारितोषिक जाहीर करतो.*

यात त्यांच्या उर्दू-हिंदीमिश्रित हिंदुस्तानी भाषेतून होणाऱ्या आविष्काराचे रहस्यही त्यांनी सांगितले आहे.

ते ग्वाल्हेरमध्ये असताना कॉलेजच्या वाटेवर आणि परिसरात एका मुलीच्या नित्य दर्शनाने त्यांच्या आसपासचे मौसम बदलत. आणि एक दिवस जेव्हा ती अचानक या जगातून नाहीशी झाली, तेव्हा तिच्या नसण्याच्या भावनेचे वर्णन करणारे शब्द आणि मनाला झालेले दुःख सांगण्यासाठी त्यांच्याकडचे उर्दू भाषेचे वैभव अपुरे पडले. या दुःखाचा आविष्कार शोधताना त्यांना हिंदुस्तानी भाषांतील कबीर आणि मीरेच्या भाषेत त्यांना आपल्या भावना दिसल्या. त्यामुळे त्यांना आपली एक नवीन भाषा निर्माण करता आली. कारण ते दुःख अमीर खुसरोपासून मीराबाईपर्यंत सगळ्यांनी अनुभवले होते आणि आपल्या काव्यरचनेतून व्यक्त केले होते.

निदा फाजली यांचे दुःख पुढे एका चित्रपटात एक प्रख्यात गाणे बनून ते रसिकांच्या लक्षात राहिले.

*तू इस तरहा से मेरी जिंदगी मे शामील है*
*जहाँ भी जाऊ ये लगता है तेरी मेहफिल है*

निदा फाजली हे एका भाषेच्या एका देशाच्या एका समूहाच्या भावनांना आवाहन करत नव्हते. एका पिढीशी बोलत नव्हते. त्यांचा संवाद अवघ्या मानवजातीशी होता. त्यामुळे भारत, पाकिस्तान, अमेरिका या ठिकाणचा विविध स्तरांत विभागलेला भवताल त्यांना जसा दिसायचा, तसाच त्यांना तिथला माणूस दिसायचा. तोच माणूस, आईपासून बिछडल्याने घाबरलेला मुलगा असतो, तोच दोन भाषांतील भिंतींनी विभागल्याने गांगरलेला साहित्यिक असतो, तोच शहरांतील गर्दीत एकटेपणाने गुदमरणारा चेहराहीन रहिवाशी असतो, आणि तोच असतो घर आणि छत यांच्यातील फरक समजू शकणारा संवेदनशील माणूस. तोच असतो संताचे शहाणपण घेऊन पारमार्थिक आयुष्य जगणारा आणि तोच असतो दुःखांशी लढण्यातील निरर्थकता जाणून त्याला गीत आणि तत्वज्ञान बनवणारा सारांश.

*हर तरफ़ हर जगह बेशुमार आदमी*
*फिर भी तनहाईयों का शिकार आदमी*

# आमची आगळी-वेगळी, संग्राह्य पुस्तके!




**सादर सप्रेम (चरित्रात्मक)**

**लेखक : रत्नाकर मतकरी.**

वेगवेगळ्या क्षेत्रांतील २१ नामवंत व्यक्तिमत्त्वांची लेखकाला भावलेली वैशिष्ट्ये टिपणाऱ्या लेखांचा खास संग्रह.

**पृष्ठे : १६८. मूल्य : रु. १८०/-**



**५१ गाजलेली भाषणे**

**संपादन : अशोक बेंडखळे**

महाराष्ट्रातल्या ५१ गाजलेल्या वक्त्यांच्या भाषणांचे संग्राह्य संकलन

**पृष्ठे : २९६.**

**मूल्य : रु. ३००/-**




**नात्यांची वीण सांधताना.... उसवताना...**

**लेखिका : स्मिता भागवत**

आजकाल फार पटापट लग्ने मोडताना दिसतात. विविध नात्यांमध्ये दरी पडताना दिसते. हे टाळायचे असेल तर देश-विदेशात कौन्सेलिंगचा जबरदस्त अनुभव असलेल्या स्मिता भागवत यांचे हे अनुभवाधारित संग्राह्य पुस्तक वाचायलाच हवे!

**पृष्ठे : १९२• मूल्य : रु.२००/-**




**किवी-माओरींच्या विश्वात**

**डॉ. अच्युत बन**

जिथे दोन संस्कृती आणि दोन राष्ट्रभाषा अधिकृतपणे नांदत आहेत त्या न्यूझीलंडचे, तिथले मूळ रहिवासी असलेल्या माओरींचे जीवन, संस्कृती याचे अभ्यासपूर्ण पण रंजक पद्धतीने चित्रण करणारे एक वाचनीय पुस्तक

**पृष्ठे : ११४.**

**मूल्य : रु. १५०/-**




**सुवासिनी**

**लेखिका : सीमा देव**

प्रख्यात अभिनेत्री सीमा देव यांच्या आत्मचरित्राची सुधारित आवृत्ती.

**पृष्ठे : २०८.**

**मूल्य : २२५/-**



**देवदास ते भुवनशोम**

**लेखक : विजय पाडळकर**

विसाव्या शतकातील हिंदी चित्रपटांचा इतिहास - खंड पहिला.

**पृष्ठे : ३४४.**

**मूल्य : रु. ४५०/-**

**मैत्रेय बुक क्लबचे सभासद व्हा आणि अक्षर खजिना मिळवा!!**

फक्त रु. ९९९/- भरा आणि लगेचच रु. १६००/- किंमतीची पुस्तके घरपोच मिळवा तसेच वर्षभर 'मैत्रेय प्रकाशना'च्या सगळ्या पुस्तकांवर घसघशीत सूट.

मैत्रेय प्रकाशन

आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती

पारधी हाऊस, एम.जी. रोड,
विलेपार्ले (पू), मुंबई . ४०० ०५७.
दूरध्वनी - २६१०१०१६/ २६१५०३५८
www.maitreyaprakashan.com
prakashanmkg@maitreyagroup.com
ऑन लाईन खरेदीसाठी
www.flipkart.com
www.majesticonthenet.com
www.bookganga.com/www.amazon.com

**एम.ओ. करा/डी.डी. पाठवा ■ पुस्तकं आमच्या खर्चाने घरपोच मिळवा**





*उसके दुश्मन हैं बहुत आदमी अच्छा होगा*
*वो भी मेरी तरह इस शहर में तनहा होगा*

त्यांची गाजलेली अजून एक गझल म्हणजे
*इन्सान में हैवान यहाँ भी है वहाँ भी*
*अल्लाह निगहबान यहाँ भी है वहाँ भी ।*

या गझलेला एक गमतीशीर संदर्भ आहे. ते पाकिस्तानला अनेक वर्षांनंतर गेले होते. म्हणजे पहिल्यांदाच. त्यांचे कुटुंब तिथे गेले फाळणीच्या वेळी. पण निदा मात्र भारतातच राहिले. तेथून आल्यानंतर त्यांना इथले, भारतातले लोक, मित्र विचारू लागले की, तिकडे कशी काय आहे आब ओ हवा, म्हणजे हवापाणी. त्यावर ते म्हणाले,
*इन्सान में हैवान यहाँ भी है वहाँ भी*
*अल्लाह निगहबान यहाँ भी है वहाँ भी*

म्हणजे माणसातील पशू इथे जसा आहे तसा तिथेही आहे आणि परमेश्वराची कृपा इथे जशी आहे तशी तिथेही आहे. त्यांना सांगायचं होतं की, दोन्ही ठिकाणी काही फरक नाही. धर्मांचा खेळ इथे जसा चालतो, तसा तिकडेही चालतो. म्हणून त्यांचा पुढचा शेर होता की,
*रहमान की कुदरत हो या भगवान की मूरत*
*हर खेल का मैदान यहाँ भी है वहाँ भी*
त्यामुळे नेमकी परिस्थिती कशी आहे, तर-
*हिन्दू भी मज़े में है मुसलमाँ भी मज़े में है*
*इन्सान परेशान यहाँ भी है वहाँ भी*

शेवटी काय, तर हिंदूही मजेत आहेत आणि मुसलमानही मजेत आहेत, फक्त माणसाचं विचाराल तर तो इथे जसा छळला जातोय, तसा तिकडेही छळला जातोय.

हाच तो धागा आहे जो गालिबपासून, आदमी आणि इन्सान यांच्यामधला फरक सांगण्यापासून त्यांना प्राप्त झाला आणि त्यांच्या तत्वज्ञानाचा भाग बनला. अर्थात, त्यासोबत गालिबकडची वक्रोक्तीपूर्ण निवेदनशैलीही निदानी गालिबपासूनच घेतली असली पाहिजे.

जे माणसाच्या दुःखाशी नाते जोडतात, जे धर्मजातीच्या भिंती ओलांडून माणसाला पाहू शकतात आणि जे परमेश्वर आणि भक्त यांच्यातील अद्वैत अनुभवतात, त्यांच्यासाठी भिन्न, वेगळे आणि दुभंग काहीही नसते. म्हणून अशी रचना आपल्याला चकित करत नाही.

*चिड़ियों के चहकार में गूंजे राधा-मोहन अली-अली*

*बृन्दाबन के कृष्ण कन्हैय्या अल्लाह हू*
*बंसी राधा गीता गैय्या अल्लाह हू*

*एक ही दरिया नीला पीला लाल हरा*
*अपनी अपनी सब की नैय्या अल्लाह हू*

*मौलवियों का सजदा पंडित की पूजा*
*मज़दूरों की हैय्या हैय्या अल्लाह हू*

एकटेपणाचं आणि एकट्याचं सूक्ष्म पातळीवरच्या वेदनेपासून अवघ्या मानवजातीच्या दुःखापर्यंत पसरलेलं त्यांचं साहित्य म्हणजे, भारताच्या विशाल, प्रगत, मूल्याधारित संस्कृतीचा अर्कच आहे.
*बेनाम-सा ये दर्द ठहर क्यों नहीं जाता*
*जो बीत गया है वो गुज़र क्यों नहीं जाता*
*मैं अपनी ही उलझी हुई राहों का तमाशा*
*जाते हैं जिधर सब, मैं उधर क्यों नहीं जाता*

त्यांचा या खास हिंदुस्तानी, उर्दू-हिंदी संमिश्र भाषेचा सुंदर आविष्कार त्यांच्या आईबद्दलच्या रचनेत आढळतो.
*बेसन की सोंधी रोटी पर खट्टी चटनी जैसी माँ*
*याद आती है चौका-बासन चिमटा फुकनी जैसी माँ*

*बाँस की खुर्री खाट के ऊपर हर आहट पर कान धरे*
*आधी सोई आधी जागी थकी दोपहरी जैसी माँ*

*चिड़ियों के चहकार में गूंजे राधा-मोहन अली-अली*
*मुर्ग़े की आवाज़ से खुलती घर की कुंडी जैसी माँ*

*बिवी, बेटी, बहन, पड़ोसन थोड़ी थोड़ी सी सब में*
*दिन भर इक रस्सी के ऊपर चलती नटनी जैसी माँ*

*बाँट के अपना चेहरा, माथा, आँखें जाने कहाँ गई*
*फटे पुराने इक अलबम में चंचल लड़की जैसी माँ*

प्रत्येक मोठा कवी आयुष्यात कोणत्या तरी टप्प्यावर नेहमी एक प्रार्थना करतो. ती त्याच्यासाठी नसते, तर ती संपूर्ण मानवतेसाठी असते. निदा फाजली यांनी आजच्या आधुनिक काळात काय प्रार्थना केली असेल?
*गरज बरस प्यासी धरती पर फिर पानी दे मौला*
*चिड़ियों को दाना, बच्चों को गुड़धानी दे मौला*






## महाराष्ट्र राज्य पुरस्कार विजेत्या साहित्यिकांच्या यादीत यंदा 'ग्रंथाली'च्या चार पुस्तकांचा समावेश आहे

यानिमित्त-

म.सु. पाटील

स्मिता भागवत

डॉ. माया पाटील-शहापूरकर

मनोहर जाधव

यांचे हार्दिक अभिनंदन!





## या साहित्यिकांची पुरस्कारविजेती पुस्तके सवलतीत उपलब्ध






**चार पुस्तकांची**
**मूळ किंमत १२७० रु.**
**सवलतीत ६०० रु.**






**ग्रंथाली** द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com



*दो और दो का जोड़ हमेशा चार कहाँ होता है*
*सोच समझवालों को थोड़ी नादानी दे मौला*

ही नादानी इतकी महत्वाची का आहे की ज्यासाठी त्यांना त्याचा समावेश प्रार्थनेत करावासा वाटला? आणि ते ही नादानी सर्वांसाठी नाही मागत; तर सोचसमझवालोंको... ज्यांना सगळं समजतं आणि कळतं त्यांना ही नादानी कशासाठी हवी? दोन आणि दोन चार असतातच असं नाही... दोन आणि दोन म्हणजे चार, असे तार्किक मार्ग आयुष्य चोखाळत नाही. उलट त्यापलीकडेच आयुष्यासाठी नवीन संभावना असू शकतात.

यासंदर्भात सुरेश भटांचा एक शेर आठवतो–
*मी न केला हिशोब स्वप्नांचा*
*जिंदगी चोपडी न वाण्याची*

निदांच्या गझलेत एक अत्यंत मार्मिक शेर आहे,
*फिर रोशन कर ज़हर का प्याला चमका नई सलीबें*
*झूठों की दुनिया में सच को ताबानी दे मौला*

पुन्हा विषाचा पेला चमकव आणि नवे सूळही. जगात खोटं असणारच आहे, फक्त जे सत्य आहे, त्याचे तेज टिकू दे... सोक्रेटिसने सत्य उजळवण्यासाठी विषाचा पेला ओठांना लावला आणि येशू ख्रिस्त त्याच सत्याच्या तेजाच्या संरक्षणार्थ सुळावर चढला. त्यामुळे हे परमेश्वरा, या खोट्यांच्या जगात सत्याला तेज बहाल कर.

*फिर मूरत से बाहर आकर चारों ओर बिखर जा*
*फिर मंदिर को कोई मीरा दीवानी दे मौला*

आणि पुन्हा तीच लीला दिसू देत, पुन्हा श्रद्धेचा तोच चमत्कार दाखव. तू मूर्तीतून बाहेर पडून सगळ्या विश्वात पसर आणि मंदिरं मीरेसारख्या भक्तांसाठी मोकळी ठेव.

त्यांच्यासाठी छत आणि घर यांच्यातील फरक कधीही पुसट झाला नाही आणि धर्मगुरू आणि प्रस्थापितांच्या विरोधात बोलण्याचे बळही कायम राहिले. मीर आणि गालिबचे शेर वाक्प्रचार बनून सर्व शिक्षित अशिक्षितांच्या बोलीत बसले, ज्ञानोबा-तुकाराम बाणीत असतात, कारण त्यांनी आपल्या भवतालाला आपल्या काव्यात सामील करून घेतले. त्याचा दाखला निदा फाजली यांनी आपल्या हिंदी आणि ऊर्दूच्या एकत्रित आविष्कारातून दिला. म्हणूनच दंगलीनंतर त्यांनी लिहिलेल्या गझलेत देशातील परिस्थितीचे निरंतर स्वरूप व्यक्त करत असताना त्याला नवीन आशाही दाखवली.

*उठ के कपड़े बदल  घर से बाहर निकल जो हुआ सो हुआ*
*रात के बाद दिन, आज के बाद कल जो हुआ सो हुआ*
*जब तलक साँस है भूख है प्यास है ये ही इतिहास है*
*रख के कांधे पे हल खेत की ओर चल जो हुआ सो हुआ*
*जो मरा क्यों मरा जो जला क्यों जला जो लुटा क्यों लुटा*
*मुद्दतों से हैं गुम इन सवालों के हल जो हुआ सो हुआ*
*मंदिरों में भजन मस्ज़िदों में अज़ाँ आदमी है कहाँ*
*आदमी के लिए एक ताज़ा ग़ज़ल जो हुआ सो हुआ*

**– इब्राहिम अफगाण**
भ्रमणध्वनी : ९८२१४९९४७३
ibrahim.afghan@gmail.com

## मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : | मासिक |
| मुद्रकाचे नाव | : | इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : | सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : | सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०१६

## एस. डी. बर्मन...सदाबहार चतुरस्त्र संगीतकार

रोहन प्रकाशन — घर समृद्ध करणारी पुस्तकं

बर्मनदांच्या संगीताचा व त्यांच्या बालपणापासूनच्या व्यक्तिजीवनातील प्रेरणास्त्रोतांचा अन्वय लावणारं, त्यांची स्वभाववैशिष्ट्यं सांगणारं... संगीत-रसिकांसाठी एक संग्राह्य असं पुस्तक!




### सुन मेरे बंधु रे

लेखिका : **सत्या सरन**

अनुवाद : **मिलिंद चंपानेरकर**

पृष्ठं : ३१२ (छायाचित्रांसह)

किंमत रु.३००

**सवलतीत रु. २५०** (३० एप्रिलपर्यंत)

रोहन प्रकाशन

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ४११०३०

☎ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९११२०२१०

☎ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या

**www.rohanprakashan.com**




# निदा फाजलीची कविता

स्वैर अनुवाद : चंद्रशेखर सानेकर

■ मुंबई

ही कुठली वस्ती आहे?
हा मी कुठे आलोय?
वातावरणात निनादत आहेत
हजारो आवाज
या हवेत धुमसताहेत
असंख्य श्वास
कुठेही बघा
कंबरा, कुल्हे, पोटऱ्या, तंगड्या
पण कुठेही
कुठला चेहरा नजरेस नाही पडत
इथे तर लहानमोठे सगळेच जण
आपल्या चेहऱ्याला,
चमकत्या डोळ्यांना, गालांना,
हसत्या ओठांना
शिराच्या खोबण्यांतून बाहेर काढतात.
सकाळी उठल्याबरोबर
आपल्या खिशात टाकतात
अजब वस्ती आहे ही
हिच्यात ना दिवस, ना संध्याकाळ, ना रात्र
बसच्या सीटमधून सूर्य उगवतो
धुमसत्या पत्र्याच्या खोलीत चंद्र झोपतो
इथे तर काहीच नाहीये
रेल्वे आणि बसशिवाय
जमिनीवर वळवळणाऱ्या
बधीर समुद्राशिवाय,
इमारतींना गिळणाऱ्या इमारतींशिवाय

हे स्मशानी बेट
इथे कोणाला जागं करणार
स्वत:शीच वाद घालायला जाल तर
मोडून पडाल

इथे तर कुठलाच चेहरा
नजरेस पडत नाही
■

निदा फाजली यांनी गझलेबरोबरच दोहे आणि मुक्तछंदातही कविता लिहिल्यात. उर्दू कवितेला आधुनिकतेच्या जाणिवेने समृद्ध करणाऱ्या उर्दूतील अव्वल कवींपैकी निदा फाजली महत्त्वाचे कवी.
त्यांच्या कवितेत त्या सर्व जाणिवा आणि संवेदना आहेत ज्या आपल्या पाळेमुळे तुटून कुठल्यातरी नव्या अनोळखी शहरात जगणं शोधणाऱ्या कलावंतांच्या, माणसाच्या असू शकतात.
निदा फाळणीनंतर अनेक शहरात संघर्ष करत करत अखेर मुंबईत येऊन वसले. या शहरात कवी म्हणून आणि माणूस म्हणून जे जग व जीवन त्यांनी अनुभवलं, पाहिलं, जगले तेच आपल्या कवितेत त्यांनी टिपलंय. निदांची कविता थेट मोजकं, स्पष्ट आणि गाभ्याचं बोलणारी आहे. आधुनिक जीवनाच्या गुंतागुंताविषयी बोलणारी आहे. पण खूप सहज आणि दोस्ताना शैलीत, कुठलीही संदिग्धता न आणता बोलते. तिच्यात भाषेच्या, प्रतिमा-प्रतिकांच्या गर्दीपेक्षा आशयाची स्पष्टता अधिक आहे. रोजच्या जगण्यातले अनुभव असो की युद्धासारखी वैश्विक समस्या असो, निदांची कविता जगण्याची दुखरी नस अचूक पकडते. तापाने फणफणलेल्या कपाळावर मिठाच्या पाण्याची जशी घडी ठेवली जाते तशी त्यांची कविता जाणवते. अशाच त्यांच्या काही निवडक कवितांचा हा स्वैर अनुवाद.

■ **सावधगिरी**

घराबाहेर पडल्यावर
किमान
रात्री उशीरापर्यंत तरी
घरी परता

जो कुणी दिवस दिवस गायब राहून
मग कधीतरी घरी परततो
तो मग
आयुष्यभर पस्तावतो

घरही आपली
जागा जोडून
निघून गेलेलं असतं
■



■ **वेळेआधी**

तसं तर प्रत्येक नात्याचा शेवट
हा असाच होतो

फूल उमलतं
दरवळतं
आणि मग विखरून जातं

तुझ्याकडे माझी काहीच तक्रार नाही
पण
फांदी हिरवीगार असली की
वातावरण संवेदनांनी भारून जातं
तू व्यर्थ
ऋतूला सतवलंयस

फूल जेव्हा उमलून मादक होऊन जातं
तेव्हा ते आपसूकच
फांदीवरून गळून पडतं.
■

■ **युद्ध**

सीमेवर
शांतता प्रस्थापित झाल्यावर
युद्ध
तुकड्या-तुकड्यात वाटलं जाऊन
दोन्ही देशाच्या
प्रत्येक लहान-मोठ्या घरात
लपून बसतं
एक युद्ध

हजारो युद्धाला जन्माला घालून
मरून जातं

युद्ध कधीही संपत नाही
ते फक्त
आघाड्या बदलत राहतं
■

■ **घर**

तुम्ही जिथे बिऱ्हाड कराल
त्याला घरासारखं सजवा
फुलदाणीत फुले ठेवायला लागा
भिंतींना रंग लावत रहा

अशा निगुतीनं राखलेल्या घराला
हात-पाय फुटतात

मग उद्या तुम्ही कुठेही जा
अगदी स्वत:ला विसरून गेलात
तरी चालेल

तुमचं घर
तुम्हाला शोधून
परत घरी घेऊन येईल
■



■ **यशस्वी पुरुष**

तो शिव्या खाऊनही गोड हसतो
प्रत्येक अपमान विसरून जातो
प्रत्येकाच्या 'हो'ला 'हो' म्हणतो
त्याला यशाचा मार्ग सापडला आहे
तो लवकरच

दुसऱ्यांना
सतवण्याच्या कलेत
वाकबगार होईल
■

■ **नवा रोग**

हा नवा रोग आहे
आजच्या काळाचा

या नव्या रोगाची
काहीच स्पष्ट ओळख नाही
ज्याची शहनिशा करता येऊ शकेल

प्रत्येक इलाज निष्प्रभ,
वैद्य-हकीम
निरूपाय होऊन हतबल बसलेले

प्रत्येक सळसळणाऱ्या शेतात
गव्हाच्या लोंबीसोबत
लगडलेलं असतं मौन
सन्नाट मौन

जे घासातून गळ्याखाली
उतरताना
एखाद्या कसरीसारखं
फस्त करते आवाजाच्या विजा

ओठ गच्च मिटलेला
छान छान कपड्यातला हा माणूस
सगळं काही बघतो
पण बोलू नाही शकत
विचार करू शकतो
पण आक्रोश नाही करू शकत

हा नवा रोग आहे
■



## ■ तिसरा माणूस

त्या दोघांमध्ये
घट्ट दोस्ती होती

त्यांची कुणा तिसऱ्या
माणसाशी असलेली दुश्मनी
हा त्यांच्या
या दोस्तीचा पाया होता

दोघांनी आपल्या एकसंध
प्रयत्नांनी
त्या दुश्मनाला
आपल्या मार्गातून हटवलं
आणि मग

ते दोघे एकमेकांचे
दुश्मन बनले
■

## ■ सत्य

ती
कुठल्या एका पुरुषासोबत
फार काळ राहू नाही शकत

ही तिचा नाईलाज नाही
सत्य आहे

पण जितके दिवस ती
ज्या पुरुषासोबत असते
त्याच्याशी प्रतारणा नाही करत

लोक भले
तिच्याबद्दल काहीबाही बोलो
पण!
कुठल्या एका घरात
आयुष्यभर खोटं बोलत
जगण्यापेक्षा
वेगवेगळ्या घरात
सत्य शिंपडत जगणे
अधिक सुंदर आहे
■

## ■ अंगण

ती तवायफ
अनेक पुरुष तिच्या ओळखीचे आहेत
कदाचित म्हणूनच
ही दुनिया ती चांगली समजू शकते

तिच्या खोलीत
प्रत्येक धर्माच्या देवाची
एकेक तसबीर लटकवलेली आहे

या तसबिरी
नेत्यांच्या भाषणासारख्या
दिखाऊ नाहीयेत
तिचं दार
रात्री उशिरापर्यंत
हिंदू-मुस्लिम-सिक्ख-इसाई
प्रत्येक धर्माच्या पुरुषासाठी
सताड उघडं असतं

देव जाणे
तिच्या खोलीसारखी
विशालता
मस्जिद आणि मंदिरांच्या
अंगणात
कधी निर्माण होईल!
■

## ■ सामाजिक सभ्यता

अरे माझ्या चोर मित्रा

काहीएक काम करताना ते
विशिष्ट चतुराईने करता
यायला हवं बघ
तू छोट्या-मोठ्या वस्तू चोरतोस
आणि तुरुंगात जातोस

पुढारी
मंत्री
सरकारी अधिकारी
हे सगळे जण
तुझ्याचसारखी माणसं आहेत रे
पण तू
सामाजिक सभ्यतेच्या चौकटीपासून
कोसो योजने लांब आहेस
म्हणूनच
चोर म्हणून बदनाम आहेस
■

## ■ मुखवटे

निळे, पिवळे, हिरवे, गुलाबी
मी सगळ्या प्रकारचे
रंगीत मुखवटे
आपल्या खिशात ठेवलेत

आता माझा चेहरा
बिल्कुल नग्न

आता माझे साथीच माझ्यावर
पावलोपावली
दगड मारताहेत

कदाचित ते
माझ्या चेहऱ्यात
आपले चेहरे
बघत असावेत
■



## ■ प्रेम

तरी दोघं
खूप गरीब आहेत
ना त्यांचं कुठे घर
ना कुठे आसरा
पण सहा दिवस
कुणाकुणाच्या घरी
मोलमजुरी केल्यानंतर
जेव्हा ते

रविवारी संध्याकाळी
एकमेकाला भेटतात
तेव्हा या अख्ख्या
शहराला
श्रीमंत करून टाकतात
■


– चंद्रशेखर सानेकर
भ्रमणध्वनी : ९८२०१६६२४३
chandrashekhar.sanekar@gmail.com

## महाराष्ट्रभूषण कविवर्य मंगेश पाडगावकर यांना
## विनम्र श्रद्धांजली

धारानृत्य • जिप्सी • निंबोणीच्या झाडामागे • छोरी • शर्मिष्ठा • उत्सव
वात्रटिका • मीरा • भोलानाथ • विदूषक • बबलगम • सलाम • गझल
भटके पक्षी • तुझे गीत गाण्यासाठी • बोलगाणी • सुट्टी एके सुट्टी
चांदोमामा • वेडं कोकरू • आता खेळा नाचा • झुले बाई झुला • राधा
उदासबोध • त्रिवेणी • कबीर • मोरू
सूरदास • कविता माणसांच्या, माणसांसाठी • नवा दिवस
अफाटराव • वाढदिवसाची भेट • फुलपाखरू निळं निळं
वादळ • ज्यूलिअस सीझर • रोमिओ आणि ज्यूलिएट
आनंदऋतू • सूर आनंदघन • मुखवटे • गिरकी
बायबल • शब्द • क्षणिका • अखेरची वही



# प्रेमाचा सुवास

**अरुण जाखडे**

**मा**झे मामा दंडवत घालताना गेले, आईने गुरुपौर्णिमेचा मुहूर्त साधला, पिताश्रींनी वसंतपंचमी साजरी केली, असं सांगणाऱ्या-लिहिणाऱ्या दभिंनी संकष्ट चतुर्थीचा मुहूर्त निवडला. २७ जानेवारी २०१६ रोजी त्यांनी शेवटचा श्वास घेतला. गणपती म्हणजे विद्येची देवता, त्यांना दुसरा मुहूर्त नकोच असावा.

राहो बनून आकाश
माझा शेवटचा श्वास
मनामनात उरावा
फक्त प्रेमाचा सुवास

म. म. देशपांडेंच्या कवितेवर जिवापाड प्रेम व त्यांच्या कवितेचे संगोपन करणाऱ्या दभिंची इच्छा अशीच असणार. माझा शेवटचा क्षण आकाशाएवढा विशाल व्हावा, त्यात कुठलेही किल्मिष, कुठलेही कश्मल राहू नये.

सर तुम्हीच शिकवली आम्हाला ही 'मम'ची कविता आणि त्या कवितेच्या ओळी - त्यामुळेच त्या आठवल्या - आपले शेवटचे दर्शन घेताना. हा प्रेमाचा सुवास मनात - नाकात साचून ठेवला आहे.

येथे शिकवली ह्या अर्थाने की मी त्यांचा वाङ्मयीन विद्यार्थी होतो. पण वर्गातला विद्यार्थी कधी नव्हतो. आमचा परिचय झाला आणि त्यांच्याबरोबर होणाऱ्या गप्पा, चर्चा, वेळप्रसंगी वाद-विवाद यांतून मी बरेच शिकत गेलो. लेखकाच्या सहवासात प्रकाशकही घडत असतो. पण हे घडणे इतके शुद्ध वाङ्मयीन की या गोष्टीचा कधी माझा मलाच हेवा वाटतो. काही प्रतिभावंत-संशोधकांमुळे मी घडलो म्हणावे लागेल, त्यात दभि महत्त्वाचे.

दभि हाडाचे शिक्षक होते. सतत काहीतरी नवीन सांगितले पाहिजे, समोरच्याला समजवता आले पाहिजे हा त्यांचा स्वभाव. अध्ययन आणि अध्यापनाशिवाय सहा दशकांपेक्षा अधिक काळ दुसरे काही केले नाही; पण वयाच्या सहाव्या वर्षापासूनच वाङ्मयाशी, ग्रंथाशी जुळलेले त्यांचे नाते पुढे अधिकच घट्ट होत गेले.

**दभि हाडाचे शिक्षक होते. सतत काहीतरी नवीन सांगितले पाहिजे, समोरच्याला समजवता आले पाहिजे हा त्यांचा स्वभाव. अध्ययन आणि अध्यापनाशिवाय सहा दशकांपेक्षा अधिक काळ दुसरे काही केले नाही; इतके अंतर्बाह्य वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व माझ्या पाहाण्यात आले नाही.**

आयुष्यभर त्यांनी वाचन, चिंतन, लेखन, पुनर्वाचन, पुनर्चिंतन यांशिवाय दुसरे काही केले नाही. इतके अंतर्बाह्य वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व माझ्या पाहाण्यात आले नाही. यासाठी त्यांनी नातेवाईक टाळले, पूजा-अर्चा-कर्मकांड यांपासून दूर राहिले. अलिप्ततेची भूमिका घेतल्याशिवाय तुम्हाला झोकून देता येणार नाही, ही त्यांची भूमिका आणि त्यांनी शेवटपर्यंत हा नियम पाळला. घरगुती गप्पागोष्टींपेक्षा वाङ्मयीन गप्पागोष्टीतच ते रमायचे. त्यांची वाङ्मयनिष्ठा अशी लखलखीत होती.

सरांशी फोन व्हायचा. तो बहुतेक काहीतरी वाङ्मयीन शंकेसाठी किंवा त्यांचे त्यासंबंधी मत जाणून घेण्यासाठी. बऱ्याचवेळा अशा शंकांचे उत्तर एक-दोन वाक्यात संपवणे शक्य असते. पण सर तिच्या आजूबाजूचे सगळे संदर्भ समजावून सांगत. एक मिनिटाची शंका परंतु फोन अर्धा-पाऊण तास चाले. कधी त्यांनी फोन केला आणि चर्चा रंगत गेली तर ती तासभरसुद्धा चाले. परवा शाम धोंड ह्या कवीमित्राने मला विचारले, ''सरांना फोनचे बील किती येत असावे?'' पण सरांना त्याची फिकीर नव्हती. आपण त्यांना आभार म्हटले किंवा सर तुम्हाला अवेळी त्रास दिला म्हटले तर ते म्हणायचे, ''अरुणराव, खऱ्या व प्रामाणिक शंका मनात निर्माण होणे हे बुद्धिमत्तेचे लक्षण आहे, पण पहाटे किंवा मध्यरात्री आपल्या आपणच त्या सोडविणे, हे त्याहून अधिक बुद्धिमत्तेचे लक्षण आहे.'' कधीकधी ते विनोदाने म्हणत, 'तुम्ही विचारता कारण तुम्हाला माझे अज्ञान जाणून घ्यायचे आहे' आणि आम्ही खळखळून हसत. माझे वाङ्मयीन स्नेही डॉ. हेमंत खडके. हे तर अमरावतीहून सरांशी बोलताना बाजूला वही-पेन घेऊन बसत किंवा सरांचे बोलणे टेप करत असत. अमरावतीला जाऊन तुम्ही ऐकू शकता सरांचे फोनवरचे टेप केलेले हे वाङ्मयीन संवाद.

ह्या वाङ्मयसंवादाला वेळ, काळ, प्रत्यक्ष, फोनवरून, मोबाईलवरून याचे कसलेही बंधन नव्हते. पाहून सांगतो, विचार करून सांगतो, नंतर फोन करा अशी उत्तरं सरांकडे नसत. त्याचे मुख्य कारण सरांची स्मरणशक्ती. व्यासंग, चिंतन आणि विविध

विषयांचा सखोल अभ्यास. बोलताबोलता सर सहज म्हणत, 'अहो, १९५७ च्या अमुक-अमुक अंकात अमुक पानावर हा लेख आहे, त्यात तुम्हाला हे सगळे मिळेल.' इतके समृद्ध वाचन पण ते स्मरणात ठेवण्याची त्यांची क्षमता थक्क करणारी होती. ते म्हणत, 'तुमच्याशी त्याविषयी-लेखाविषयी बोलताना माझ्यासमोर तो अंक किंवा ते पुस्तकच दिसत असते. काल-परवा वाचल्यासारखे.' गेल्या साठ वर्षातले सरांनी सगळे वाचलेले आहे, व ते लक्षात ठेवले आहे, याची प्रचीती वारंवार आली.

गेल्या साठ वर्षातले नव्हे, सरांना हाल सातवाहनांपासून राष्ट्रकुटांपर्यंत आणि महानुभव, ज्ञानेश्वरीपासून २०१६मधील दिवाळी अंकातील चांगल्या लेखांची, कवितेची, कथांची माहिती असे. पण ही केवळ माहिती नव्हती. त्यात ज्ञानात्मक अविष्कार असे. ती साहित्यकृती का चांगली, का वाईट याचेही ते विश्लेषण करीत.

ज्ञानाची सतत भूक असलेले दभि व्यावहारिक जगापासून मात्र दूर राहिले. कोणी बोलावले तर आपण मला किती मानधन देणार, वगैरे गोष्टी सरांकडे नव्हत्या. वेळप्रसंगी पदरमोड करून त्यांनी अनेकांना मार्गदर्शन केले, मदत केली. अलिकडे मणक्याच्या आजारामुळे ते गाडी घेऊन या म्हणत. पण ती त्यांची अट नव्हती, ती शारीरिक मर्यादा होती. व्यावहारिक व प्रापंचिक गोष्टींपासून त्यांनी मोकळीक घेतली होती.

सरांचा आणि माझा स्नेह गेल्या १९ वर्षांपासूनचा. प्रथम भेटीचा हेतू त्यांची पुस्तके प्रकाशित करावीत हा नव्हता. व्यंकटेश माडगूळकरांच्या (तात्यांच्या) सांगण्यावरून त्यांना भेटायला गेलो होतो. तात्यांनी सांगितले, 'प्रकाशकाची वाङ्मयीन दृष्टी व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व तयार होण्यासाठी प्रकाशकाचा वाङ्मयाचा अभ्यास असला पाहिजे. केवळ आवड ही गोष्ट उपयोगाची नसते.' मी वाङ्मयाचा वा कला शाखेचा विद्यार्थी नव्हतो. शास्त्र शाखेचा होतो व नोकरी इंजीनिअरिंग क्षेत्रातली. त्यामुळे असा अभ्यास होण्यासाठी माडगूळकरांनी डॉ. व. दि. कुलकर्णी, डॉ. द. भि. कुलकर्णी, ग. रा. कामत ह्यांचे मार्गदर्शन घ्यावे असे सुचविले. कामतांकडे जायला मला जमले नाही, पण वदि आणि दभिंना भेटलो, ते वाङ्मयाच्या अभ्यासाचे मार्गदर्शन घेण्यासाठी आणि तो हेतू शेवटपर्यंत राहिला. हे चालू असताना त्यांची पुस्तके प्रकाशित केली, हा व्यावहारिक भाग नंतरचा व दुय्यम आहे. ह्या काळात नकळत आम्ही अधिक जवळ येत गेलो व कौटुंबिक स्नेहीसुद्धा बनलो. त्यामुळे लेखक-प्रकाशक असे संबंध पहिल्या भेटीपासून ते शेवटपर्यंत नव्हते.

सरांची ३५ ते ४० पुस्तके वेगवेगळ्या प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत. मी सरांची १० पुस्तके प्रकाशित केली; पण त्यांची तीन महत्त्वाची पुस्तके मात्र माझ्या प्रकाशनसंस्थेकडे आहेत, याचा मला अभिमान आहे. ती म्हणजे - 'महाकाव्य : स्वरूप व समीक्षा', 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुन:स्थापना' आणि 'अनन्यता मर्ढेकरांची'.

दहा पुस्तकात समीक्षेप्रमाणेच ललित लेखांची पुस्तके काढली. सरांच्या सांगण्यावरुन म. म. देशपांडे यांची दोन पुस्तके प्रकाशित केली, त्याचे संपादन मात्र सरांनी केले. 'अंतरिक्ष फिरलो पण...' ह्या ममंच्या कवितासंग्रहाला त्यांनी डॉ. शाम धोंड यांचेही संपादनासाठी सहकार्य घेतले. डॉ. धोंड यांना पीएच.डीसाठी म. म. देशपांडे यांची कविता हाच विषय त्यांनी दिला होता.

सरांनी मनापासून प्रेम, अभ्यास व चिंतन केले ते ज्ञानेश्वर आणि मर्ढेकरांवर. पण जीए, मुक्तिबोध, बेडेकर, म. म. देशपांडे, पु. शि. रेगे, प्रभाकर सिरास, श्रीनिवास सिरास अशा त्यांच्या समकालीन अनेक लेखकांवरही केले. ह्या प्रतिभावंतांचे वाङ्मयीन संगोपन, संवर्धन करणे ही वाङ्मयीन जबाबदारी समजून केले. पीएच.डी. किंवा तत्सम हेतू न ठेवता. पुढे महाराष्ट्रात नावारूपाला आलेले अनेक विद्यार्थी त्यांना लाभले. समोर चांगले विद्यार्थी असतील तर शिक्षक अधिकच खुलत जाऊ शकतो. केवळ दभिंसाठी नागपूर विद्यापीठात प्रवेश घेणारे अनेक विद्यार्थी त्या काळी होते. दभिंच्या वर्गात बसताना दभिंसारखेच आपण शिक्षक होऊन शिकवू हे सुप्त स्वप्न घेऊन ते विद्यापीठातून बाहेर पडत. सरांचे विद्यार्थी सांगतात, 'सरांचा तास संपूच नये असे वाटत असे. दुसऱ्या वर्गातले व कधीकधी दुसऱ्या विषयांतले विद्यार्थीसुद्धा येऊन बसत. सरांचे वक्तृत्व व बौद्धिक क्षमता यांचे विद्यार्थ्यांना आकर्षण असे.'

सरांचे काही विद्यार्थी पुढे माझे मित्रही झाले आणि काहींची पुस्तकेही प्रकाशित केली. सरांविषयी कधी प्रेमाने तर कधी नाराजीने ते बोलत राहिले. अर्थात सरांविषयी आंतरिक जिव्हाळा खूप असल्यामुळेच.

अलीकडे लोक भेटायला येतात. खाणं-पिणं, इतर गप्पा आणि आणखी बऱ्याच गोष्टींविषयी ते बोलतात, पण ते लोक पुस्तकं विकत घेत नाहीत आणि काही वाचत नाहीत. केवळ प्रसिद्धी हवी असणाऱ्या लोकांची ज्ञाननिष्ठा खोटी असते. त्यामुळे आजकाल वाङ्मयीन चर्चा कोणाबरोबर होत नाही, याची त्यांना खंत होती. या पार्श्वभूमीवर आमच्या भेटी सतत व्हाव्यात असे त्यांना वाटे. वाङ्मयीन गप्पा ही आम्हा दोघांची मानसिक व बौद्धिक गरज होती. आज वाटते अशा गप्पांतील महत्त्वाचे मुद्दे मी डायरीत लिहून ठेवायला हवे होते. केवळ प्रामाणिक वाङ्मयनिष्ठेपोटी आमची मैत्री वाढतच गेली.

उत्तम प्राध्यापक म्हणून नावलौकिक मिळविणाऱ्या दभिंची खरी ओळख महाराष्ट्राला आहे ती समीक्षक म्हणून. आपण कथा, कविता किंवा ललित लेख लिहितो याचे प्रदर्शन त्यांनी फार केले नाही किंवा तशी ओळख सांगण्याचाही त्यांचा प्रयत्न नव्हता; कारण त्यांना आपण समीक्षक आहोत याचा मोठा अभिमान होता. ज्ञानेश्वर, मर्ढेकर, जी. ए. यांच्याप्रमाणेच त्यांच्या समकालीन अनेक साहित्यकारांच्या साहित्यकृतींची त्यांनी समीक्षा केली. अशी समीक्षा करताना लांबचे जवळ आले आणि काही जवळचे लांब गेले. समीक्षकाला हा नाराजीचा टॅक्स भरावाच लागतो, तसा त्यांनी भरला. आपल्याला गुडी-गुडी किंवा लोकानुनय करून

लिहायला आवडत नाही, असे ते स्पष्ट म्हणायचे. अनेकांना दभिंनी आपल्या पुस्तकावर लिहावे असे वाटायचे; परंतु तसे प्रत्येकवेळी होत नसे. कलाकृती वाचल्यावर त्यावर समीक्षा करावी असे आतूनच वाटले पाहिजे, उगीच मनाविरुद्ध लिहिले तर ती कारागिरी ठरेल, असे त्यांना वाटायचे.

समीक्षेच्या क्षेत्रातील त्यांच्या नावलौकिकामुळे त्यांचा लोकसंग्रह वाढतच गेला. त्यांना विविध पुरस्कार मिळाले आणि पुणे येथे झालेल्या अ.भा.साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना मिळाले.

संमेलनाध्यक्ष होण्यापूर्वी पाच-सहा वर्षे अगोदर ते नागपूर सोडून पुण्यात स्थायिक झाले. पुण्यात त्यांच्या कारकिर्दीने पुन्हा नवे वळण घेतले. नवे श्रोते, नवे मित्र, नवा परिवार यात ते रमून गेले. पुण्यातील सांस्कृतिक क्षेत्रात ते स्थिर झाले आणि पुण्याने त्यांना संमेलनाध्यक्षपदही बहाल केले. सरांचे घर हे येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या वर्दळीने गजबजून गेले. सतत कार्यक्रम आणि प्रवास वाढला. ह्या गोष्टीबद्दल मी नाराजी व्यक्त करत असे. नाराजीचे कारण म्हणजे प्रकृतीची काळजी. पण ते सुपारी कातरता कातरता म्हणत, 'अरुणराव, काही काळजी करू नका. तंबाखू-सुपारी खातो म्हणूनही तुम्ही नाराजी व्यक्त करता, पण मी ठणठणीत आहे. तीन अटॅक एकाचवेळी येऊन गेल्यानंतर व बायपास झाल्यानंतर आपणास गेल्या वीस वर्षांत कोणताच त्रास झाला नाही', असे ते सांगत. आणि सुपारी वगैरे मी खातो पण शरीराला षड्रस हवे असतात. ते मी सेवन करतो. सरांच्या ह्या षड्रसात सोमरस मात्र नव्हता.

मणक्यांचा व पाठीचा आजार त्यांनी शिताफीने हाताळला. त्याचे फार कौतुक होऊ दिले नाही किंवा कामही थांबवले नाही. दररोज सकाळी लेखनिक येत असे. दुपारी व रात्री चिंतन. त्यामुळे लेखनिकाला ते एकपाठी सलग, सरळ सांगत. त्यांनी स्वत: हाताने लेखन फार कमी केले. वाचन-लेखन ही गोष्ट त्यांनी सातत्याने केली. अगदी शेवटपर्यंत.

सरांचे माझे एकमत झाले नाही, ते त्यांच्या ज्योतिषाच्या अभ्यासाबद्दल. सरांकडे अनेक विद्यार्थी, मित्र भेटायला जात, तेव्हा त्यांच्या अडचणी ते समजून घेत, सल्ला देताना ते शेवटी म्हणत, 'तुझी कुंडली घेऊन ये, सांगतो तुला काहीतरी मार्ग,' असे त्यांनी मला अनेकवेळा सांगितले, पण मी काही कुंडली घेऊन त्यांच्याकडे गेलो नाही. समोरच्या माणसाला अडचणीत काही मदत करावी, असे त्यांना वाटत असे आणि ही मदत ज्योतिषविद्येच्या माध्यमातून करावी असे त्यांना वाटत. यासंबंधी आम्हा दोघांत वादविवादाच्या अनेक चर्चा झाल्या. ते म्हणत, 'ज्योतिष हे शास्त्र नाही. ती विद्या आहे.'

वहिनी - सौ. शिवरंजनी कुलकर्णी दीनानाथमध्ये ॲडमिट होत्या. त्यांच्या शेवटच्या दिवशी मी दभिंबरोबर दिवसभर हॉस्पिटलमध्ये होतो. सर म्हणाले, 'अरुणराव, आजचा दिवस पार पडला की, शिवरंजनीचा धोका टळला, उद्या तिला आपण घरी घेऊन जाऊ शकतो.' दिवसभर थांबल्यानंतर संध्याकाळी घरी आलो अन् फोन आला वहिनी गेल्या. सरांचा हात हातात घेऊन मी त्यांचे सांत्वन करण्याच्या प्रयत्नात होतो, तर सर म्हणाले, 'आज दिवस जायला हवा होता. ग्रह बदलणार होते.' तो दिवस गेला नाही तसेच सरांबद्दल झाले. दिवाळीनंतर मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा सर म्हणाले, 'खांद्याचा व हृदयाचा थोडा त्रास आहे, पण माझी धनू रास आहे. हा महिना गेला तर मी ठणठणीत होईल; नेमाडेवर नव्याने लिहिलेले लेख व इतर काही लेखांचे पुस्तक मी तुम्हाला देणार आहे.'

पण तो महिना सरला नाही आणि सर गेले. अनेकवेळा ते मला सांगत, 'तुमची ही रास आहे ना, सध्या जरा जपून. हे चार महिने गेले की तुमचा ताण कमी होईल.' अशा प्रकारचे मार्गदर्शन ते करत. पण मी ते फार काळजीपूर्वक ऐकत नव्हतो. पुढे आमच्या गप्पा रंगत त्या काहीतरी वाङ्मयीन मुद्द्यावरच.

सरांच्या जाण्याने एकूण मराठी वाङ्मयव्यवहाराचे काय नुकसान झाले किंवा माझ्या 'पद्मगंधा प्रकाशना'चे काय झाले; यापेक्षा मला जाणवते ते माझे व्यक्तिगत नुकसान. माझ्या मुलांनी त्यांना सतत आजोबा म्हणूनच हाक मारली आणि माझ्यासाठी हे की, असे वाङ्मयीन संवाद, निखळ चर्चा करणारी माणसं लुप्त होत चालली. हे पोकळ रितेपण फार जाणवत आहे. निसर्गनियमानुसार ही माणसं वय झाल्याबरोबर जाणारच, पण एक गोष्ट जाणवते, ती म्हणजे त्याला पर्यायी मित्र सापडत नाहीत. आज साहित्याचे आणि साहित्यव्यवहाराचे व्यापारीकरण चालले असून बहिर्मुख, दुय्यम व उथळ लोकांचा सुळसुळाट वाढला आहे. ह्या पार्श्वभूमीवर दभिंचे व दभिंच्या पिढीतल्या लोकांचे जाणे फार क्लेशदायक वाटते. दभि अशा पिढीचे प्रतिनिधी होते, ज्या पिढीने महाराष्ट्राचे सांस्कृतिक व वाङ्मयीन जीवन समृद्ध केले. त्या पिढीचा एक-एक प्रतिनिधी निघून जातो तेव्हा संपूर्ण महाराष्ट्राचीच हानी होत असते.

दभिंच्या जाण्याने हे रितेपण जाणवले. सर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडून आल्याची बातमी टीव्हीवर आल्याबरोबर दै. लोकसत्तातून फोन आला - दभिंवर तासाभरात लिहून द्या. सुचेल तसा लिहिला. त्यांच्या आवडत्या कवीच्या कवितेचा उल्लेख करून लेखाला शीर्षक दिले होते, 'हा घे पुष्पगुच्छ तुला.' आजही ह्या लेखाचा शेवट 'मम'च्या कवितेनेच करावा वाटतो. सर, तुम्हीच तर सांगत होता- 'मम'ची कविता एक प्रार्थना असते.

इथला असून इथला न झालो...
जडाच्या नि चैतन्याच्या
आज संगमावर आलो.

सर, तुमचा पुढचा प्रवास तुम्हाला शांतीदायी आणि मोक्षदायी ठरो, हीच प्रार्थना!

**- अरुण जाखडे**
भ्रमणध्वनी : ९८५००८६४२३
arunjakhade@padmagandha.com

# शर्वरी : स्त्रीसुखाची कविता



**अरुण शेवते लिखित 'शर्वरीच्या कविता' या पुस्तकासाठी ज्येष्ठ साहित्यिक द.भि. कुलकर्णी यांनी लिहिलेली ही प्रस्तावना... त्यांच्या अक्षरप्रवासातील अखेरचीच ठरली...**

अरुण शेवते हे माझे आवडते कवी आहेत. शेवते यांची कविता सौंदर्यलक्ष्यी आणि अटकर आहे. हा कवी काही संप्रदायप्रवर्तक कवी नाही. मराठीत रोमँटिक कवींची जी परंपरा आहे तिच्यातलाच हा कवी आहे; ते आणि त्यांची कविता महत्त्वाकांक्षी नाही; त्यांची कविता अंतर्मुख, स्वतःला जगापासून जपणारी कविता आहे. लाजवंतीच्या पानाला बोट मुरडून स्पर्श केला की सगळी पाने कशी स्वतःला मुरडून घेतात, तशी ही कविता आहे. तिची समीक्षा नाही करायची, तिची प्रशंसा नाही करायची; फक्त एकांतात तिला आपलेसे करायचे.

असे असताना अरुण उगाच म्हणतो, 'सर, प्रस्तावना लिहा, प्रस्तावना लिहा,' अशा कवितेला प्रस्तावनेची गरज नसते; गरज असते, आस्वादाची. अरुणच्या कितीतरी कवितांचा मी हळुवारपणे आस्वाद घेतला आहे. आता 'शर्वरीच्या कविता ' हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित होत आहे. प्रत्येक कवितासंग्रहाबरोबर कविप्रतिभा कात टाकत असते असे मी समजतो. कुसुमाग्रज, अनिल, मर्ढेकर ही याची मूर्तिमंत उदाहरणे आहेत. कुठे जीवनलहरी आणि कुठे विशाखा; कुठे फुलवात, कुठे पेर्तेव्हा आणि कुठे शिशिरागम, कुठे काही कविता. हे कात टाकणेही नव्हे हा तर नवा जन्मच! अरुणची प्रतिभा कात टाकत नाही की पुनर्जन्महीस्वीकारत नाही. तिला आपली शालीन, मुग्ध, शेलाटी प्रकृती प्रारंभापासूनच सापडली आहे. रसिकाला जिंकण्याची किंवा काव्यप्रांत पादाक्रांत करण्याची ईर्ष्या अजिबात नाही. एखाद्या अलवार, कोवळ्या अंगाच्या ऑफव्हाइट रंगाच्या चिमुकल्या पक्ष्याने आपल्या स्कंधावर अचानक येऊन बसावे, कानाशी शीळ घालावी, तशी ही कविता.

'शर्वरीच्या कविता' ही मालिकाकविता आहे असे कवी म्हणतो. शिशिरागम, मानसी यांनाही मराठी अभ्यासक मालिकाकविता म्हणतात. मराठी समीक्षेत जे अनेक शब्द रूढ झाले आहेत त्यांपैकी मालिकाकविता हा एक शब्द होय. एकाच आशयकेंद्रावरील अनेक कवितांना अभ्यासक मालिकाकविता असे म्हणतात. ती काय मालिका असते? अहो, माळेला केंद्र नसते; या कवितांना केंद्र असतेच. मग त्याना गुच्छकविता कां म्हणू नये? गुच्छाला मध्यभागी एक ठळक रंगाचे फूल असते. त्याचा मान राखत इतर फुलांची वर्तुळे असतात. गुच्छाला आणि गुच्छकवितेला पूर्णत्व असते; जे माळेला आणि मालिकाकवितेला कधीच नसते. माळेत आठ फुले ओवावीत किंवा एकशे आठ काहीच फरक पडत नाही. गुच्छाचे तसे नाही.

खूप कवींना वाटते की, गुच्छकविता लिहिणे खूप सोपे. पाऊस, बर्फ, चांदण्या, विदेश असा एखादा विषय घ्यायचा आणि त्यावर कविता लिहायच्या. एकदम सोपे. तो निर्मितिप्रक्रियेचा अपमान असतो. निर्मितिप्रक्रिया काय इतकी सरधोपट असते? तिच्यात अंतर्मनाचा हुंकार असावा लागतो; स्मृतिशलाकांचा झिम्मा असावा लागतो; चिंतनाचे चमत्कारे असावे लागतात. आणखी खूप काही. त्या सगळ्यांचे अत्तर म्हणजे गुच्छकविता, त्या सगळ्यांचा परिमळ म्हणजे गुच्छकविता. शर्वरी ही अरुणची कन्यका. मातेला पुत्राबद्दल तर पित्याला कन्येबद्दल अनाम ओढ असते. ही ओढ खरोखरच सुवासासारखी पित्याभोवती जीवनभर रुंजी घालत असते. एका कवीने म्हटलेच आहे ना, 'ते प्रसूतीचें न ठावें दुःख यासाठीच का / लागती जीवास कन्यादान दुःखाच्या कळा?' 'शर्वरी'मध्ये कवीला प्रसूतीच्या वेदना लागलेल्या नाहीत. निर्मितीचा निर्मळ झरा त्याच्या अंतःकरणाला लागलेला आहे.

'शर्वरी'चा एक अर्थ तर आपल्याला माहीत आहे : रात्र. 'शशिनं पुनरेति शर्वरी'. याशिवाय आणखी दोन अर्थ आहेत शर्वरी या शब्दात. एक, हळद आणि दोन, स्त्री. श्रीहर्षाने आणि रघुनाथ पंडिताने 'दमयंती वरवर्णिनी' असे म्हणून हळदीवर सुरेख श्लेष साधला आहे. स्त्री या शब्दाबद्दल काय बोलावे? ' स्त्री म्हणजे केवळ गर्भधारणा प्रसवक्षम नारी नव्हे : संभवाचे साक्षात प्रतीक.' अरुण, तुझ्या या गुच्छकवितेत हे सारे सामावले आहे. मी तुझ्या कवितेची समीक्षा नाही करीत, फक्त तिचा एक नमुना पेश करतोः

*तू कविता*
*असतेस बाबांची*
*गणित पुसून टाकता येते*
*पाटीवरचे*
*कविता लिहिली जाते हृदयात ...*

बस्स इतकेच.

पुष्पगुच्छ घेणाऱ्याला पुष्पगुच्छ मिळतो पण देणाऱ्याच्या हाताला नव्हे, मनाला निखळ सुगंध लागतो.

**– डॉ. द. भि. कुलकर्णी**

# नास्तिकांचे अध्यात्म

**दिलीप करंबेळकर**



## तत्त्वमंथन

**विज्ञान विचारांच्याही पलीकडे असलेली एखादी अनुभवाची कक्षा आहे का? याचा शोध घेतला जाऊ लागला आहे आणि यातून अध्यात्माच्या नव्या वाटा खुल्या होत आहे. ईश्वरविरहित किंवा नास्तिकाचे अध्यात्म हा जडवादी बुद्धिप्रामाण्यवाद आणि असहिष्णू ईश्वरवाद यांना पर्याय होऊ शकतो. या पर्यायाच्या वाटा कर्मकांडातून किंवा काही श्रद्धांमधून निर्माण झालेल्या नसाव्यात तर निखळ बौद्धिक जिज्ञासेतून निर्माण झालेल्या अपेक्षित आहेत.**

**ऐहिक ज्ञानाची आस, निष्काम कर्मयोग, समाजहिताबद्दल श्रद्धायुक्त भक्ती व मनाच्या स्थिरतेसाठी आवश्यक तेवढी ध्यानसाधना ही नास्तिकांच्या अध्यात्माची म्हणजेच तिसऱ्या पर्यायाची चतु:सूत्री आहे. तिसरा पर्याय ऐहिक ज्ञानाला अधिक महत्व देणारा असेल पण आत्मज्ञान नाकारणारा नसेल.**

'ग्रंथाली' प्रकाशनाच्या शब्द रुची मासिकामध्ये सुरू झालेले तत्त्वमंथन अतिशय स्वागतार्ह आहे. आजची संस्कृती एका आवर्तात सापडली आहे. आजपर्यंत कधी कल्पनाही केली नसेल असे तंत्रज्ञान माणसाच्या हाती आले आहे. असे असूनही व्यक्तिगत स्तरावर प्रचंड हतबलता, निरर्थकपणा, पोकळपणा माणसाला जाणवू लागला आहे. त्यातून पुन्हा एकदा ईश्वराची भक्ती, कर्मकांडे यांचे सर्वत्र पेव फुटले आहे. पण त्यातही श्रद्धेपेक्षा दिखाऊपणा अधिक आहे. आजच्या समाजाचे भविष्य काय या प्रश्नाने वैचारिक विश्वाला ग्रासलेले आहे. उद्या कसा असावा याचे उत्तर देणाऱ्यांची तीन गटात विभागणी करता येईल.

त्यातील पहिल्या गटाला असे वाटते की या संस्कृतीपेक्षा जुनी संस्कृतीच चांगली होती व त्या संस्कृतीकडे परत गेले पाहिजे. त्यालाच यश वेलणकर ईश्वरवादी विचारसरणी म्हणतात. ही विचारसरणी मानणारे लोक वर्तमानातील प्रश्न भूतकाळातील उदाहरणे देऊन सोडविण्याचा प्रयत्न करतात. हे करीत असताना ते एक महत्वाची गोष्ट  विसरतात की काळाच्या मागे जाऊन भविष्यातील प्रश्नांची उत्तरे शोधता येत नाहीत. कृषिसंस्कृतीतून औद्योगिक संस्कृतीत झालेले स्थित्यंतर हे मानवी संस्कृतीने गाठलेल्या विकासाचा एक टप्पा आहे. सांस्कृतिक संघर्षात औद्योगिक क्रांतीच्या सामर्थ्यापुढे कृषिसंस्कृतीचा निभाव लागला नाही. औद्योगिक क्रांतीच्या आधी जागतिक बाजारपेठेवर चीन आणि भारत यांचे वर्चस्व होते. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर आधी युरोपीय देश व नंतर अमेरिका यांचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील महत्त्व वाढले. औद्योगिक प्रगती हे केवळ नवे तंत्रज्ञान नाही, तर त्यासोबत येणारी विचारपद्धती, मूल्यव्यवस्था व त्यातून निर्माण होणारी औद्योगिक संस्कृती हे तिचे अपरिहार्य घटक आहेत.

त्यामुळे यावर उत्तरे शोधणारा दुसरा गट म्हणतो की औद्योगिक क्रांतीने प्रस्थापित केलेली मूल्यव्यवस्थाच बरोबर आहे. सर्व जण त्या मूल्यव्यवस्थेनुसार वागत नाहीत, हाच खरा प्रश्न आहे. परंतु आज अनुभवावरून असे सांगता येते की, औद्योगिक संस्कृतीने निर्माण केलेली मूल्यविषयक चौकटच अशी आहे की, या चौकटीतून हे प्रश्न सोडवू शकणाऱ्या कुवतीचे नेतृत्व निर्माण होणे अवघड आहे. एकवेळ असे नेतृत्व निर्माण झाले, तरी  इतर नेतृत्वांच्या नेतृत्वाला बाधा येत असल्याने ते टिकणे अवघड आहे.

### विज्ञाननिष्ठेच्या मर्यादा

औद्योगिक संस्कृतीत मूलभूत वैचारिक घटक म्हणजे विज्ञाननिष्ठा. विज्ञाननिष्ठा तीन घटकांनी मिळून बनलेली असते. त्यातील पहिला घटक म्हणजे विचारांची पद्धत. प्रत्येक गोष्ट सिद्ध होईपर्यंत तिच्याकडे संशयाने पाहा असे हा घटक सांगतो. परमेश्वरावर, धार्मिक निष्ठांवर, धर्मग्रंथांवर श्रद्धा व विश्वास ठेवा असे सांगणाऱ्या मूल्यनिष्ठेला विरोध करणारी ही विचारपद्धती आहे. विज्ञाननिष्ठा केवळ प्रयोगशाळेत अनुभवसिद्ध झालेल्या गोष्टींवर विश्वास ठेवते. ज्या घटकांचे मोजमाप करून मूल्यमापन करता येत नाही, त्यावर ती विश्वास ठेवत

नाही. आणि विज्ञाननिष्ठेचा दुसरा भाग ज्या विशिष्ट पद्धतींनी एखादी घटना घडते किंवा वस्तू निर्माण करता येते, ती विशिष्ट पद्धत वापरल्यानंतर ती कोणत्याही व्यक्तीला आणि कुठेही करता आली पाहिजे. या विचाराचा चौथा घटक म्हणजे प्रत्येक घडणाऱ्या घटनेला कारण असते आणि त्यातून परिणाम घडत असतो. कारण आणि परिणाम यांचे तार्किक संबंध स्पष्ट करणारी साखळी म्हणजे विज्ञान. कोणताही विचार या चार वैज्ञानिक कसोटया पूर्ण करीत नसेल, तर त्या विचाराला विज्ञान विचारांत स्थान नाही आणि म्हणून औद्योगिक संस्कृती त्याकडे अंधश्रद्धा म्हणून पाहते.

**ईश्वराचा संदर्भ सोडून आपल्या अस्तित्वाचा विचार करणे हाही सामाजिक संस्कृतीच्या प्रगतीतला अटळ टप्पा आहे. ज्याप्रमाणे आईच्या हाताचा आधार सोडल्याने आई मुलाच्या जीवनातून रिटायर होत नाही, तसेच हे नवे भान आल्याने आजवरच्या सांस्कृतिक वाटचालीत ईश्वर या संकल्पनेने केलेले योगदानही रिटायर होऊ शकत नाही.**

जिवाचे स्वरूप अजून प्रयोगशाळेत सिद्ध करता आलेले नाही. त्यामुळे ज्याला जीव किंवा आत्मा म्हणतात, त्यावर आधारित सर्व विचार या वैज्ञानिक दृष्टीने बाद ठरतात. त्यामुळे होमिओपाथी किंवा साक्षात्कार, अनुभूती आदी विषय विज्ञान विचाराच्या कक्षेत येत नाही. परंतु माणसाला व्यवहारात या सर्व गोष्टींचा अनुभव येत असतो. हा प्रत्यक्ष येणारा अनुभव आणि विज्ञान विचार यांची संगती कशी लावायची? यापलीकडेही अनेक विषय आहेत की, ज्यांची संगती लावण्यात अजून तरी विज्ञान विचाराला यश आलेले नाही. एखादी व्यक्ती एका विशिष्ट सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्तर असलेल्या कुटुंबातच का जन्मते, सर्व घटक समान असतानासुद्धा एखादे वेळेस एखादे काम होते आणि एखादे होत नाही. यातील नशीब नावाचा घटक काम करत असतो, ज्याचे स्वरूप अजून तरी विज्ञानाला अज्ञात आहे. या सर्व अनुभवांची संगती कशी लावायची? मानवी वागणुकीवर परिणाम करणारे घटक कोणते आहेत? यावर नियंत्रण कसे प्राप्त करायचे? अशा अनेक दिशांनी आज विचारमंथन चालू आहे. त्यामुळे विज्ञान विचाराला सर्व मानवी अनुभवांना कवेत घेण्याची शक्ती अजून प्राप्त झालेली नाही, असा निष्कर्ष काढावा लागतो.

या पार्श्वभूमीवर विज्ञान विचारांच्याही पलीकडे असलेली एखादी अनुभवाची कक्षा आहे का? याचा शोध घेतला जाऊ लागला आहे आणि यातून अध्यात्माच्या नव्या वाटा खुल्या होत आहे. ईश्वरविरहित किंवा नास्तिकाचे अध्यात्म हा जडवादी बुद्धिप्रामाण्यवाद आणि असहिष्णू ईश्वरवाद यांना पर्याय होऊ शकतो. या पर्यायाच्या वाटा कर्मकांडातून किंवा काही श्रद्धांमधून निर्माण झालेल्या नसाव्यात तर निखळ बौद्धिक जिज्ञासेतून निर्माण झालेल्या अपेक्षित आहेत. भारतीय परंपरेतील ध्यान, योग आणि विपश्यना आदी संप्रदायरहित विशुद्ध अध्यात्माचा विचार करणाऱ्या संकल्पना या पर्यायासाठी आचरण मार्ग असू शकतात. विविध आध्यात्मिक साधनांत शरीर, मन आणि बुद्धीवर जे जैवरासायनिक परिणाम होतात, मेंदूवर जे परिणाम दिसतात त्याचे मापन करणेही आता शक्य होत आहे. आपल्या श्वासाला नियंत्रित करून त्या आधारे प्राणतत्त्वाचा उपयोग करीत आपल्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक प्रक्रियांवर नियंत्रण साधणे शक्य आहे. या अनुभवाचे मापन सर्व पातळ्यांवर करण्याची प्रयोगसिद्ध प्रक्रिया विकसित होत आहे. याच प्रक्रियांना आपल्याला 'नास्तिकांचे अध्यात्म' असे म्हणता येईल.

हा तिसरा पर्याय रूढ होण्यासाठी साठी विज्ञानाधिष्ठित प्रयोगशील अध्यात्माचे नवे दार उघडण्याची आवश्यकता आहे. त्याकडे लक्ष ठेवून अनेक लोक आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यातून अजूनही सुसंगत आणि एकात्म अशा स्वरूपाचे चित्र स्पष्ट झालेले नाही. परंतु मार्ग सापडेल तर तो याच प्रयत्नांतून सापडेल एवढा विश्वास वाटण्याइतपत या मार्गावरची पायवाट दिसू लागली आहे, एवढे मात्र निश्चित म्हणता येते.

प्रयोगशाळेचा मार्ग अध्यात्माचे शास्त्रीय स्पष्टीकरण देईल व जसजसे जनुकीय विज्ञान आणि जैवरासायनिक विज्ञान यांची प्रगती होत जाईल, आध्यात्मिक प्रगती व त्याचा माणसावर होणारा परिणाम यांचे आकलन वाढत जाईल व त्यातून काही निष्कर्ष निघाले तर कदाचित त्याचे उलटे प्रत्यंतरही शक्य होईल. उदाहरणार्थ, स्थितप्रज्ञ माणसाच्या शरीरातील जैवरासायनिक क्रियांचा अभ्यास केल्यानंतर तपस्या न करताही माणसाच्या शरीरात तशा कृत्रिमरित्या जैवरासायनिक क्रिया घडविता येतील व स्थितप्रज्ञ माणसे बनवून देणाऱ्या प्रयोगशाळा निघतील.

सामाजिक परिवर्तनात नास्तिकांच्या अध्यात्माची भूमिका कोणती असेल, याचा विचार केला पाहिजे.

ऐहिक ज्ञानाची आस, निष्काम कर्मयोग, समाजहिताबद्दल श्रद्धायुक्त भक्ती व मनाच्या स्थिरतेसाठी आवश्यक तेवढी ध्यानसाधना ही नास्तिकांच्या अध्यात्माची म्हणजेच तिसऱ्या पर्यायाची चतु:सूत्री आहे. आपल्या संस्कृतीत ज्ञान हा शब्द 'आत्मज्ञान' या अर्थाने वापरला जातो. आत्मज्ञान हेच खरे व बाकी ज्ञान हे खरे ज्ञान नव्हेच, ती माया आहे, ही आपली पारंपरिक शिकवण आहे. याचा परिणाम आपण ऐहिक ज्ञानाकडे तुच्छतेने पाहतो. त्यामुळेच आपली ऐहिक प्रगती झाली नाही. याउलट वैज्ञानिक विचार फक्त ऐहिक ज्ञानालाच मानतो. तिसरा पर्याय ऐहिक ज्ञानाला अधिक महत्त्व देणारा असेल पण आत्मज्ञान नाकारणारा नसेल.

आत्मिक आणि ऐहिक जाणिवांमधील परस्परपूरकता शोधायची असेल, तर त्या दोन्ही प्रवाहांकडे व त्यांच्या परिणामांकडे तटस्थतेने पाहणे भाग आहे. तसे पाहायचे असेल, तर जीवनापासून अलग होऊन त्याचा विचार करता येणार नाही. त्यासाठी निष्काम कर्मयोगाचा मार्ग उपयोगी पडतो. जो माणूस आत्मकेंद्रित आहे, तो कोणतीच गोष्ट तटस्थपणे पाहू शकत नाही. त्यामुळे निष्काम कर्मयोगाची पहिली पायरी म्हणजे आपल्या हितापेक्षा अधिक उच्चतर ध्येय डोळयासमोर ठेवून जीवन जगणे. ज्याप्रमाणे एका देवाच्या मूर्तिपूजेपासून सुरू झालेल्या भक्तीचा प्रवाह विश्वात्मक

देवाच्या भक्तीपर्यंत पोहोचणे आवश्यक असते, तसेच आपण आपल्या हितापेक्षा अधिक उच्चतर ध्येयाच्या दिशेने सुरू केलेल्या जाणिवांच्या विकासाचा प्रवास अखिल मानवीय व वैश्विक मूल्यांच्या जाणिवांपर्यंत विकसित झाला पाहिजे.

तसा तो विकसित व्हायचा असेल, तर आपल्या मनाच्या गाभ्यामध्ये मानवी हिताबद्दलची प्रगाढ श्रद्धायुक्त भक्ती असली पाहिजे. अशी भक्तीच आपल्या आंतरदृष्टीला सुयोग्य मार्गदर्शन करू शकते. ही भक्तीच संसारप्रवाहातील आपल्या प्रवासाची दिशा हरवू नये म्हणून सुकाणूचे काम करते. आणि हे सर्व करीत असताना संकटे असोत की यशाचे प्रसंग असोत, आपल्याला तणाव जाणवू नये, आपले भान हरवू नये म्हणून ध्यानधारणेची उपयुक्तता असते. त्याने आत्मभान आणि सजगता वाढवणे शक्य होऊ शकते.

प्राण्यांसोबतच्या जीवनसंघर्षात जेव्हा माणसाला आपल्या 'जाणिवेचा' शोध लागला, तेथून त्याचे जीवन बदलून गेले. आपल्या अस्तित्वरक्षणासाठी व समाजनिर्मितीसाठी त्याने 'ईश्वर' या संकल्पनेचा आधार घेतला. तो आधार प्रस्थापित करण्याकरिता स्वर्ग, नरक, ईश्वरी कृपा आणि कोप या संकल्पना तयार केल्या. परंतु जसजसा त्याच्या जाणिवांचा विकास होऊ लागला, विज्ञानाची प्रगती सुरू झाली, कार्यकारणसंबंधांचे नियम उलगडू लागले, तसतसे ईश्वरी सत्तेचे क्षेत्र कमी होऊ लागले. आता रोगाची साथ आली, तर लोक देवाला बळी न देता डॉक्टरांकडे जातात. माणसाचे बौद्धिक क्षेत्रजसे वाढू लागले, तशी त्याला आपल्या दैनंदिन जीवनात परमेश्वराची मदत कमी लागू लागली. या प्रक्रियेकडे आपण कसे पाहतो, हे महत्वाचे आहे. आईचा हात सोडून जेव्हा लहान मूल स्वबळावर चालू लागते, त्या वेळी त्याला होणारा आनंद अवर्णनीय असतो व तो त्याच्या चेहऱ्यावर दिसतो. अशा प्रकारे आईवरचे अवलंबित्व कमी होणे ही जशी व्यक्तीच्या विकासातला अटळ टप्पा आहे, तसाच ईश्वराचा संदर्भ सोडून आपल्या अस्तित्वाचा विचार करणे हाही सामाजिक संस्कृतीच्या प्रगतीतला अटळ टप्पा आहे. ज्याप्रमाणे आईच्या हाताचा आधार सोडल्याने आई मुलाच्या जीवनातून रिटायर होत नाही, तसेच हे नवे भान आल्याने आजवरच्या सांस्कृतिक वाटचालीत ईश्वर या संकल्पनेने केलेले योगदानही रिटायर होऊ शकत नाही. त्या संकल्पनेच्या कक्षा बदलतात. नेमके हे आज समजून घेण्याची गरज आहे.


– दिलीप करंबेळकर
भ्रमणध्वनी : ९५९४९६९६३१
kdilip54@gmail.com




# प्रतिसाद

## तिसऱ्या पर्यायाची आवश्यकताच काय?

'शब्द रुची'मधील 'तत्त्वचिंतन' हा विचार करावयास लावणारा लेख वाचला.

जडवादाच्या अतिरेकाने बोकाळलेला स्वार्थी चंगळवाद आणि ईश्वरवादाच्या अतिरेकाने वाढती असहिष्णुता यामुळे समाजासमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे असल्याचे आपण लिहिले आहे.

ईश्वराला 'ईश्वरवादात' टाकून आपण नवीन पर्याय शोधत आहात हे पटत नाही. आपण लिहिल्याप्रमाणे तिसरा पर्याय वगैरे शोधण्याची आवश्यकता वाटत नाही कारण हजारो वर्षांपासून भारतात चालत आलेली ईश्वराविषयीच्या श्रद्धेची परंपरा ही अनुकरणीय आहे. या श्रद्धेचे हनन करण्याचा विचार मनातून काढून टाकावा. आपले राष्ट्रपिता महात्मा गांधी नित्यनियमाने सर्व लोकांसह भजन करत असत. या मागेही श्रद्धाच होती. त्यांच्या संपर्कातून असंख्य देशभक्त व समाजोपयोगी कार्य करणारे लोक तयार झाले हे विसरून चालणार नाही.

आपण लिहिल्याप्रमाणे धार्मिक अतिरेक व असहिष्णुता कमी करणे खरोखर आवश्यक आहे यात शंकाच नाही. धार्मिक अतिरेक म्हणजे स्वत:च्या मार्गाचाच हट्ट करणे, टीका, सुधारणा मान्य न करणे, समाजातील इतर घटकाविषयी आपलेपणा व आदर न राखणे या गोष्टी निश्चितच सुधारण्याची आवश्यकता आहे.

माणसामधील हव्यास व भौतिक सुखाची चटक कमी करून त्याने समाजोपयोगी कार्य केले तर त्यातील देवत्वाची वा ईश्वरीय अंशाची कल्पना येते. आपणास कोणी मदत केल्यास आपण म्हणतो, 'देवासारखा धावून आलास'. देव वा ईश्वर म्हणजेच सत्यम् शिवम् सुंदरम्.

आपल्या समाजात आज असंख्य देवतुल्य लोक आहेत. महाराष्ट्रातील बाबा आमटे कुटुंबीय, डॉ. अभय बंग, मेळघाटातील डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ. सातव, गिरीश प्रभुणे आणि याशिवाय प्रसिद्धीच्या झोतात नसलेले असंख्य लोक आहेत. त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी पाहिजे व त्यांच्याप्रमाणे निस्वार्थ कार्य करण्याची तळमळ पाहिजे. अशी दृष्टी निर्माण केल्यास समाजासमोरचे प्रश्नचिन्ह आपोआपच नाहीसे होईल. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे आपला स्वधर्म म्हणजेच प्रत्येकाने आपले स्वत:चे नित्य कर्तव्य प्रामाणिकपणे व निस्वार्थपणे गरजेचे आहे. या भावनेने काम केल्यास जडवादात बोकाळलेला स्वार्थी चंगळवाद कमी होण्यास मदत होईल. याप्रमाणे आपल्या ग्रंथांचे अनुकरण व प्रत्यक्ष कृती करण्याची आवश्यकता आहे. इतर कुठल्या पर्यायाची गरज नाही.

ईश्वरविरहित अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय आपणास अभ्यासावयाचा असेल तर श्री पार्थसारथी यांचे 'वेदांत ट्रीएटाइज' हे पुस्तक अवश्य वाचावे.


– पुरुषोत्तम कऱ्हाडे (भ्रमणध्वनी : ९९८७०४१५१०)
purusho1508@hotmail.com




## माझे स्वप्न (डॉ. मार्टिन ल्युथर किंग, ज्युनिअर) – प्रभाकर जोशी

मी लोकांच्या बरोबर फ्रीडम मार्च, नागरिक हक्क बिल, बसवरील बहिष्कार, रेस्टॉरंट-मॉलमधील बैठा सत्याग्रह, सेलमातील मोर्चा या सर्व ठिकाणी मी तुमच्याबरोबरच होतो.

मी तुमच्याबरोबर असणार आहे. हे माझे वचन आहे.

सगळ्यांनाच दीर्घ आयुष्य जगण्याची इच्छा असते. मलाही आहे. मला तुम्हा लोकांना तुमचे हक्क मिळवून द्यायचे आहेत. हे कार्य करत असताना असेही घडू शकेल की तुम्हाला तुमचे हक्क मिळाले आहेत व त्यावेळी मी तुमच्यात नाही. मला तुमच्याकरता मरण आले तरी चालेल. मला माझी काळजी नाही. मला तुमची काळजी आहे. तुमच्या हक्कांची काळजी आहे.

तुम्हा लोकांना, तुमच्या सर्व मागण्या मिळणारच आहेत. माझे काय? मी कदाचित...'

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




## ऑस्कर 10 – अपर्णा पाटील

ह्या पुस्तकात फक्त त्या त्या कलाकृतीचा रसास्वाद नसून तो चित्रपट बनवताना घडलेल्या कहाण्याही आहेत. त्यातल्या कितीतरी गोष्टी मला ठाऊकही नव्हत्या. पटकथा, निर्मिती, कलाकारांची निवड, चित्रिकरणासाठी लागलेला वेळ, भावनिक गुंतवणूक ह्याबद्दल वाचायला मिळणं ही मेजवानी आहे! मिळालेल्या पुरस्कारांमुळे किंवा दणदणीत बॉक्स ऑफिस यशामुळे काही चित्रपट मैलाचे दगड बनतात, पण निर्मितीदरम्यान तो सिनेमा काय काय वळणं घेत गेला हे जाणणं कलाकार म्हणून मला अनोखं वाटलं. चित्रपटक्षेत्रातली एक विद्यार्थी म्हणून; प्रेक्षक म्हणून मी जेव्हा हे पुस्तक वाचलं, तेव्हा मला लेखिकेचे मनापासून आभार मानावेसे वाटले.

– सोनाली कुलकर्णी

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**




## ओळख सियाचेनची – अनुराधा गोरे

जगातील सर्वात जास्त उंचीवरील युद्धभूमी- सियाचीन
सियाचीनबद्दल एखादं पुस्तक वाचून ते समजून घेणं म्हणजे
सहा आंधळ्यांनी केलेल्या वर्णनावरून हत्तीचं चित्र डोळ्यासमोर आणणं-
वा वेड्यावाकड्या कागदाच्या तुकड्यांत एखादा अर्थपूर्ण आकार शोधणं-
पण हे करताना आपण जर त्याला राष्ट्रप्रेम, सैन्यदलाबद्दल आपुलकी
यांची जोड दिलीत-
आणि आमचे सैन्य आमच्या आणि आमच्या मातृभूमीच्या रक्षणासाठी कोणत्या दिव्यातून जातं हे जाणून घेणं आपलं कर्तव्य मानलंत तर-तर सगळं एकदम खूप सोपं होईल.

**मूल्य ४५० रु. सवलतीत २७० रु.**




# आजारी सिलिकॉन व्हॅली

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**तिथलं जीवन कलह व दबावग्रस्त असतं. इथे आठवड्याला ५०-६० तास काम करणं नॉर्मल समजण्यात येतं. याचे लोकांच्या स्वास्थ्यावर अनिष्ट परिणाम होतात असं जगविख्यात फॉर्चुन (Fortune) वित्तमासिकानं नुकतंच प्रसिद्ध केलं. म्हणजे सिलिकॉन व्हॅलीतल्या सोनेरी स्वप्नांना अस्वास्थ्याचं कृष्णवलय लागलेलं आहे असं संशोधनांती नुकतंच आढळून आलं. सिलिकॉन व्हॅलीमध्ये जपान, तैवान, चीन व ब्रिटन मिळून जेवढ्या नवीन कंपन्या स्थापन करतात त्यापेक्षा जास्त भारतीय अभियंते करतात. आजारी सिलिकॉन व्हॅलीमध्ये देखील आपल्या लोकांनी स्वर्ग निर्माण केला. पण त्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेतली नाही तर तो अल्पजिवी ठरेल.**

विठोबा म्हटलं की भाविकांच्या मनात भक्ती निर्माण होते तसंच सिलिकॉन व्हॅलीचा उल्लेख करताच अभियंत्यांच्या डोळ्यांत लक्ष्मीची ज्योत प्रज्वलित होते. ही जादू कॅलिफोर्नियामध्ये जेवढी घडते तेवढी इतर देशातील संगणक पार्कमध्ये घडत नाही. मॉस्कोच्या जवळ भला मोठा पार्क उभारला आहे. तिथून मानवी जीवन आमूलाग्र बदलणारा नवीन शोध झाल्याचं कुणी ऐकलं आहे का? आपल्या बंगळुरूमध्ये भारताची सिलिकॉन व्हॅली आहे. पण तिथे आयफोनसारखे क्रांतिकारक शोध लागण्याचे कुणाच्या ऐकिवात नाही. कोलकाता स्वतःला पूर्वेचं पॅरिस समजतं. पण तिथल्या कुठल्याच पार्कमध्ये आयफेल टॉवर नाही. सिलिकॉन व्हॅलीत जी ऊर्जा, चेतना, बुद्धीचापल्य व आत्मविश्वास आढळतो तो जगात कुठेच दिसत नाही. ही व्हॅली म्हणजे मानवी प्रतिभेच्या आविष्काराचं शिखर. तिचं परंपरेशी, प्रथेशी किंवा प्रस्थापितांशी कायमचं वैर.

तिचं ध्येय एकच. जुन्याचं विस्कटन करून अव्यवस्था निर्माण करणे. मग या शून्यातून नवीन जग करण्यात येतं. सर्जनातून प्रस्थापितांचा विलोप होतो याचं हे एक चांगलं उदाहरण. विस्कटातून निर्माण झालेलं नवीन विश्व सुटसुटीत, सुलभ, कार्यक्षम व सर्वसामान्यांना परवडण्यासारखं असतं. या प्रक्रियेत जुन्या मूल्यांची, विचारांची व समजांची पायमल्ली होऊन त्यांची जागा नवीन पद्धती व प्रक्रिया घेते.

असं विस्कटन करण्यात अफाट संपत्ती असते. तिशीत अब्जाधीश होण्याची अपेक्षा बाळगणारे हटकून सिलिकॉन व्हॅलीमध्ये घाम गाळतात. त्यातले काही १२ शून्यधारी संपत्ती प्राप्त करून जगावर आपली मोहोर उमटवतात. स्टीव्ह जॉब्जचा आयफोन, झुकरबर्गचं फेसबुक व सर्गे ब्रिन आणि लॅरी पेजचं गुगल नावाचं शोधयंत्र (search engine) याशिवाय जीवन जगता येत नाही. मनुष्य हा एक सामाजिक प्राणी समजला जातो. या संकल्पनेला या सुविधा खतपाणी घालतात. पूर्वीच्या काळी लक्ष्मी राजे, बादशहा किंवा सेनापतींच्या घरी पाणी भरत असे. आता ती बुद्धीजिवी अभियंत्यांना वरते. या संपत्ती निर्मितीची कॅलिफोर्निया राज्याला एवढी सवय झाली आहे की नवीन कंपन्यांचे समभाग विकून गलेलठ्ठ झालेल्यांवर भांडवलवर्धक कर (capital gains) लादून तो प्रांत आपलं पोट भरतो. जेव्हा सिलिकॉन व्हॅलीला ठेच बसते तेव्हा उभ्या कॅलिफोर्नियावर मंदीचं सावट पसरतं.

त्यामुळे जगाला या अद्भुत भूमीचं खूप आकर्षण आहे. इथे भारतासारखं आरक्षण किंवा कोटा नाही. मनुष्य इथे त्वचेच्या रंगावरून किंवा त्याच्या कुळावरून व मुळावरून ओळखला जात नाही. त्याच्या बुद्धीचातुर्याचा इथे आदर करण्यात येतो. इतर मानवनिर्मित भेद बाजूला टाकले जातात. त्यामुळे सर्व जगातून गुणवत्तेचे झरे इथे येऊन मिळतात. यात भारतीयांचा वाटा सर्वांत मोठा आहे. व्हॅलीमध्ये एकूण ८९,००० भारतीय लोक राहतात व त्यांची संख्या झपाट्यानं वाढत आहे. म्हणजे इथली ६ टक्के लोकसंख्या भारतीयांची आहे. पण ते व्हॅलीमधल्या १५ टक्के नवीन कंपन्यांना जन्म देतात असं प्रो. विवेक वांधवा म्हणतात. याशिवाय व्हॅलीपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या सॅन फ्रान्सिस्कोमध्ये ८६,००० भारतीय वास्तव्याला आहेत. पु.लं.नी म्हटल्याप्रमाणे

पुढ्यात कुणी खडा फेकला तर तो जसा एखाद्या विद्वानाच्या डोक्यावर पडण्याची शक्यता तसंच व्हॅलीमध्ये केलं तर तो एखाद्या भारतीय संगणक तज्ज्ञाचं शरसंधान करण्याची शक्यता.

इथलं गणित ठरलेलं आहे. पोटात आग असलेला तरुण (तो संगणकतज्ज्ञ असतोच असं नाही) आपल्या संकल्पनेच्या नाविन्यावर एक छोटेखानी कंपनी स्थापन करतो. त्यासाठी लागणारं वैधानिक ज्ञान व भांडवल व्हॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात सापडतं. मग मालकाला प्रियाराधन सुरू करावं लागतं. गुंतवणूकदारांना कंपनीच्या प्रेमात पाडणं सोपं नसतं. मोर मादीला आकर्षित करण्यासाठी आपला पिसरा पसरवतो तसे हे संकल्पनाधारक अनेक गुंतवणूकदारांसमोर आपल्या उदयोन्मुख कंपनीचं गुणगाण करून बीजभांडवल उभं करतात. कुठलाही नवीन प्रकल्प धोक्याचा असतो. ही गुंतवणूकही तशीच जोखमेची असते. गुंतवणूकदार कंपनीचे भागधारक होऊन तिच्या संचालक मंडळावर बसतात व संगणकेतर उलाढाली यशस्वी होण्यास मदत करतात. कंपनीचं भविष्य उज्ज्वल असेल व खप सारखा वाढत असेल तर तिचं सार्वजनिकीकरण करून समभाग जनतेला विकले जातात. कंपनी फायद्यात असलीच पाहिजे असा नियम नाही. याप्रमाणे संस्थापक आपल्या घामाचं मौद्रिकीकरण (monetization) करून श्रीमंत होतो. त्यासाठी दुसरा पर्याय म्हणजे आपली चिमुकली कंपनी एखाद्या मोठ्या कंपनीला विकणे. कल्पना जेवढी अभिनव तेवढी जास्त किंमत संस्थापक वसूल करू शकतो.

पण सर्वांनाच हे भाग्य लाभत नाही. काही फुलं उमलण्यापूर्वीच कुस्करली जातात. कारण सर्वांनाच गुंतवणूकदार मिळत नाही. या विषयी व्हॅलीतला व समाजातला जनमानस वेगळा आहे. अपयश इथे यशाकडे नेणारी पायरी समजली जाते. त्याची कुणी शिडी करू नये एवढंच. खाली पडलंच तर संस्थापक उठून पुन्हा कामाला लागतो. दुसऱ्या संकल्पनेचा पाठलाग करतो. ते शक्य नसेल तर तो इतरांच्या कंपनीत नोकरी पत्करतो. कुठल्याही क्षेत्रात सगळेच सेनापती होऊ शकत नाही. काहींना सैनिक होणं भाग पडतं.

या सिलिकॉन व्हॅलीतल्या जीवनचक्राचं वर्णन करण्याचं एकच कारण आहे. तिथलं जीवन कलह व दबावग्रस्त असतं. तणावाचे विषवृक्ष प्रत्येक वळणावर दिसतात. त्यांना सतत मुदतीच्या तारखांना (dead line) तोंड द्यावं लागतं. इथल्या योजना आपल्या पंचवार्षिक योजनेप्रमाणे पुढे ढकलता येत नाही. प्रत्येक गोष्ट मुदतीत संपवणं आवश्यक असतं. म्हणजे रात्रीचा दिवस करणं, भोजनाला लाथ मारणं व कौटुंबिक सुखापासून वंचित राहणं आलंच. इथे आठवड्याला ५०-६० तास काम करणं नॉर्मल समजण्यात येतं. ८० तासांच्या वर काम करणारेच खरे कष्ट उपसतात असा व्हॅलीत एक समज आहे. याचे लोकांच्या स्वास्थ्यावर अनिष्ट परिणाम होतात असं जगविख्यात फॉर्चुन (Fortune) वित्तमासिकानं नुकतंच प्रसिद्ध केलं. म्हणजे सिलिकॉन व्हॅलीतल्या सोनेरी स्वप्नांना अस्वास्थ्याचं कृष्णवलय लागलेलं आहे असं संशोधनांती नुकतंच आढळून आलं. असा अभ्यास पूर्वी अनेकांनी केला होता. पण भारतीयांची खाद्यपद्धती, संस्कृती व कर्तव्यनिष्ठा लक्षात घेऊन त्याची श्वेतवर्णियांशी तुलना करणारे डॉ. रॉनेश सिंहा यांची निरीक्षणं व अनुमान उल्लेखनीय आहे.

डॉ. सिंहा सिलिकॉन व्हॅलीतल्या अनेक नामांकित कंपन्यातल्या कर्मचाऱ्यांना भ्रमण वैद्यकीय सेवा पुरवतात. आपलं सुसज्ज ऑफिस एका भल्या मोठ्या वाहनात बसवून ते आपली व्हॅन कंपनीच्या वाहनतळावर उभी करतात. हे कर्मचारी सारखे आपल्या कामात व्यग्र असल्यामुळे पर्वतालाच मोहमदाकडे जाणं भाग पडतं. डॉक्टरांच्या ऑफिसची वेळ नियुक्ती करून तिथे जाण्यास त्यांच्याजवळ वेळच नसतो. त्यांच्याकडे गोरे रुग्णही येत असल्यामुळे त्यांना वांशिक भेदाचा अभ्यास करणं शक्य झालं. या संशोधनावरून त्यांनी जे निर्णय काढले ते खळबळजनक आहेत.

त्यांचे बहुतेक रुग्ण तरुण वयाचे, सुशिक्षित आणि सर्वसामान्यांपेक्षा जास्त मिळकत असलेले. तरीही त्यांच्या रक्त व देहतपासणीवरून सिंहांना असं आढळून आलं की, तीस वर्षांच्या भारतीय अभियंत्यात त्यांना ७० वर्षीय लोकांचं वार्धक्य आढळलं. मान वाकवून सारखं पटलाकडे बघावं लागल्यामुळे त्यांच्यात मान व कंबरदुखीचं प्रमाण जास्त. पण या व्यक्त लक्षणांशिवाय त्यांच्या आरोग्याला लागलेलं अव्यक्त गालबोट महत्त्वाचं होतं. रक्तात चरबीचं (triglyceides) व खराब कॉलेस्टरॉलचं प्रमाण जास्त व चांगल्या कॉलेस्टरालचं कमी. या शिवाय तणावग्रस्त परिस्थितीत सारखं काम करावं लागत असल्यामुळे त्यांचा रक्तदाब वाढलेला. त्यांना असंतुलित, अनियमित व अनिष्ट खाद्य खाण्याची सवय. म्हणून त्यांचं रक्तातील चरबीचं गुणोत्तर बिघडलं होतं. त्यांचं रोजचं जेवण म्हणजे कोक आणि पिझ्झा किंवा कुठले तरी प्रक्रियित आरोग्यघातक पदार्थ. शीतपेयात असलेली साखर आरोग्यसंवर्धक नसते.

कुठलाही मनुष्य जेव्हा तणावग्रस्त असतो तेव्हा त्याचे रक्तातील कॉर्टीसॉल (Cortisol) नावाच्या द्रव्याचं प्रमाण वाढतं. ही व्याधी व्हॅलीमध्ये डॉ. सिंहांना व्यापक प्रमाणात सापडली. या द्रव्याचे दुष्ट परिणाम आरोग्यावर कसे होतात त्याचं विवरण शरीरक्रियाशास्त्रात (physiology) वर्णित केलेलं आहे. रक्तातल्या साखरेचं नियंत्रण स्वादुपिंडातून निर्माण होणाऱ्या इन्सूलीन (Insulin) नावाचं द्रव्य करतं. ते साखरेचा प्राथमिक अवतार (glucose) पेशीमध्ये जाण्यात मदत करते. तिथे जैवभट्टीत ऊर्जा निर्माण होते. परंतु जेव्हा कॉर्टीसॉलचं प्रमाण वाढतं तेव्हा हे इन्सुलीन आपलं काम करू शकत नाही. त्यामुळे साखरेचा वापर ऊर्जाजननासाठी न होता तिचं चरबीत रुपांतर होऊन स्थूलता वाढते. बैठ्या जीवनशैलीमुळे या विकृत चयापचयाला पुष्टी मिळते.

याशिवाय भारतीयांचा आहार असंतुलित. त्यात भात व पोळ्या जास्त व प्रथिन कमी. हे पिठूळ पदार्थ स्थूलताजन्य असतात. त्यामुळे हृदयविकार वाढतात.

हृदयविकारांना आमंत्रण देणारे तीन घटक म्हणजे रक्तदाब, स्थूलता व रक्तातील चरबीचं व वाईट कॉलेस्टरालचं असंतुलित

गुणोत्तर. या त्रिकुटीचा लाल कंदील ३० टक्के श्वेतवर्णियात तर ५४ टक्के भारतीयांमध्ये डॉ. सिंहांना आढळला. म्हणजे गोऱ्यांपेक्षा देशी माणसांना सिलिकॉन व्हॅली जास्त धोक्याची आहे. त्यांची बुद्धी जरी तेज असली तरी देह अकाली वार्धक्याची लक्षणं दाखवतात. असा आरोग्यत्याग फार काळ करणं शक्य नसतं. या तीन धोका निर्देशक घटकांचा आपले लोक फार विचार करीत नाही, हे दुर्दैव.

यावरचं औषध म्हणजे तणावमुक्त जीवनशैली, संतुलित आहार ग्रहण व नियमित व्यायाम. या कंपन्यांमध्ये व्यायामशाळा व जलतरण तलाव असतात. तसंच ते आपल्या कॅफिटेरियामध्ये आरोग्यवर्धक अन्न देतात. परंतु इथले भारतीय अभियंते स्पर्धात्मक वातावरणामुळे अत्यंत कर्तव्यनिष्ठ. कामाच्या ओझ्याखाली ते या सुविधांचा उपयोग करीत नाही. ते शीतपेय व प्रक्रियित अन्नावर पोट भरतात. बील गेट्सचं उदाहरण ते आदर्श म्हणून समोर ठेवतात. तो हार्वर्डच्या प्रयोगशाळेत रात्री चोरून जाई व तिथे कोक आणि पिझ्झा फस्त करून जमिनीवर झोपे. या विस्कटलेल्या जीवनशैलीला नावापुरतं का होईना नेहमीचे गुण लाभावेत म्हणून इथले लोक वर उद्धृत केलेल्या सुविधांचा उपयोग न करता औषधांच्या आहारी जातात. क्झॅनॅक्स (Xanax) नावाच्या प्रतिप्रक्षुब्धतेवरच्या व रिटलीन (Ritalin) नावाच्या देहचेतन करणाऱ्या गोळ्या घेऊन काम करतात. या औषधांमुळे रात्री अंथरूणावर टेकलं की झोप येते व दिवसा काम करण्यास मदत होते. पण त्यामुळे रोगप्रवृत्ती कमी न होता वाढते.

आपले बहुतेक अभियंते एकपैलू व्यक्तिमत्वाचे. कित्येकदा त्यांना जैवशास्त्राविषयी काही एक ठाऊक नसतं. पुण्यातल्या एका लैंगिक उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी एकदा मला त्यांचं शारीरिक अज्ञान सांगितलं आणि मी स्तंभित झालो. त्यांच्याकडे अनेक वंध्यत्वग्रस्त संगणक अभियंते उपचारासाठी नेहमी येतात. त्या म्हणाल्या, काही रुग्णांना लैंगिक कृती कशी करायची याचं देखील ज्ञान नसतं. सर्वसाधारण कर्मचाऱ्याचं कामाऐवजी कामसूत्रावर जास्त लक्ष असतं. पण आपले संगणकतज्ज्ञ कर्तव्यानं एवढे झपाटलेले असतात की काम, अर्थ वगैरे पुरुषार्थामधल्या कामोत्सुकतेचा त्यांना विसर पडलेला असतो.

भारतातल्या अभियंत्यामध्ये हृदयविकार उद्युक्त करणारी जीवनशैली सापडते का? कदाचित तिचं स्वरूप सिलिकॉन वाढीएवढं गंभीर नसेलही. पण आपली बंगलोर व्हॅली कॅलिफोर्नियाशी संदेशवहनानं जोडलेली आहे. म्हणून तिथला तणाव आपल्या देशात येणं साहजिकच आहे.

भारतात अभियंत्यांची रेलचेल असली तरी हे हिरे ओबडधोबड असतात. अमेरिकेत ते तासल्यावरच प्रकाशमान होतात. सिलिकॉन व्हॅलीतल्या जवळजवळ सर्व मोठ्या कंपन्यांत देशी अभियंते काम करतात. त्यांनी आपल्या कर्तृत्वानं राजकारण्यांनी कलंकित केलेली देशाची प्रतिमा उजळली आहे. या बाबतीत त्यांचं काम खरोखरीच वाखाणण्यासारखं आहे. व्हॅलीतल्या तणावग्रस्त परिस्थितीतही अनेकांनी विक्रम केले. बडोदा विद्यापीठातून पदवीधर झालेला अजय भट 'जी' पोर्टचा पिता समजतात. पुण्याच्या विनोद धामनं इंटेल कंपनीत काम करून प्लॅटियम नावाची मायक्रोचिप काढली. चंदीगढच्या सबीर भाटियानं हॉटमेल शोधून काढली व १९९६ मध्ये ती मायक्रोसॉफ्टला विकली. आता मायक्रोसॉफ्टचे कार्यकारी मुख्याधिकारी सत्या नारडेला व गुगलचा अध्यक्ष सुदर पिचायनं भारताचं नाव अजूनच पुढे आणलं. प्रो. विवेक वाधवा यांच्या म्हणण्यानुसार सध्या सिलिकॉन व्हॅलीमध्ये जपान, तैवान, चीन व ब्रिटन मिळून जेवढ्या नवीन कंपन्या स्थापन करतात त्यापेक्षा जास्त भारतीय अभियंते करतात. आजारी सिलिकॉन व्हॅलीमध्ये देखील आपल्या लोकांनी स्वर्ग निर्माण केला. पण त्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेतली नाही तर तो अल्पजिवी ठरेल.

सध्या नवीन कंपन्या स्थापन करण्याचा धूमधडाका भारतात सुरू झाला आहे. या मागे अर्थातच अमेरिकन भांडवल आहे. त्या देशातील गुंतवणूकदारांनी मागच्या वर्षी ४ अब्ज डॉलर्स ओतून ४०० नवीन कंपन्या सुरू केल्या असं विख्यात वॉल स्ट्रीट जर्नल (नोव्हेंबर ९, २०१५) म्हणतं. याचं कारण असं की, आपल्या देशात मंत्रणा लेखकांचा (software writers)चा सुकाळ तर आहेच पण सिलिकॉन व्हॅलीतल्या एका अभियंत्याच्या पगारात भारतामध्ये ४-५ अभियंते कामावर ठेवता येतात. पण ही दोन्ही गृहितकं चुकीची ठरली, देश अभियंत्यांनी दुथडी भरला असला तरी त्यातले ७५ टक्के नोकरीअयोग्य आहेत असं आढळून आलं. मागणीमुळे गुणवत्ताधारी अभियंत्यांचे पगार खूप वाढले. २०१२ मध्ये कोरा करकरीत व उत्साहानं वाकलेला अभियंता २५,००० डॉलर (२२ लाख रुपये) देऊन कामावर ठेवता येई. आज तोच पगार वर्षाला ४५,००० डॉलर (३० लाख रुपये) वर गेला. ज्येष्ठ व अनुभवी अभियंत्यांची किंमत १ ते २ लाख डॉलरला (६५ ते १३० लाख रुपये) जाऊन भिडली. तरीही चांगल्या अभियंत्यांचा अशा कंपन्यांना तुटवडा भासू लागला. म्हणून त्यांनी सिलिकॉन व्हॅलीवर छापे टाकून तिथल्या देशी अभियंत्यांना मायदेशी आणण्याचा सपाटा सुरू केला. पैशाचं आमिष दाखवलं की काहीही करता येतं. हे कोळसा बल्लारशाला नेण्यासारखं असलं तरी त्यामुळे ॲपल, गुगल, याहूसारख्या कंपन्यांचं नुकसान झालं. हे अभियंते त्यांच्या मुशीत तासले जाऊन प्रकाशमान झाले होते.

आजाराचं सावट डोक्यावर व मायदेशाचं आमंत्रण जवळ असूनही बव्हंशी देशी अभियंते देशाकडे आगमन करण्यास तयार नाहीत हे विशेष. शेवटी चुकला फकीर मशिदीत जातो तसं जगभरातले, डोक्यात नवीन संकल्पना असलेले, अभियंते सिलिकॉन व्हॅलीचीच वारी करतात. तिला अनारोग्याचा शाप लागला आहे हे त्यांच्या ध्यानीमनीही नसतं.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
latalabh@aol.com

# मादाम क्युरी – अनुवाद : अश्विनी भिडे-देशपांडे




मूल्य ५०० रु.
सवलतीत ३०० रु.

पोलंड रशियन त्झारच्या जुलमी राजवटीखाली होता, त्या काळात पोलिश जनतेला मातृभाषेत बोलायचीही मोकळीक नव्हती, शालेय शिक्षण सक्तीनं रशियन भाषेत घ्यावं लागे, देवाची प्रार्थनादेखील परक्या रशियन भाषेतच म्हणावी लागे, अशा काळात, वॉर्सामधल्या एका शाळाशिक्षकाच्या घरी मारिया ऊर्फ मान्या या तेजस्वी मुलीनं जन्म घेतला. हुशार, तल्लख मान्या शालांत परीक्षेत पहिली आली, पण ज्ञानार्जनाच्या ध्यासानं झपाटलेल्या ह्या मुलीच्या पुढील शैक्षणिक वाटेवर अंधारच होता, कारण पोलंडमध्ये विद्यापीठात मुलींना प्रवेशच नव्हता! अशा परिस्थितीत, शाळेतून नुकतीच बाहेर पडलेली ही तडफदार मुलगी मोठ्या बहिणीला डॉक्टर बनण्यासाठी फ्रान्सला जाण्यास प्रेरित करते; परक्या घरी गव्हर्नेसची नोकरी करून बहिणीला उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत पुरवते; आणि पुढे बहिणीच्या आधारानं स्वतःच्या शिक्षणासाठी दूरदेशी फ्रान्सला प्रयाण करते. हलाखीच्या परिस्थितीत अत्यंत काटकसरीनं राहून, अपार परिश्रम करून आपल्या ध्येयाकडे वाटचाल करते.

वडिलांनी मुलांवर केलेले मूल्यवान संस्कार, भावंडांचे घट्ट प्रेमबंध, देशप्रेमाची प्रखर प्रेरणा, आणि पिएर-मारी, (नवरा-बायको आणि एकमेकांचे कार्यालयीन सहकारीदेखील) यांची परस्परपूरक व्यक्तिमत्त्वं, यांचा परामर्श घेणं आजच्या बदलत्या मूल्यांच्या काळात फार गरजेचं वाटतं.

कितीही मोठं आकर्षण समोर उभं राहिलं तरी क्युरी दांपत्यानं आपल्या मूल्यांवरची निष्ठा ढळू दिली नाही. श्रीमंती आणि काबाडकष्ट हे टोकाचे पर्याय नजरेसमोर स्पष्ट असूनही, आपल्या शास्त्रीय शोधाचं 'पेटंट' या दोघांनी घेतलं नाही. पतीसह नोबेल पारितोषिकाची मानकरी झाल्यावर जीवनाच्या समर्थ जोडीदाराला काळानं निर्घृणपणे ओढून नेलं. त्यानंतर ही एकाकी विधवा स्त्री आपल्या कुटुंबाला कसं सावरते, पतीबरोबरचं काम त्याच्या माघारी कसं पुढे नेते, त्यासाठी तिला कोणकोणती अग्निदिव्यं करावी लागतात त्याचा हा आलेख. 'मान्या'पासून सुप्रसिद्ध मादाम क्युरीपर्यंतच्या खडतर जीवनप्रवासाचा तिच्या मुलीनं रेखाटलेला हा परामर्श वाचणं एखाद्या परीकथेइतकं रंजक आहे, कवितेइतकं तरल आहे.

# आंदकोळ – किसन चव्हाण




मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रु.

"आंदकोळ" हे व्यवस्थेची चिरफाड करणारं किसन चव्हाण यांचं आत्मकथन. इथल्या व्यवस्थेनं जन्मजात गुन्हेगार ठरविलेल्या 'पारधी' जातीत लेखकाचा जन्म झाला आहे. या जातीत स्वातंत्र्यानंतर आजही माळरानावर टाकलेल्या पालात पोलिसांच्या व समाजाच्या भितीपोटी रात्री उजेडाचा दिवा लागत नाही. परंतु लेखकाच्या आई-वडीलांनी त्यांच्या वाट्याला आलेल्या नरकयातना मुलांच्याही वाट्याला येऊ नये म्हणून मुलांना शिक्षण देऊन पालात ज्ञानाचा दिवा लावला... एक दिवा पेटला... एक मेनबत्ती पेटली... की हजारो मेनबत्त्या पेटवता येतात आणि मग काय? त्याच मेनबत्त्या काळ्याकुट्ट आंधाराला छेदून प्रकाशच प्रकाश देतात. किसन चव्हाण आणि त्यांचे भाऊ उच्च शिक्षण घेऊन गुन्हेगारीचा लागलेला कलंक पुसून स्वाभिमानानं इथल्या विषमतावादी व्यवस्थेशी दोन हात करत आहेत.

लेखकाने इथल्या विषमतावादी व्यवस्थेची मुक्त कंठाने गोडवे गाणाऱ्यांनाही अंतर्मुख करणारे जळजळीत वास्तव प्रश्न आणि पावलो-पावली अवहेलना व अपमान करणारी, माणसातली गुणवत्ता नाकारून फक्त जातीलाच महत्व देणारी म्हणजे माणसालाच नाकारणारी इथली जातीय व्यवस्था व उपाशी मारणारी वर्गव्यवस्था यांचे विस्तवासारखे चटके लेखकाला व त्यांच्या अगोदरच्या अनेक पिढ्यांना सोसावे लागले आहे म्हणूनच तो संपूर्ण जिवन संघर्ष त्यांनी आपल्या टोकदार लेखनीने मांडला आहे, तो वाचतांना वाचकाला अस्वस्थ करून हादरून टाकतो.

हे आत्मकथन फक्त भोगवटा, दुःख, वेदना, यातना सांगुन थांबत नाही तर हक्क अधिकार व सामाजिक न्यायासाठी लढायला शिकवतं, म्हणूनच हे आत्मकथन रडगाणं ठरत नसून व्यवस्थेनं वर्षानुवर्ष दाबलेल्या व नाकारलेल्या बहुसंख्य शोषितांचं व उपेक्षितांचं 'जीवनगाणं' ठरतं. जीवन जगावं कस? रडत-रडत, कुढत-कुढत की लढत-लढत असं जीवन जगण्याचं तत्वज्ञान मांडणारं हे आत्मकथन पुरोगामी व परिवर्तनवादी विचाराला प्रेरक ठरणारं आहे.

# नाशिक जिल्हा संस्कृतिवेध
# वेध सिन्नर आणि निफाडचा!

'थिंक महाराष्ट्र डॉट काम'वर सादर केल्या जाणाऱ्या माहितीमध्ये समाजातील सकारात्मकता आणि विधायक घडामोडी यांचा विचार आणि शोध अंतर्भूत असतो. 'थिंक महाराष्ट्र'ने राज्याच्या गावागावातून माहितीचे संकलन करून समाजातील तशा सकारात्मक गोष्टींचा वेध घेण्याच्या उद्देशाने जिल्हावार मोहिमा सुरू केल्या आणि त्यातून घडली 'नाशिक जिल्हा संस्कृतिवेध' ही मोहिम! त्या मोहिमेत 'थिंक महाराष्ट्र'च्या कार्यकर्त्यांना घडलेले समाजाचे दर्शन उत्साहवर्धक आणि तेवढेच चकित करणारे होते.

'नाशिक जिल्हा संस्कृतिवेध' मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात ३ फेब्रुवारी २०१६ ते ६ फेब्रुवारी २०१६ या काळात सिन्नर आणि निफाड या दोन तालुक्यांचे माहिती संकलन करण्यात आले. 'थिंक महाराष्ट्र'च्या एकूण सोळा कार्यकर्त्यांनी केलेल्या गावागावांतील भटकंतीतून तेथील कर्तबगारीची आणि समाजाभिमुख उपक्रमांची नोंद करण्यात आली. सिन्नर आणि निफाड या दोन्ही ठिकाणी ३ फेब्रुवारी २०१६ रोजी सकाळी एकाचवेळी कामाला सुरुवात झाली. महेश खरे आणि मकरंद कर्णिक सिन्नर आणि निफाड येथील कार्यकर्त्यांच्या टिमचे नेतृत्व करत होते.

पहिल्याच दिवशी निफाडचे प्रल्हाद पाटील कराड यांची भेट झाली. सहकारातून चारशे कोटी रुपयांचा साखर कारखाना उभारणाऱ्या पाटील कराड यांच्या कामाचा आवाका मोठा! वयाच्या अठ्ठ्याऐंशीव्या वर्षीदेखील त्यांनी 'थिंक'च्या कार्यकर्त्यांसोबत स्वतः फिरून कामाची माहिती करून दिली. त्याचवेळी खडक माळेगाव या निफाडच्या सीमावर्ती भागातील गावात योगेश रायते या तरुणाने राबवलेले ग्रामविकासाचे वेगवेगळे प्रयत्न पाहून कार्यकर्ते भारावून जात होते. तर सिन्नरच्या देवपूरचे ग्रामस्थ कार्यकर्त्यांना गावातील राणेखानच्या ऐतिहासिक वाड्याच्या कहाण्या आणि इतिहास ऐकवत होते. माधव खंडेराव मोरे, प्रकाश वाजे, नामकर्ण आवारे अशा व्यक्तींच्या भेटींमधून तेथील शेतकरी-विडी कामगारांचा इतिहासही उलगडत होता. त्या सर्वांच्या भेटींमधून कार्यकर्ते उल्हासित होत होते. त्यांची ती भावना प्रत्येक टिमच्या सायंकाळच्या आढावा बैठकांमध्ये व्यक्त होत होती. एका बैठकीत सिन्नरच्या 'सहारा व्यसनमुक्ती केंद्रा'चे मधुकर गिते यांचे काम पाहून आलेल्या कार्यकर्त्याचे शब्दशः उद्गार होते- ''तो माणूस प्रती बाबा आमटे आहे!''

माध्यमांमधून शेतकऱ्यांची आणि शेतीची बिकट अवस्था चर्चिली जात असताना 'थिंक'चे कार्यकर्ते गावागावांतील प्रयोगशील शेतकऱ्यांना भेटत होते. त्यांची ऊर्जा आणि स्वतःचा उत्कर्ष करण्याची जिद्द स्तिमित करणारी होती. सिन्नरजवळच्या लोणारवाडीत सुरू असलेल्या 'देवनदी व्हॅली अॅग्रीकल्चरल प्रोड्यूसर कंपनी'ने सुमारे हजार शेतकऱ्यांना एकत्र करून रेड केमिकलचा वापर टाळत एकजुटीने शेती करण्याचा उद्योग राबवला आहे. तेथील कारभारी सांगळे, अनिल शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आरंभलेला तो प्रयत्न शेतकऱ्यांच्या आयुष्यात मोठा बदल घडवत आहेत. 'देवनदी'च्या प्रयोगांची माहिती घेण्यासाठी पंजाबसारख्या दूरवरच्या प्रांतातून अनेक शेतकरी बसने तीन दिवसांचा प्रवास करून येत असतात. 'थिंक'चे कार्यकर्ते 'देवनदी'च्या शेतावर त्यांची माहिती घेण्यासाठी पोचले तेव्हा त्यांना पंजाबचे अनेक शेतकरी प्रत्यक्ष भेटले. मोहाडी गावातील विलास शिंदे यांची पासष्ट एकरात पसरलेली 'सह्याद्री फार्मर्स फूड प्रोसेसर' ही कंपनी त्याच धर्तीची! तब्बल अडीच हजार शेतकऱ्यांच्या संघटनातून निर्माण झालेल्या त्या कंपनीने शेतमालाचा 'अमूल'च्या धर्तीवर उद्योग उभारला आहे. सोबत सतराशे मजुरांना रोजगार मिळवून देत वार्षिक उलाढालीचा दोनशे पंचवीस कोटी रुपयांचा आकडा गाठला आहे. प्रल्हाद खडांगळे यांची 'विंसुरा' ही विंचुर गावातील वायनरी शेतकऱ्याचे यशस्वी उद्योजकात रुपांतर होण्याचे उत्तम उदाहरण आहे. शेतकऱ्यांपासून ग्रामस्थांपर्यंत सर्वांना मदत करणारी आणि सकारात्मक बदल घडवणारी 'युवामित्र'सारखी संस्था, मुलांना लहान वयापासूनच 'एमपीएससी-युपीएससी' यांसारख्या परिक्षांची ओळख करून देण्यासाठी 'साहस' ग्रुपने त्या परिक्षांच्या धर्तीवर सुरू केलेली 'सिन्नर टॅलेन्ट हंट'सारखी स्पर्धापरिक्षा अशा महत्त्वाच्या प्रयत्नांची नोंद केली गेली. त्याजोडीला लहान-मोठ्या शेतकऱ्यांच्या भेटीगाठी होत होत्या. रोपवाटिकेतून प्रगती साधणारे मधुकर गवळी असोत, आपल्या शेतावर छोटीशी वायनरी टाकून शेतीचे व्यापारात रुपांतर करण्याचा प्रयत्न करणारे संजय कहांडल - अशोक सुरवडे असोत, किंवा राज्यात शेवग्याच्या लागवडीची सुरुवात करत शेवग्याचे नवे वाण विकसित करणारे बाळासाहेब मऱ्हाळे यांच्यासारखे शेतकरी असोत, शेतीतल्या त्या प्रयोगांची-प्रयत्नांची कहाणी अचंबित करणारी होती. त्या जोडीला डोळ्यांसमोर दिसणारा, बंगल्यांमध्ये राहणारा, महिन्याकाठी पन्नासेक हजारांपर्यंत पैसे घेणारा शेतकरी

आणि माध्यमांमधून भेटणारा गांजून-पिचून गेलेला शेतकरी अशा दोन प्रतिमांमधला विरोधाभासही जाणवत होता. त्यांपैकी अशोक सुरवडे हा शेतकरी एकीकडे शेतीत प्रयोग करत असताना पेंग्वीन पक्ष्याच्या अभ्यासाचे वेड घेऊन थेट अंटार्क्टिकाला जाऊन पोचला. माणसांनी मनी बाळगलेले असे विविध ध्यास आणि त्यांचा पाठपुरावा करण्याचे त्यांचे तऱ्हेतऱ्हेचे प्रयत्न प्रत्ययाला येत होते.

अमित निकम या तरूण शिक्षक-मुख्याध्यापकाने गावकऱ्यांना एकत्र करून त्यांच्याकडून ११ लाख रुपये एकत्र करावेत आणि त्यातून निफाडच्या रेडगावात 'डिजिटल स्कूल'चा आरंभ करावा हा चमत्कारच भासत होता. शिक्षण क्षेत्रात असे प्रयत्न सिन्नरच्या वडांगळी गावी राजेंद्र भावसार यांनी तर ठाणगाव येथे राहुल पगारे यांनी चालवले आहेत. राहुलच्या विद्यार्थ्यांच्या ठायी असलेली असलेली सामाजिक जाणीव, त्या मुलांनी लहान वयात कॅनव्हासवर वॉटर कलर्सच्या माध्यमातून चितारलेल्या कलाकृती आश्चर्यचकित करतात. लोभस डोळ्यांचा राहुल स्वतःच्या प्रयत्नांना विसरून तासनतास विद्यार्थ्यांच्या कलागुणांबाबत बोलत राहतो, तेव्हा मनात त्याच्या उपक्रमाविषयी त्मियता उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाही. डुबेरे गावातील प्रवीण वामने या तरुणाने इतरांना संघटित करून आरंभलेला ग्रामविकासाचा प्रयत्न आणि त्यामागचा त्याचा विचार-धडपड तेवढीच महत्त्वाची! त्याजोडीला दत्तकाका उगावकरांसारखे पक्षीमित्र, ज्ञानप्रबोधिनी व्याख्यानमाला चालवणारे विंचुर गावचे दिलीप कोथमिरे, लासलगावचे सामाजिक कार्यात गुंतलेले गंधे दांपत्य, सिन्नरचे इतिहास संशोधक माधवराव थोरात, अशा नानाविध मंडळींचे काम जाणून घेताना समाजात दडलेल्या ऊर्जेच्या भांडाराची प्रचिती येत राहिली. ते सर्व चित्र मुंबई-पुण्यापासून फक्त पाच तासांच्या अंतरावरचे, मात्र त्या घडामोडींचा त्या शहरांना सुगावाही लागत नसल्याची जाणीव पदोपदी होत होती.

मोहिमेतील कार्यकर्ते माहितीसंकलन करत असताना 'थिंक महाराष्ट्र'चे संपादक दिनकर गांगल, संचालक प्रविण शिंदे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी किरण क्षीरसागर यांनी स्थानिक महाविद्यालये-वाचनालये यांना भेट देत तेथील विद्यार्थी-गावकरी यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी विद्यार्थ्यांचा माहितीसंकलनात सहभाग असू शकेल ही कल्पना मांडण्यात अली. ती कल्पना काही उत्साही प्राध्यापकांनी उचलून धरत आपण ते काम करू असे आश्वासनही दिले.

डिसेंबर २०१४ मध्ये राबवलेल्या 'सोलापूर जिल्हा संस्कृतिवेध' मोहिमेमध्ये व्यक्ती, संस्था आणि गावागावातल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांची माहिती घेतली गेली. मात्र 'नाशिक जिल्हा संस्कृतिवेध'मध्ये इतिहासाऐवजी वर्तमानाकडे अधिक लक्ष देण्याचे ठरवले गेले. त्यामुळे तुरळक गोष्टी वगळता प्रामुख्याने व्यक्ती आणि संस्थांना भेटी देत माहितीची नोंद करण्यात आली. मात्र स्थानिक वैशिष्ट्यांचा-इतिहासाचा भाग दुर्लक्षित झाला नाही. तेथे जोडल्या गेलेल्या स्थानिक व्यक्तींनी 'थिंक महाराष्ट्र'ला तशी माहिती लिहून देण्याचे मान्य केले आणि माहिती पाठवण्यास सुरूवातही केली. स्थानिकांनी माहितीसोबत कार्यकर्त्यांच्या व्यवस्थेपासून त्यांच्या प्रवासांपर्यंत अनेक बाबतीत सहकार्य दाखवले. त्यामुळे मोहिमेचा खर्च काही प्रमाणात आटोक्यात आला. अशाच स्वरुपाचा अनुभव 'सोलापूर मोहिमेत'ही आला होता. स्थानिकांचे तसे सहकार्य मिळू शकले तर महाराष्ट्राच्या इतर जिल्हा-तालुक्यांमध्येही अशा माहितीसंकलनाच्या मोहिमा राबवणे शक्य होईल.

अखेरच्या दिवशी नाशिक शहरात 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम', 'ग्रंथाली', 'ज्योती बुक स्टोअर्स' आणि 'शंकराचार्य न्यास' यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्सव माणूसपणाचा' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी दिनकर गांगल यांनी उपस्थितांना 'थिंक महाराष्ट्र'ची संकल्पना विषद केली. त्यानंतर पत्रकार मुक्ता चैतन्य यांनी देवरायांचे अभ्यासक डॉ. उमेश मुंडल्ये आणि थॅलिसिमियाग्रस्त लहान मुलांसाठी काम करणाऱ्या सुजाता रायकर यांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखतींपूर्वी त्या दोघांच्या कामासंबंधात छोटेखानी फिल्मस् दाखवल्या गेल्या. मुंडल्ये यांनी देवराया हा विषय समजावून सांगताना त्यातल्या गंमतीजमतींसोबत त्याचे महत्त्व स्पष्ट केले. तर सुजाता रायकर यांनी थॅलिसिमिया या रोगाचे स्वरुप, त्याचा रुग्णासोबत कुटुंबावर होणारा परिणाम याबाबत माहिती पुरवली.

मुलाखतींनंतर डॉ. मुंडल्ये आणि सुजाता रायकर यांच्या हस्ते 'ग्रंथाली'च्या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर प्रशांत कऱ्हाडे यांनी 'ग्रंथाली'च्या 'अॅपली ग्रंथाली' या अॅपचे आणि टॅबचे पॉवर पॉइंटच्या सहाय्याने सादरीकरण केले. त्यापाठोपाठ गायक संजीव चिम्मलगी आणि कवी चंद्रशेखर सानेकर यांच्या गझलांचा 'एका उन्हाची कैफियत' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

'नाशिक जिल्हा संस्कृतिवेध'च्या मोहिमेतून बरीच माहिती गवसली. गावोगावच्या व्यक्तींचे कर्तृत्व, त्यांच्या प्रगतीच्या कहाण्या आणि समाजाभिमुख कामे जाणून घेता आली. तेथील घडामोडी भारावून टाकणाऱ्या असल्या तरी ते चित्र केवळ दोन तालुक्यांतले होते! उर्वरित नाशिक जिल्हा किंवा संबंध महाराष्ट्र पाहता जागोजागच्या त्या सकारात्मकतेचा, चांगुलपणाचा आवाका केवढा मोठा असेल याचा विचारच मती गोठवून टाकत होता. अशी ठिकठिकाणची माहिती संकलित करून लोकांपुढे सादर करण्यासाठी 'थिंक महाराष्ट्र' आणि 'थिंक'शी जोडलेले सर्व कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. मात्र त्यास स्थानिक सहकार्याची जोड लाभली तरच हे घडवता येईल.

**– किरण क्षीरसागर**
मुख्य कार्यकारी अधिकारी
व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन
भ्रमणध्वनी : ९०२९५५७७६७

**॥ग्रंथाली॥**

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी,
माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ • दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० • granthaliruchee@gmail.com www.granthali.com



# 'ॲप'ली ग्रंथाली

- गुगल ॲप स्टोअरमध्ये जा व टाईप करा ***appli granthali*** व दरमहा दोन पुस्तके, तीन मासिके, थिंक महाराष्ट्राच्या सौजन्याने (व्यक्ति संस्था, महाराष्ट्रातील वाडे व गड किल्ले) वाचण्यास मोफत मिळवा.
- जगभरातील वाचकांना ८ एप्रिल २०१६ या ॲपमधून आपणास मराठी भाषा, सिनेमा, नाटक, पुस्तक परिक्षणे, चांगले लेख, सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांच्या बातम्या यांचा आस्वाद घेता येणार आहे.
- १०० ई-पब बुक पुस्तकांची किंमत १५,०००/- रुपये ई-पुस्तके खरेदी करणाऱ्या पहिल्या शंभर वाचकांना मॅजिक वर्क्स आयटी सोल्युशन्सतर्फे ***(Micromax p680)*** हा टॅब भेट देण्यात येईल!

**८९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनानिमित्त वर्षभरातील ८९ पुस्तकांचा संच**
**मूळ किंमत २०,४३५ रुपये सवलतीत ८९०० रुपयांत ही योजना फक्त ८९ संचासाठी**




**'ग्रंथाली'कडे उपलब्ध असलेल्या ३०० पुस्तकांचा संच. प्रत्येक पुस्तक ८९ रु. याप्रमाणे २६,७०० रुपयांत उपलब्ध. या संचाची मूळ किंमत ५५,००० रु. आहे. ही योजना ८९ जणांसाठीच असेल.**
**(या दोन्ही संचासाठी 'ग्रंथाली'शी संपर्क साधावा.)**



ग्रंथपान

# किवी-माओरींच्या अनोख्या विश्वात!

शर्वरी जाधव

**जगभर** फिरण्याचे वेड असणारे अनेक असतात. तो ध्यास घेऊन प्रत्यक्ष फिरणारेही अनेक असतात. पण तो अनुभव अतिशय ओघवत्या भाषेत शब्दबद्ध करणारे, त्या-त्या ठिकाणच्या पर्यटन स्थळांबरोबरच तेथील संस्कृतीचा वेध घेणारे तर अपवादात्मकच असतात. नांदेडला राहणारे वैद्यकीय व्यावसायिक डॉ. अच्युत बन हे त्यापैकीच एक. २०१५ सालापर्यंत त्यांनी ४० देशांचा प्रवास केला आहे एवढेच नव्हे तर अतिशय सुरेख भाषेत ते 'अनुभव' शब्दांकितही केले आहेत. 'किवी-माओरींच्या विश्वात' हे त्यांनी लिहीलेले व मैत्रेय प्रकाशनाने प्रकाशित केलेले पुस्तक त्याचाच प्रत्यय देते .




सर्वसाधारणपणे लोक एकाच १०-१२ दिवसांच्या सहलीत ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड असे दोन्ही देश करतात त्यामुळे तेथील फक्त महत्त्वाची ठिकाणे पाहणे एवढेच साध्य होते. डॉ. बन यांच्या मते त्यासाठी किमान '३-४ आठवडे हवेत.' त्या दृष्टीने त्यांनी या दोन देशांसाठी दोन वेगवेगळ्या सहली आखल्या.

त्याची कारण मीमांसा करताना ते म्हणतात, 'न्यूझीलंड हा जगातील सगळ्यात तरुण देश म्हणता येईल. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडचा भूभाग कोट्यावधी वर्षांपूर्वी पृथ्वीच्या 'गोंडवाना' खंडापासून वेगळा झाला आणि हळुहळू दक्षिणेकडे सरकत गेला. पुढे न्यूझीलंडची उत्तर-दक्षिण बेटे ऑस्ट्रेलियापासून वेगळी झाली. त्यामुळे जगापासून वेगळ्या पडलेल्या या दोन्ही देशांतील वातावरण, वन्यजीवन, प्राणिजीवन व सगळीच सजीव सृष्टी वेगळी ठरलेली आपण बघतो.

ऑस्ट्रेलियातील 'अबओरीजिन' आदिवासी आणि न्यूझीलंडमधील 'माओरी' हे आजही आपले अस्तित्व टिकवून आहेत. १८४० पासून न्यूझीलंड ही ब्रिटनची अधिकृत वसाहत म्हणून जाहीर झाली. आज न्यूझीलंडमध्ये दोन संस्कृती आणि दोन राष्ट्रभाषा अधिकृतपणे नांदत आहेत.

सृष्टीसौंदर्यासोबतच तेथील मानवी संस्कृतीची ऐतिहासिक जडणघडण जवळून बघण्याची माझी इच्छा या सहलीत काही अंशी पूर्ण झाली.'

'किवी-माओरींच्या देशात' हे त्यांचे पुस्तक पानोपानी त्याचा प्रत्यय देते. आपल्यालाही त्या संस्कृतीचा परिचय घडवते. न्यूझीलंड हा मग आपल्यासाठी केवळ नकाशातला देश राहातच नाही. ती एक जिवंत कथा बनते. किवी-कवायत, ऑकलंड, माओरींच्या विश्वात : रोटुरुवा, वायटोमो - काजव्यांची गुहा, क्वीन्सलँड - पर्यटकांचा स्वर्ग, मिल्फोर्ड साउंड-पृथ्वीवरील स्वर्ग, पर्वत शिखरावर, स्कायलाईन गंडोला, क्वीन्सटाऊन ते ख्राइस्ट चर्च अशा या पुस्तकातील अनेक प्रकरणांतून ही कथा उलगडत जाते. आपल्याला एका अनोख्या भटकंतीचा परिचय घडवते.

*किवी-माओरींच्या विश्वात*
*ले - डॉ. अच्युत बन*
*मैत्रेय प्रकाशन*
*पृष्ठे -११२, मूल्य -१५० रुपये*
'ग्रंथाली येथे सवलतीत ४०० रु.

लोकवाङ्मय प्रकाशन

# ग्रंथपान

आजच्या पिढीतील मुलांचं भावविश्व कमालीचं बदललेलं आहे. लहानपणापासूनच आजच्या मुलांना समाजात घडणाऱ्या चुकीच्या आणि अन्याय्य गोष्टी पाहायला मिळत आहेत. बहुतांश घरात आईवडील (दोन्ही पालक) नोकरी करणारे असल्यामुळे मुलांकडे फारसं लक्ष दिलं जात नाही. एकत्र कुटुंबपद्धतीही कमी झालेली आहे. त्यातच आजचं जग हे तंत्रज्ञानाचं असल्यामुळे ही मुलं टीव्ही, लॅपटॉप, टॅब्लेट, स्मार्टफोन अशा गॅझेट्सच्या विळख्यात अडकलेली दिसतात. त्यातच हल्ली अनेक घरात एकुलतं एक मूल असतं. त्यामुळे 'शेअरिंग', 'केअरिंग' या भावनांचा अभाव या मुलांमध्ये आढळून येतो. एखादी गोष्ट आईवडील किंवा इतर कुणी त्यांना नाकारली, तर 'रिजेक्शन'ची भावना त्यांच्या मनात घर करून राहते. पराभव, अपयश पचवण्याची मानसिकता त्यांच्यात अभावानेच दिसते. त्यामुळे लहान मुलांवर योग्य वयात योग्य संस्कार करायला हवेत, नीतीमूल्यांची













ओळख त्यांना करून द्यायला हवी. मुलांना ही ओळख करून देण्याची जबाबदारी पालक म्हणून जशी आईवडिलांची आहे, तशीच ती समाजाचीही आहे. याच भावनेने 'लोकवाङ्मय गृह'ने बालदिनाच्या निमित्ताने बाललोकवाङ्मय विभाग सुरू करण्याचा निर्णय घेतला. भारतीय बालसाहित्य लिहिणाऱ्या लेखकांबरोबरच जागतिक स्तरावर नावाजलेल्या आणि जगण्याची मूल्यं जपणाऱ्या कथा या विभागामार्फत पोहोचवण्याचा प्रयत्न बाललोकवाङ्मय विभाग करणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'लोकवाङ्मय गृह'च्या बाललोकवाङ्मय विभागाने 'पिंगट-करडा घोडा', 'चित्रकथा', 'विस्कटलेला चिमणा', 'मुलांसाठी गोष्टी', 'दोन भाऊ' ही पाच पुस्तकं पुनर्प्रकाशित केली आहेत. या कथांच्या मूळ स्वरूपात कोणत्याही प्रकारचे बदल न करता ही पुस्तकं बाललोकवाङ्मयने मराठी बालवाचकांसाठी उपलब्ध करून दिली आहेत.

रशियन लेखकांनी लिहिलेली ही पाचही पुस्तकं बाल-वाचकांसाठी गोष्टींचा खजिना ठरू शकतो. रादलोव यांचं 'चित्रकथा' हे पुस्तक तर चिमुकल्या पाहुण्यांना गोष्टींबरोबरच चित्रं पाहण्याचा आनंद देऊन जाणारं आहे. ४६ पानी या पुस्तकात एकूण ३६ कथांचा समावेश आहे. प्रत्येकी एक किंवा जास्तीत जास्त दोन पानं असणाऱ्या या कथा सुंदर चित्रांच्या माध्यमातून व्यक्त होतात.

परीकथा वाचण्याचा आणखी एक उत्तम अनुभव 'पिंगट-करडा घोडा' या पुस्तकातून मिळतो. तीन भाऊ, त्यापैकी दोन धूर्त तर एक भोळा... पण या भोळ्या मुलाला भेटणारी राजकुमारी अशी ही परीकथा.

रशियामध्ये बालवाचकांमध्ये प्रसिद्ध असणाऱ्या अर्कादी गैदार या लेखकाचं 'दोन भाऊ' हे पुस्तक वाचनीय असंच म्हणावं लागेल. दोन भावांच्या खोड्या, मजामस्ती, शेअरिंग आणि केअरिंग असा सगळा अनुभव या कथेतून वाचकांना येतो. १९४१ मध्ये दुसरं महायुद्ध सुरू असताना एका वर्तमानपत्रासाठी पत्रकारिता करताना जर्मन सैनिकांनी त्यांना घेरलं आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. पण आपल्या ३७ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी नोंद घेण्याजोगं लेखन केलं होतं.

साहित्यजगतात प्रसिद्ध लेखक म्हणून नाव कमावणारे आणखी एक रशियन लेखक म्हणजे लिओ टॉलस्टॉय. त्यांनी लिहिलेल्या मुलांसाठी गोष्टी बच्चेकंपनीसाठी 'मॉरल स्टोरीज' ठरतील, अशाच आहेत. टॉलस्टॉय यांच्या सर्वोत्कृष्ट म्हणून निवडल्या गेलेल्या १३ गोष्टी या पुस्तकात असून कृष्णधवल स्केचेसच्या साहाय्याने त्या विशद करण्यात आल्या आहेत. लहान मुलांचं निष्पाप जग, प्राण्यांशी जोडलं गेलेलं मुलांचं भावविश्व टॉलस्टॉय यांनी नेमकं उलगडून दाखवलं आहे.

आई आणि मुलीच्या नाजूक भावविश्वाचा अनुभव 'विस्कटलेला चिमणा' या पुस्तकातून मिळतो. या पुस्तकात एकच कथा आहे. मारिया या छोट्या मुलीची आणि तिच्या आईची गोष्ट यात आहे.

हल्ली मराठी साहित्य वाचणारी बालवाचकांची पिढी कमी होताना दिसते. अशा वेळी रशियन साहित्यात गाजलेली ही पुस्तकं मराठी बालवाचकांसाठी मेजवानी घेऊनच आली आहेत.

* पिंगट-करडा घोडा : मूळ लेखक : एम. बुलातोव्हा, अनुवाद : उमाकांत मोकाशी, संपादक : अनिल हवालदार, चित्रकार : टी माव्रीना, प्रगती प्रकाशन, मॉस्को, पाने – २०.
* चित्रकथा : मूळ लेखक : रादलोव, अनुवाद : अनिल हवालदार, प्रगती प्रकाशन, मॉस्को, पाने – ४६.
* विस्कटलेला चिमणा : मूळ लेखक : कॉन्स्तन्तिन पाउस्तोवस्की, अनुवाद : अनिल हवालदार, सजावट : वालेरी पेरेवेरीन, रादुगा प्रकाशन, मॉस्को, पाने – २४.
* मुलांसाठी गोष्टी : मूळ लेखक : ल्येव तल्स्तोय, अनुवाद : उमाकांत मोकाशी, संपादक : अनिल हवालदार, चित्रकार : पाखोमोव, रादुगा प्रकाशन, मॉस्को, पाने – ४०.
* दोन भाऊ : मूळ लेखक : अर्कादी गेदार, अनुवाद : अनिल हवालदार, सजावट आणि चित्रे : दाविद दूबिन्स्की, प्रगती प्रकाशन, मॉस्को, पाने – ६२.

पाच पुस्तकांच्या संचाची किंमत : ५०० रुपये

**'ग्रंथाली येथे सवलतीत ४०० रु.**

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान

**अनुवादकाचं मनोगत**

'ये रात ये चांदनी फिर कहाँ' (१९५२), 'जलते है जिसके लिए' (१९५९) यांसारखी तरल प्रेमगीतं; 'छोड दो आँचल, जमाना क्या कहेगा' (१९५०) यांसारखी खट्याळ गीतं; ते 'रूप तेरा मस्ताना'सारखी (आराधना- १९६९) प्रणयधुंद गीतं; 'वक्त ने किया क्या हंसी सितम' (कागज़ के फूल-१९५९), 'जाये तो जाये कहाँ' (टॅक्सी ड्रायव्हर-१९५५) यांसारखी विरहगीतं; 'हम है राही प्यार के' (१९५७), 'आज फिर जीने की तमन्ना है' (१९६५) यांसारखी उत्साही, जीवनाभिमुख गाणी; 'ये दुनिया अगर मिल भी जाये' (प्यासा-१९५७) यांसारखी राजकीय-सामाजिक गाणी, 'सुन मेरे बंधु रे' (सुजाता-१९५९), 'वहाँ कौन है तेरा' (गाइड-१९६५) यांसारखी तत्त्वज्ञानात्म डूब असलेली आणि लोकगीताचा बाज असलेली त्यांनी स्वत: गायलेली गाणी....सचिन देव बर्मन अर्थात एस.डी.बर्मन या महान संगीतकाराच्या चित्रपट-संगीताचा असा 'पसारा' त्यांच्या चतुरस्रतेची ग्वाही देणारा आहे.




१९४७ ते १९७५ दरम्यानच्या जवळपास तीन दशकांच्या हिंदी चित्रपट-संगीताच्या कारकिर्दीत एस.डी.बर्मन यांनी रसिकांना अपरिमित आनंद दिला आणि आजही त्यांच्या संगीताचा प्रभाव कायम आहे. जीवन आणि संगीत यांचं अतूट व अन्योन्य असं नातं आहे, अशी धारणा घेऊनच बर्मनदा जगले. त्याचाच वेध घेणारं आणि त्यांची सांगीतिक कारकीर्द व जीवनप्रवास यांचा मागोवा घेणारं मूळ 'सुन मेरे बंधु रे- द म्युझिकल वर्ल्ड ऑफ एस.डी.बर्मन' (प्रथम प्रकाशन- २०१४) हे इंग्रजी पुस्तक लेखिका सत्या सरन यांनी सिद्ध केलं. सत्य, वृत्तं आणि कल्पनाचित्रं यांच्या मेळातून त्यांनी आगळा आकृतिबंध साधला आहे; एस.डी.बर्मन यांच्या आयुष्यातील सत्य घटना आणि त्यांच्या मनोव्यापारामध्ये डोकावू पाहणारे, कल्पनेने चितारलेले प्रसंग यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्थातच असा आकृतिबंध स्वीकारल्यावर सर्जनशील संगीतकाराच्या मनात उमटणारे तरंग आणि त्यांच्या लोकाभिमुख दृष्टिकोनाचे द्योतन दर्शवून देण्यासाठी लेखिकेने काही ठिकाणी भाषेच्या फुलोऱ्याचा वापर केला आहे आणि त्याचवेळी इतरत्र वस्तुनिष्ठ कथनशैलीही कायम ठेवली आहे. त्याचप्रमाणे बर्मनदांना जवळून जाणणाऱ्या अनेकांच्या (प्रकाशित व अप्रकाशित) मुलाखती व प्रतिक्रिया यांचाही अंतर्भाव केला आहे; त्यांचे सूर आणखीनच वेगळे आहेत. मराठीत अनुवाद करताना या सर्व गोष्टींचं भान राखण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला आहे. कुठेही विजोड वाटू नये आणि अनुवाद प्रवाही व सुभग वाटावा, या दृष्टीने विशेष प्रयत्न केले आहेत. 'रोहन प्रकाशन'चे संचालक व माझे बंधू प्रदीप चंपानेरकर यांनी या विविध सुरांच्या वेगळेपणाची दखल घेऊन ले-आउट्स आणि फाँटस्‌चा नेमका व कल्पक वापर करून ते सर्व 'जोड' बेमालूमपणे सांधण्याची किमया साधली आहे. एस.डी.बर्मन यांच्यावरील या पुस्तकाचा अनुवाद करण्याची मला संधी दिली, त्याबद्दलही मी त्यांचा आभारी आहे. अनुवाद करताना दोन मोठ्या समस्या होत्या. एकतर, मूळ इंग्रजी पुस्तकात संगीतविश्वातील संज्ञांचा सढळपणे वापर केलेला आहे. त्या संज्ञांचा काटेकोरपणा कायम ठेवूनही सामान्य मराठी वाचकांपर्यंत त्यांचा अर्थ पोहोचवणं महत्त्वाचं होतं. दुसरं असं की, या पुस्तकात बंगाली गीतांचे, पूर्व व पश्चिम बंगाल वा ईशान्य भारतातील स्थळांचे वा व्यक्तींचे अनेक ठिकाणी उल्लेख आहेत. त्यांचं बंगाली भाषेतील उच्चारण नेमकेपणाने माहीत असणं गरजेचं होतं. परंतु, या समस्यांबाबतीत माझ्या दोन तरुण मित्रांनी बहुमोल अशी मदत केली आणि समस्या सहजी दूर झाल्या.

माझी मैत्रीण सुजाता बॅनर्जी ही इंग्रजी भाषेची अध्यापक. तिला बंगाली भाषेची आणि त्याचप्रमाणे बंगाली व शास्त्रीय संगीताचीही जाण असल्याने बंगाली उच्चारणांबाबतचं तिचं सहकार्य बहुमोल ठरलं. त्याचप्रमाणे, गंधार संगोराम हा संगीताचा अभ्यासक व नवोन्मेषी संगीतकार. या तरुण मित्राने संगीतातील संज्ञांच्या स्पष्टतेसाठी मोठं मोलाचं सहकार्य केलं. सुजाता आणि गंधार यांचे त्यामुळे विशेष आभार.

अमरेंद्र धनेश्वर हे ग्वाल्हेर घराण्याचे गायक, अभ्यासक आहेत. शास्त्रीय संगीताप्रमाणेच ते चित्रपट-संगीताचेही जाणकार आहेत. चित्रपटसंगीत क्षेत्रातील एस.डी. बर्मन यांच्यासह अनेक संगीतकारांचं आणि कलावंतांचं संगीत क्षेत्रातील योगदान सर्वसामान्यांना माहीत करून देण्यासाठी ते स्वेच्छेने अनेक खासगी कार्यक्रमही करत असतात. त्यामुळे माझे बंधू प्रदीप चंपानेरकर आणि मी त्यांना या अनुवादित पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली आणि त्यांनी त्वरित होकार दिला. त्याबद्दल त्यांचे मनस्वी आभार.

बर्मनदांचं अंत:करणापासून निर्माण केलेलं संगीत आणि त्यांनी स्वत: गायलेली या मातीतली गाणी, हे सर्व आपल्याला का भावतं, ते समजण्याच्या दृष्टीने हे पुस्तक रसिक वाचकांना साहाय्यभूत ठरेल, असा विश्वास आहे.

**- मिलिंद चंपानेरकर**

**मूल्य ३०० रु. • सवलतीत २५० रु.**
**'ग्रंथाली येथे सवलतीत २५० रु.**

# ग्रंथपान




‘ग्राफिक डिझाइनचं गारूड’ या त्यांच्या नव्या पुस्तकात दृश्यकलेत महत्त्वाचं मानल्या गेलेल्या ग्राफिक डिझाइन या विषयाबद्दलचं अभ्यासपूर्ण सखोल विवेचन आहे. ग्राफिक डिझाइन ही कला व्यवसायाची एक गरज आहेच, शिवाय ते डिझायनर्ससाठी एक उत्पन्नाचं साधनही आहे. उद्याच्या डिझायनर्ससाठी-त्यांच्या सर्जनाला वाव देणाऱ्या नि त्यांच्या पुढे नवी आव्हानं उभी करणाऱ्या या विषयावर मराठीत तुलनेने अत्यल्पच लिहिले गेले आहे.

वेगवेगळ्या कलांच्या शास्त्रावरची विविध पुस्तकं वाचताना पुन्हा पुन्हा जाणवत गेलेलं ग्राफिक डिझाईनचं स्थान, इतर क्षेत्रांशी असणारा त्याचा संबंध या पुस्तकात यशोदा भागवतांनी उद्धृत केला आहे. संस्कृती, परंपरा, कलाकौशल्य यांचा वारसा आपल्याला एकीकडे लाभला असताना पाश्चिमात्य डिझाईनचाही आपल्यावर प्रभाव अधोरेखित होतो आहे. या पार्श्वभूमीवर ग्राफिक डिझाइनच्या मूलतत्त्वांची, संकल्पनांची, रचनातंत्राची कलेच्या चौकटीपलीकडे जाऊन या पुस्तकाद्वारे करून दिलेली ही व्यापक ओळख ! जाणकारांना ग्राफिक डिझाईनकडे पाहण्याची वेगळी दृष्टी देता देता, डिझायनर्सना अधिक आत्मविश्वासाने डिझाइन साकार करण्यासाठी दिशाही देणारी...

मूल्य ५०० रु. **‘ग्रंथाली येथे सवलतीत ४०० रु.**




रवी अभ्यंकर ह्यांचा ‘पन्नाशीचा भोज्या’ म्हणजे भूतकाळातल्या आठवणी आणि संवेदना (नॉस्टॅल्जिया) जाग्या करणारा एक खजिनाच. नर्मविनोदाची झालर असलेले हे लेखन, वाचायला हलकेफुलके पण अतिशय प्रामाणिक आणि परखड आहे. यात विचारलेले गहन प्रश्न कुठल्याही वयाच्या वाचकाला विचार करायला लावतील. अभ्यंकरांचं जन्मसाल १९६२ हे महत्त्वाचं अश्या दृष्टीनं की ह्यानंतरच्या काळात मुंबईत आणि एकूणच भारताच्या आणि जगाच्याही सर्वच क्षेत्रात बदलांचा वेग आकार घ्यायला लागला होता. घटना बालपणीच्या असल्या तरी वयाच्या पन्नाशीत त्यांच्याकडं पाहण्याचा नजरिया बदलून अधिक प्रगल्भ झालेला आहे.

आईवडिलांकडून वाचनाचा, साहित्याचा व झालेला संगीताचा संस्कार ह्याचा ते कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतात. शिवाय टॉन्सिलसचं ऑपरेशन, भावाची मुंज, ‘च’ची भाषा, अतींद्रिय शक्ती असे प्रसंग वाचकाला हसवण्याबरोबरच त्याला थेट बालपणातच घेऊन जातात. इंदिरा गांधींचं पंतप्रधानपद, त्यांचे ठाम निर्णय, आणीबाणी, शिवसेनेची स्थापना अश्या महत्त्वाच्या राजकीय; तर जोशी-अभ्यंकर खूनप्रकरण, रामनराघवनची दहशत, मुंबईचं अंडरवर्ल्ड, राखीव जागा, अशा विविध विषयांवर तटस्थ आणि त्रयस्थ वृत्तीनं समतोल लेखन केलं आहे. परदेशातले विलक्षण अनुभव, दादा कोंडके, मदनमोहन, एस.डी. बर्मन आणि वसंत देसाई ह्या व्यक्तिमत्त्वांविषयी त्यांनी अंतर-उमाळ्यानं भावना व्यक्त केल्या आहेत.

मूल्य ३०० रु. **‘ग्रंथाली येथे सवलतीत २५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

देव,दैव आणि निसर्ग यांच्या वरदानाची आणि कोपाची कारणमीमांसा करणे तसे अवघड काम. किंबहुना अशक्य कोटीतले. वरदानाचा हात उंचावतो, तेव्हा माणसाची अवस्था होते, किती घेशील दो कराने. आणि वक्रदृष्टी वळली तर जीवनाचा अंत जवळ दिसू लागावा. असा प्रसंग आपण दूरचित्रवाणीवर अनुभवला आहे, २०13 साली, जून महिन्याच्या मध्यावर, चारधाम यात्रेच्या निमित्ताने. केदारनाथ येथे घडलेले निसर्गाचे रौद्र तांडव आजही नजरेसमोर आहे. ते पाहताना मन त्या प्रवाहाखाली सापडल्यासारखे झाले होते, विचारांच्या दिशाच उध्वस्त झाल्या होत्या, कोसळणाऱ्या कडे-कपारीसारख्या. ज्यांचे आप्त यात सापडले होते, त्यांची अवस्था किती दारूण झाली असेल याची कल्पना करणे तर अशक्य होते. परंतु जे स्वतः या तांडवाच्या परिघात घेरले गेले होते, त्यांची अवस्था? जीवन-मृत्यूच्या नाजूक रेषेवरून चालताना त्यांच्या मनात काय येत होते, विचार कोणते होते, होते की बधीर झाले होते? हे केवळ कल्पनेवरच समजण्यासारखे होते. असा अनुभव घेतलेल्या एकता पटेल आणि त्यांचे कुटुंबीय या महाप्रलयातून सुखरूप परतले; मात्र मनावर, काळजावर त्या प्रलयाचे घाव घेऊनच. त्या महाप्रवासाचे वास्तवदर्शी अनुभव सांगणारे पुस्तक त्यांनी आपल्या हाती दिले आहे, त्याचे नाव 'गौरीकुंड १.५ कि.मी.'




एकता पटेल एकूण आठजणांच्या ग्रुपसह चारीधामच्या यात्रेवर निघाल्या. तीन तरुणी, पाच वयस्कर असा हा ग्रुप. केदारनाथपर्यंतचा प्रवास सुखद, सुंदर, अवर्णनीय, असा. गंगा, अलकनंदा, मंदाकिनी या नद्यांची विविध रूपे पाहायला मिळाली. गढवाल डोंगररांगाची मोहून टाकावी अशी निसर्ग निर्मित रांगोळी. हिम, हिरवाई आणि सूर्य यांच्या खेळात स्वर्गाचे नंदनवन दिसावे, अशी मनोहर दृष्ये. त्याचे वर्णन करताना त्या लिहितात, 'नागमोडी आकाराच्या डोंगरांमधून सर्पाकृती वाहणारी नदी. डोंगरांनी जणू तिला वाहण्यासाठी हद्द ठरवून दिली होती आणि तीही वडिलांचा हात धरून चालणाऱ्या अवखळ लेकीप्रमाणे एका डोंगरावरून दुसऱ्या डोंगराला वळसा घालत गोल गोल गिरक्या घेत होती.'

डोंगररांगामधून प्रवास करीत उंचावर असलेल्या जटाधारीच्या ठिकाणांवर पोहचण्यासाठी वाहनांबरोबरच कधी चालत तर कधी हेलिकॉप्टर, कधी डोलीवाले, यांच्या मदतीची आवश्यकता भासली. परंतु ज्याच्या दर्शनाला आलो त्याचे दर्शन उत्तम झाले की जीवनाची सार्थकता लाभते. ती सार्थकता या कुटुंबाला लाभली. 'हे आशुतोष, हे अनंत दृष्टीवाल्या, तू आमचे अंतर्मन जाणून आम्हाला पुन्हा दर्शन दिलेस. आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले. आम्ही धन्य झालो.कृतकृत्ये झालो.' प्रसन्न मनाने परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली. आणि निसर्गाने आपले रूप दाखवायला सुरुवात केली. पाऊस पडायला लागला, त्याचा जोर वाढला. थंडी, धुके आणि डोंगररांगात अडकून पडणारे काळे ढग, यांचे थैमान सुरु झाले. नद्यांना पूर आले. त्या पाण्याला कवेत सामावण्यास काठ अपुरे पडले तेव्हा प्रवाह डोंगररांगाच्या खांद्यावरून झेपावले. मस्तीला आल्यासारखे ते धावू लागले. वाटा, रस्ते उखडून फेकल्या. डोंगराचे कडे हादरले. मोठमोठे वृक्ष, दगड, कडे उन्मळून टाकले. सूर्यालाही कवेत घेतले. दिवस असूनही अंधार भासू लागला. आता दिसणारी हॉटेल, झोपड्या, डोंगर यांचे अस्तित्व पुसले गेले. आश्रयाला जागाच उरली नाही. प्रवासाचा मार्ग खुंटला, ना मागे जाता येत होते ना पुढे. प्रत्येकाला आपल्या जिवाची भीती. खचलेले रस्ते, प्रचंड वेगाने वाहणारे प्रवाह, चिखल, प्रेते आणि झाडे. ना खायला अन्न ना प्यायला पाणी. हजारो पर्यटक अडकले, हजारो बेपत्ता झाले, मेले, वाहून गेले. काहींचा मृत्यू तर नजरेसमोर झाला. या सगळ्याचा अनुभव लेखिकेने स्वतः घेतला. त्याचे वर्णन त्या करतात, 'एक सबंध डोंगरच्या डोंगर कोसळला होता. आठशे मीटरच्या भागात आता रस्ताच उरला नव्हता, त्यावरून पाणी वाहत होते. लोकांची प्रेते सगळीकडे विखुरली होती. हृदयाचा ठोका चुकला, आता काय करायचे? संकटे सतत डोक्यावर मधमाश्यांसारखी घोंघावत होती... कुठे जाशी भोगा तर तुझ्यापुढे उभा!'

या प्रसंगातून सुटका करण्यासाठी केलेले प्रयत्नही कसोटी पाहणारे. स्वतंत्र चॉपर भाड्याने मिळवून, त्याद्वारे सुटका करण्यासाठी आप्तांनी केलेली धडपड स्तुत्यच म्हणायला हवी. सोबतीला वयस्कर मंडळी, हाताशी पुरेसे साहित्य नाही. पाऊस आणि थंडीचा सतत मारा. तरीही त्यातून हे कुटुंब परतीच्या प्रवासाला येते, तेही सुखरूप. ही सुद्धा लीलाच, देवाची, दैवाची आणि निसर्गाची.

हे लेखन म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाचे कथन आहे. भावना, संवेदना, जाणिवा आणि हतबलता यांचेही पदर यातून उलगडत गेलेले आहेत. भावलेले सौंदर्य, दिसलेले भयानकतेचे वास्तव आणि माणसांच्या वागण्याच्या तऱ्हा, यांची केलेले वर्णने, ही लेखिकेच्या तरलतेचा परिचय देतात. 'एक चुकीचे पाऊल आणि तुम्ही या जीवनमरणाच्या रंगमचावरून आऊट!' 'सतत विचारांचा थकवा माणसाला एक क्षण इतके निष्क्रीय बनवतो की माणूस सगळी हत्यारे ठेवून देतो आणि संपूर्ण शरणागती पत्करतो.' या सारखी वाक्ये त्या सहज लिहून जातात. या पुस्तकाचे मूळ लेखन गुजरातीतून झाले आहे, त्याचे मराठी रुपांतर बीना ठाकूर यांनी केलेले आहे. पुंडलिक वझे यांनी त्याचे मुखपृष्ट छानपैकी सजवले आहे.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

बाजारात उपलब्ध असलेली अनेक पुस्तके योगासने आणि प्राणायामांची माहिती देणारी असतात. परंतु ती माहिती वरवरची असते. त्यावर अधिक भर असतो शारीरिक हालचालींवर, बाह्यांगावर. त्याचप्रमाणे लोकांचीही समजूत असते, योगासने म्हणजे ६४ आसनांचाच प्रकार. किंवा शारीरिक व्यायामाचा प्रकार. परंतु ते पुरेसे खरे नाही. योगासनात अंतरंगाचाही समावेश आहे. शरीरातील, स्पंदने, नाडी, मन, बुद्धी आणि विचार यांचाही त्यात महत्त्वाचा वाटा असतो. किंबहुना तोच अधिक असतो. तरच त्याचा हवा तसा परिणाम दिसून येतो. हा समज लोकांपर्यंत पोहोचवावा. त्यांना योग म्हणजे काय, प्राणायाम म्हणजे काय, त्याचे कार्य कसे चालते, ते लोकांना समजावे, त्याचा प्रसार व प्रचार व्हावा, यासाठी या पुस्तकाचा प्रपंच मांडावा लागला. कारण हे सगळे जे सांगितले आहे, ते कुठे वाचून वा कुणाचे ऐकून नाही, तर स्वतः घेतलेला अनुभव आहे. म्हणजे स्वानुभवावर आधारलेले हे पुस्तक आहे. त्याचे लेखक आहेत श्रीकृष्ण मराठे. आणि पुस्तकाचे नाव आहे 'माझी आरोग्य सेवा'. हे वरवरचे नाव झाले. कंसात दिलेले उपशीर्ष पहाः 'असाध्य आजाराकडून परिपूर्ण स्वास्थ्याकडे'.




लेखक स्वतः एका असाध्य व्याधीने ग्रस्त होते. त्याचे नावः ॲडिसन्स. या व्याधीचे वैशिष्ट्ये म्हणजे कायम औषधे घेत राहणे. त्यात आणखी पथ्य मोठे, जंजूसंसगापासून दूर राहणे. म्हणजे गर्दीच्या ठिकाणी न जाणे. कायम तिच्यापासून दूर राहणे. बरे जी औषधे घ्याची ती सहजासहजी उपलब्ध नाहीत. ती परदेशातून आयात करावी लागत. त्यांचे नाव : कॉर्टिझोन आणि फ्लुड्रोकॉर्टिझोन. ती मिळवण्यासाठी अनेकांचे साहाय्य झाले, हा भाग वेगळा. व्याधी आयुष्यभर सोबत करणार, औषधे देखील आयुष्यभर घ्यावी लागणार, हे विधिलिखित ठरले होते. परंतु एक दिवस आशेचा किरण सापडला. विवेकानंद केंद्र; कन्याकुमारीच्या सहलीच्या निमित्ताने सापडले. आणि सारे विश्वच बदलून गेले. तिथे मिळालेल्या सल्ल्यानुसार लेखक बंगलोरच्या विवेकानंद केंद्रात दाखल झाले. हे केंद्र म्हणजे योगाचे विश्वविद्यालय. येथे योगावर संशोधन चालते. अनेक तज्ज्ञ मंडळी इथे संशोधन करीत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तेथे योगाचा आणि प्राणायामाचा अभ्यास सुरू झाला. आणि एक वर्षानंतर तेथेच भरलेल्या विश्वसंमेलनात जाहीर करण्यात आले, 'श्रीकृष्ण मराठे असाध्य आजारातून पूर्ण बरे झाले आहेत. आता त्यांना कुठलेही औषध त्यांच्या व्याधीसाठी कधीच घ्यावे लागणार नाही'. यावर विरोध नाही तरी शंका घेणारे निघालेच. 'बंगलोरच्या आश्रमाचा व वातावरणाचा हा परिणाम असेल. गर्दीच्या ठिकाणी शहरी भागात गेले की पुन्हा तेच चक्र सुरू होणार.' शंका निरसन करण्यासाठी पुन्हा सर्व चाचण्या घेण्यात आल्या. मुंबईत आल्यानंतरही त्या घेण्यात आल्या. आणि अभिप्राय आला 'व्याधीमुक्त'. इतकेच नाहीतर पुढील जगणे सुरू झाले ते नियमित, सर्वसामान्य माणसांप्रमाणे. गर्दीत, लोकल, जिने चढणे वगैरे. हा परिणाम होता योगासनांचा, प्राणायामांचा, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे केलेल्या सरावाचा.

आपल्या अनुभवाचा फायदा इतरांना व्हावा म्हणून मराठे यांनी हे पुस्तक लिहिले. परंतु ते केवळ अनुभवकथन नाही. त्यासोबत योगासने व प्राणायाम आणि शरीरशास्त्रीय विश्लेषण यावर अधिक भर दिलेला आहे. आसने म्हणजे काय? प्राणायाम म्हणजे काय? त्यांचा शरीरातील पेशी, ग्रंथी, अपेशीय ओजस, अतिंद्रिय निदान, मन, मेंदू, नाद, यांच्याशी कसा संबंध येतो? माणसाच्या ठायी असणारे काम, क्रोध, मोह, मद, मत्सर आणि भय हे षड्रिपू कसे नकारात्मक प्रतिसाद देतात, आणि यश, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, आणि धैर्य हे सद्गुण कसे सकारात्म परिणाम घडून आणतात यांचे विवेचन केलेले आहे. योगाद्वारे कोणकोणत्या व्याधीग्रस्तांना आनंदी करता आले, त्याची माहितीही दिलेली आहे. व्याधीग्रस्तांच्या मनात असलेल्या शंकांना दूर करण्याचे काम त्यांनी केले आहे. नुसताच योग नाही तर पतञ्जली योग, ब्रह्मविद्या, ॲक्युपंक्चर, विपश्यना यांच्याही उपयुक्ततेविषयी नमूद केलेले आहे.

या पुस्तकात एकूण तेरा प्रकरणे आहेत. प्रत्येकात आलेली माहिती ही स्वतंत्रपणे दिलेली आहे. शेवटी परिशिष्टात पत्नी आणि मुलगा यांचे मनोगत दिलेले आहे. तिसऱ्या परिशिष्टात मेंदूलहरी व मानसिक अवस्थांचा तक्ता दिलेला आहे. हे पुस्तक म्हणजे व्याधीकडून आरोग्याकडे घेऊन जाण्याचा एक मार्ग आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन योगाच्या सिद्धांताकडे वळण्याचा मोह नक्कीच व्हावा. मुखपृष्ठावर योग वा आसने यांची प्रतिकृती नाही, तर मन, मेंदू आणि संप्रेरणा दाखवणारे चित्र आहे. त्यावरून आतल्या विषयाचा आवाका लक्षात यावा. रंजन जोशी यांची ही कल्पकता उत्तमच.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

अमेरिका म्हणजे काय, असा प्रश्न विचारणे आता कालबाह्य झाले आहे. अगदी शाळा कॉलेजातला मुलगा याचे सहज उत्तर देईल. उच्च शिक्षण, मोठ्या पगाराची नोकरी किंवा मोठा व्यवसाय आणि स्वतःची एक वेगळ ऐट, म्हणजे अमेरिका. तर यात चुकीचे काही आहे, असे काही आता म्हणता येणार नाही. अमेरिका पुढारलेली आहे, प्रगत आहे आणि तिथे बुद्धिकौशल्याला प्रचंड वाव आहे, मागणी आहे, हे त्याचे कारण आहे. इतरही अनुषंगिक कारणे आहेत. आज भारतातून विशेषतः महाराष्ट्रातून जो वर्ग तिथे स्थलांतरित झाला आहे, होत आहे आणि स्थिरावला आहे, त्याचा प्रवाह पाहिला की हे उत्तर समर्पक असल्याची खात्री होते. परंतु असेही म्हटले जाते की, चमकणारे सारे सोनेच असते, असे नाही. तर अशा पुढारलेल्या आणि संधीचे सोने करणाऱ्या अमेरिकेचे अंतरंग कसे आहे, अमेरिकेशी संबंध आलेल्या अनेकांच्या अनुभवातून ती कशी भावली, स्थलांतरित समाजाच्या जीवनात झालेले बदल आणि मानसिकता कशी आहे, या सगळ्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न डॉ. भानुशाली आणि डॉ. सबनीस या संपादकद्वयांनी केलेला आहे, त्याचे हे पुस्तकः 'कोलाज अमेरिकेच्या अंतरंगाचा.'




अमेरिकेच्या अंतरंगाचा वेध घेण्यासाठी ज्या मान्यवरांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत, ते सर्वच आपापल्या क्षेत्रातील दिग्गज आहेत, नावलौकिक प्राप्त केलेले आहेत, अमेरिकेतील स्वातंत्र्यदेवतेच्या प्रतिकृतीसारखे. डॉ. अनिल काकोडकर यांच्या मते अमेरिका हा इतर विकसित व श्रीमंत देशांपेक्षा श्रेष्ठ देश आहे. कोणत्याही प्रकारच्या बुद्धिमत्तेला वाव मिळण्यासाठी योग्य असलेला हाच देश आहे. खऱ्या अर्थाने संधीचा देश आहे. परंतु या देशाला अणुउर्जेच्या ज्ञानाचा प्रचंड अहंकार आहे. आणि तो उपऱ्यांचा देश आहे. त्याचवेळी ते अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्यांना संदेश देतात, त्यांच्या तालावर नाचू नका, तुमच्या बुद्धिमत्तेचा उपयोग देशासाठी करा.

सिलिकॉन व्हॅलीचे यशस्वी उद्योजक आणि इंजिनिअर, प्रकाश भालेराव यांच्या मते अमेरिका ही मेल्टिंग पॉट नाही, ती आहे एक जिगसॉ. इथे आलेला प्रत्येक समाज स्वतःची वैशिष्ट्ये टिकवून होता व आहे. कुमार केतकरांना दिसलेली अमेरिका दोन प्रकारची आहे. एकीकडे अत्यंत हिडीस, दुष्ट, हिंस्त्र. तर दुसरीकडे अत्यंत विकसित, लोकशाही तत्वांचा आदर करणारी, स्वतंत्र विचारांची. निधर्मवाद, विशुद्ध विज्ञान, तंत्रज्ञान हवे असणारी. हा देश राष्ट्राध्यक्षांच्या तालावर चालत नाही तर त्यांच्या स्टेट डिपार्टमेंटच्या धोरणानुसार चालतो.

सगळीकडे व्यवहाराचे एक महत्त्वाचे चलन म्हणून अमेरिकन डॉलरला पसंती दिली जाते याचे कारण डॉ. नरेंद्र जाधव यांनी त्यांच्या मुलाखतीद्वारे सांगितले आहे. तसेच अमेरिकेतील आर्थिक परिस्थिती कधी आणि कशी डबघाईला आली, त्याचीही कारणमीमांसा त्यांनी दिली आहे.

ॲड. उज्ज्वल निकम न्यायप्रक्रियेच्या बाजूने मत नोंदवतात. न्यायाधिशाला कायद्याचे ज्ञान असते, त्या चौकटीत ते खटल्याकडे पाहतात. सामान्य माणसाचा कॉमन सेन्स हा भिन्न असतो. त्याला कायद्याचे सखोल ज्ञान नसते. पण जीवनाकडे पाहण्याचा त्याचा एक विवक्षित जीवनाभिमुख दृष्टिकोन असतो. त्यामुळे तो जीवनाकडे वेगळ्या दृष्टीने पाहू शकतो. जीवनमूल्याचा आधार घेतो. हा दृष्टिकोन अमेरिकन न्यायव्यवस्थेला महत्त्वाचा वाटतो. म्हणून प्रत्येक नागरिकाला 'ज्युरी ड्युटी' लावली जाते. अर्थात ही पद्धती फारशी उपयुक्त नाही. यात भावनेलाही महत्त्व प्राप्त होऊ शकते, असे त्यांचे मत आहे.

अच्युत गोडबोले हे संगणक क्षेत्रातले प्रथितयश असलेले नाव. अमेरिकेतील या व्यवसायाच्या विविध अनुभवांचे वर्णन त्यांनी केले आहे. परंतु त्याचवेळी त्यांनी एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. आणि ते आहे ग्रंथालयाचे. जाडजूड आणि दुर्मिळ पुस्तके काहीही डिपॉझिट न घेता ही ग्रंथालये देतात.

डॉ. सलिल कुलकर्णी, स्वाती दांडेकर, विद्या हर्डीकर-सप्रे, अनुराधा गानू, डॉ.भूषण केळकर, सुनीता धुमाळे यांच्याही मुलाखती यात आहेत. स्वतः डॉ. गजानन सबनीस यांचा लेख आहे.

अनेकांच्या मतांतून एक चित्र उभे करण्याची कल्पना अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. ही कल्पना साकारली आहे डॉ.लतिका भानुशाली आणि डॉ. गजानन सबनीस यांनी. दोघेही आपापल्या क्षेत्रात लौकिक संपादन केलेले. डॉ सबनीस हे अमेरिकेत ५० वर्षे वास्तव्य केलेले, स्थापत्यविशारद आणि हार्वर्ड विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक. तर डॉ. भानुशाली या अर्थशास्त्र, मराठी आणि राज्यशास्त्र या विषयांच्या अभ्यासक, लेखिका. मान्यवरांच्या मुलाखतीतून जे वास्तव प्रतिबिंबित झाले आहे, ते काचेच्या तुकड्यांप्रमाणे अनेक रंगाचे, आकाराचे आहे, ते जसे भावले, तसेच मांडले आहे. एकाच देशाला किती पैलू असू शकतात याचे सार यातून सापडत जाते. तोच या संपादकद्वयांचा हेतू होता, तो साध्य झालेला आहे हे वाचकांनी ठरवायचे आहे. परंतु त्यांनी घेतलेले परिश्रम आणि दाखविलेली कल्पकता नक्कीच स्तुत्य म्हणावी लागेल. भाषेतला आणि लिखाणातला कसदारपणा हा त्यांच्या प्रकृतीशी जुळणारा आहे. स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा आणि अमेरिकन ध्वजासह डॉलरची प्रतिकृती ही जणू मुखपृष्ठावरील मोहरच. पुंडलिक वझे यांचे हे मुखपृष्ठ उठावदार झाले आहे, जसे वाचकांना साद घालीत आहे.

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

कुठलेही पुस्तक हातात घेण्याची उत्सुकता वाचकाच्या मनात निर्माण करते ते मुखपृष्ठ. सुंदर, आकर्षक, मोहक पेहराव बाह्यरंगाची तरलता दाखवते तेव्हाच अंतरंगाचे कुतूहल जागृत करते ते मुखपृष्ठच. नितळ निळ्या रंगाचे अंत नसलेले आकाश आणि अथांग पसरलेला बेलाग सागर, त्यावरून झेप घेतलेला पांढराशुभ्र पक्षी, आपल्या सजवलेल्या निवासाच्या खिडकीतून अनिमिष नेत्रांनी पाहणारी पाठमोरी ललना असलेले मुखपृष्ठ असेल तर या कुतूहलास किनारा सापडणे कठीण. अशावेळी एकच पर्याय उरतो, पुस्तक उचलण्याचा, चाळून पाहण्याचा, वाचण्याचा. असे सुंदर आणि कुतूहलाच्या जाणिवा जागृत करणारे मुखपृष्ठ असलेले पुस्तक म्हणजे रेखा राव यांचे 'झेप' हे पुस्तक होय. आणि हे मुखपृष्ठ सजवले आहे चित्रकार सतीश भावसार यांनी.




अथांग आणि बेलाग सागर नजरेसमोर दिसू लागतो तेव्हा एक गोष्ट नक्कीच लक्षात येते की, इथे जे काही आहे ते आपल्या इच्छेने, मर्जीने. स्वतंत्र. स्वतःचा आवाका असलेले. समोर आकाश आहे ज्यात जिद्दीने विहार करण्यासाठी पक्षी झेपावला आहे. हा पक्षी आणि ललनेच्या आकांक्षेचा, ध्येयाचा, मुक्ततेचा प्रतीक. हे सारे मनावर उमटले ते हे मुखपृष्ठ पाहून. दुसरे कुतूहल रेखा राव नावाचे. ते कादंबरी विश्वात तसे फारसे परिचित नसलेले. कादंबरी हा विषय तसा मोठा आवाका असलेला. तो या लेखिकेने कितपत पेलला आहे, किती न्याय दिला आहे हा प्रश्न आपोआपच पुढे आला. आतापर्यंत स्त्री लेखिकांनी केलेले लेखन विपुल प्रमाणात आहे. समर्थपणे त्यांनी तो तो विषय, वाङ्मय प्रकार हाताळलेला आहे. त्यांच्या पंक्तीला बसण्याचा मान रेखा राव यांनी मिळवला आहे का, हाही प्रश्न उपस्थित झाला. प्रश्नांची उत्तरे पुस्तक वाचल्याशिवाय कशी मिळणार? मग त्याच कुतूहलापोटी वाचन सुरू झाले.

विषयाचा आवाका मोठा आहे. पार्वती मेमन ही एक जिद्दी मुलगी एका सुसंस्कारी कुटुंबातून ध्येय उराशी बाळगून घराबाहेर पडते. 'अब्बा-अम्मा, मला मुळी लग्नच करायचं नाही. शिकून स्वतःच्या पायावर उभं राहायचंय. नोकरी करायचीय. काहीतरी करून दाखवायचं आहे.' हा तिचा दृढ निश्चय. केरळ सारखा निसर्गसंपन्न परिसर आहे. तिकडचे रीतिरीवाज आहेत. कौटुंबिक संस्कार आहेत. कुटुंब भरलेले आहे. या सगळ्यांना सोडून ही मुलगी नोकरीच्या निमित्ताने अनोळखी मुंबईत पाऊल ठेवते. अनोळखी शहर, अनोळखी माणसे, कार्यालये, गर्दी, वाहने, रेल्वे. या सगळ्यांशी झुंज देते. प्रेमात पडते. अपघातात सापडते, प्रेमाच्या आणि वाहनाच्या. सावरते. आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करते. एकटीने प्रवाहाला मागे सारीत झेपावते, येऊन विसावा घेते, जिथे जिद्दीला किनारा सापडतो. आकाशात झेपावणारा शुभ्र पक्षी नजरेसमोर उभा राहतो.

पार्वतीच्या सोबतीने अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. कुटुंबवत्सल अम्मा-अब्बा आहेत. कुटुंबात नंदिनी, पद्मिनी, विलासिनी, अश्विनी या चार बहिणी आहेत. हे सारेजण एका कोषात वावरत असतात, संस्काराच्या. तर लिना नावाची मैत्रीण आहे, जी स्वतःच्या ऐटीने ग्लॅमरस पद्धतीने जगण्याची इच्छा बाळगून आहे आणि त्यात ती चांगली मुरलेली आहे. सुबंधू घोष नावाचा प्रियकर तिच्या आयुष्यात डोकावतो. आणि अर्ध्यावर सोडून निघून जातो. मुलीसारखी काळजी घेणारा नोकर कण्णोमा आहे. या साऱ्या व्यक्तिरेखा ठळकपणे उभ्या करण्यात आलेल्या आहेत, त्यांच्या वैशिष्ट्यांसह. त्या पार्वतीच्या जीवनावर परिणामांची छाप टाकण्यात यशस्वी होतात. पार्वतीला एकटे राहावे लागते, सुरुवातीला नाईलाज म्हणून, पुढे ठरवून. एका उंच आसनावर स्थिरावूनही एकटीच, निश्चयाने, दृढपणे यात मनाची घालमेल आहे, अगतिकता आहे, आनंद आणि दुःखाचा ऊनसावलीसारखा खेळ आहे. परंतु या सगळ्यात दिसून येते ते पार्वती मेमनचे खंबीरपण. जे घडून गेले ते मागे पडले. पाठमोरी ललनेची आकृती हेच सांगत असते. सर्व काही मिळवूनही एकटी आहे, सागरासारखी, मर्जीने जगणारी, स्वतंत्र. ठाम.

पार्वती मेमन ही व्यक्तिरेखा उभी करताना, अनेक जागा सापडतात, जिथे संयम सुटू शकतो, तोल जाऊ शकतो. रंजकतेच्या नादात भडकपणा येऊ शकतो. परंतु लेखिकेने हे भान जपले आहे. आपल्याला जे सांगायचे आहे, ते कमी शब्दात, कलात्मकपणे सांगता येते, हे त्यांना साधले आहे. प्रसंगांची गर्दी करून विषयाला ताण देणेही शक्य होते. परंतु मोजक्याच प्रसंगांना आकृतीबंधात बांधून आपल्या इप्सिताकडे त्या पोहोचल्या आहेत. पार्वती मेमनच्या तोंडी टाकलेले वाक्य, ही त्यांच्या कादंबरीच्या शेवटाची कल्पकता सुरेख म्हणावी लागेल. सोडून गेलेला प्रियकर परत येतो. तिचे वैभव पाहून म्हणतो, 'तुझं ध्येय साध्यं केलंस. मोठी पोस्ट, पैसा, कीर्ती, यश, सारं मिळवलंस. आता आपण लग्न करू या.' त्यावर ती उत्तर देते, 'माझ्या पूर्वायुष्यातलं पर्व केव्हाच संपलं. पण माझं ध्येय अजून संपलेलं नाही. मला अजून काही मिळवाचंय. अजून काही शिकायचंय, ह्या मोठ्या खिडकीतून दिसणारं आकाश पाहिलंस? त्याला अंत आहे का?'

फ्लॅशबॅक पद्धतीने या कादंबरीची मांडणी करण्यात आलेली आहे. लेखिका अमराठी असूनही मराठीतून उत्तम लेखन केले आहे. त्यांचा भविष्यकाळ उज्वल आहे, नक्कीच.

**मूल्य १२५ रु. • सवलतीत ७५ रु.**

## 'ग्रंथाली' वाचकदिन क्षणचित्रे



गझलसंध्या – 'एका उन्हाची कैफियत'
कार्यक्रम नाशिक येथे संपन्न झाला.
सादरकर्ते – गायक संजीव चिम्मलगी
कवी चंद्रशेखर सानेकर
रूपक खरवंदीकर (तबला)
आणि अनिरुद्ध गोसावी (पेटी)



कवी चंद्रशेखर सानेकर गझल सादर करताना




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे
मराठी विभागातर्फे
'परदेशातील मराठी भाषा आणि साहित्य'
या विषयावर व्याख्यान.
मराठी विभागप्रमुख डॉ. कृष्णा किरवले
व्याख्याते अशोक सप्रे, विद्या हर्डीकर–सप्रे
'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर
आणि प्रशांत कऱ्हाडे ('ग्रंथाली' ॲपचे प्रेझेंटेशन)

RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.